Approved by the Director of Public Instruction, Department, Central Provinces & Berar.
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी तिसरें पुस्तक



66म
१०ग

प्रकाशक—
[illegible] एन्ड कंपनी लि., जबलपुर, नागपुर, उमरावती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म् ❀

पुस्तक-संख्या ... ७७म / १०गा

पंजिका-संख्या २५१०६/२३.२.२००२

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यप्रांतांतील प्राथमिक शाळांकरितां मंजूर झालेली.

सुलभ वाचनपाठमाला

मराठी तिसरें पुस्तक

CHECKED 1973

संपादक,

गंगाधर गोविंद कानेटकर, एम्. ए.

प्रोफेसर, स्पेन्स् ट्रेनिंग कॉलेज, जबलपूर.

ब. पं. तांदळे,

शिक्षक, बेसिक नॉर्मल स्कूल, वर्धा.

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

—:o:—

प्रकाशक,

सी. पी. अँड बरार एजुकेशनल बुकडेपो,

नागपूर, उमरावती, जबलपूर.

66 म
१० ए।

२१९०६
२३.२.२००२

आवृत्ति ११ वी] १९४३ [किंमत ५ आणे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना

प्रस्तुत वाचनपाठमाला मध्यप्रांतांतील प्राथमिक शाळांच्या पहिल्या चार वर्गांकरितां खास रचण्यांत आली आहे. मध्यप्रांतांत सन १९२६ सालापासून आतांपर्यंत चालू असलेली "सामान्यज्ञानप्रवेशिका" भाग १--२ हीं पुस्तकें स्वतंत्र स्वरूपांत पुरवणी पाठ्यपुस्तकें म्हणून यापुढे चालू राहूं नयेत, व त्यांमधील प्रमुख विषयांचा समावेश होतां होईतों एकाच वाचनपाठमालेंत व्हावा असा इ० स० १९३० सालीं नेमलेल्या कमिटीने अभिप्राय दिला; त्या अभिप्रायास अनुसरून भाषाज्ञान, चारित्र्यसंवर्धन, मानवी स्वभावाचें दिग्दर्शन यांबरोबरच भोवतालच्या परिस्थितींचें ज्ञान देणारे पाठही प्रस्तुत पुस्तकांत घातले आहेत.

पाठ सुलभ व मनोरंजक होतील अशी शक्य तितकी काळजी घेतली आहेत. इंग्रजींतील उत्कृष्ट बालवाङ्मय व शालोपयोगी क्रमिक पाठ्यपुस्तकें याचें अवलोकन करून त्यांतील उपयुक्त कल्पनांचा होईल तितका उपयोग प्रस्तुत मालत करण्याचा यत्न केला आहे. तो कितपत साधला आहे. हें ठरविण्याचा अधिकार तज्ज्ञांचा आहे.

अलीकडे मराठींत चांगलें बालवाङ्मय निर्माण होऊं लागलें आहे. ही अभिनंदनीय गोष्ट आहे. अशा बालोपयोगी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गद्य व पद्य वाङ्मयांतून उत्कृष्ट उतारे देण्याचा उपक्रमहि प्रस्तुत मालेंत केला आहे या प्रयत्नास उदारपणे साहाय्य करणारे कवि, लेखक व प्रकाशक या सर्वांचे संपादक आभारी आहेत. नवीन रचना करतांनाहि जुन्यांतील उत्कृष्ट वाङ्मयाकडे दुर्लक्ष होतां कामा नये, असें प्रस्तुत संपादकांचें मत आहे. त्यास अनुसरून मुंबईकडील जुनीं वाचन पुस्तकें व या प्रांतांतील जुनीं वाचन पुस्तकें यांमधील कांही पाठ तयार केले आहेत. खरें चांगलें वाङ्मय जुनाट व टाकाऊ असें कधींच होत नाही. यामुळे ही सुधारलेली नवीन आवृत्ति विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना अधिक आवडेल अशी आशा आहे.

प्रस्तुत पुस्तकमाला तपासून मंजूर करण्यासाठीं मध्यप्रांत-विद्या-खात्यानें जी खास कमिटी नेमली होती तिने ज्या महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या त्यांबद्दल संपादक तिचे फार आभारी आहेत.

संपादकद्वय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुलभ वाचनपाठमाला

मराठी तिसरें पुस्तक

अनुक्रमणिका



धड्याचें नांव			पृष्ठ
१ सरस्वतीस नमन (कविता)	...	...	१
२ एकीचें बळ–भाग १ ला	...	...	२
३ ,, ,, ,, २ रा	...	...	४
४ भुकाळू पाहुणा ...	...	...	६
५ फुलपाखरूं व पतंग ...	...	...	८
६ काच	...	...	१०
७ विजया (कविता) ...	....	...	१४
८ सोन्याचें ताट ...	....	...	१५
९ स्वच्छ हवा ...	...	...	१८
१० पोष्ट ऑफिस ...	...	...	२२
११ अडचण का सोय ?–भाग १ ला	...	...	२७
१२ ,, ,, ,, ,, २ रा	...	...	२९
१३ खेळ (कविता)	...	...	३१
१४ रस्त्याचे नियम ..:	...	...	३४
१५ रानगवतें व धानगवतें–भाग १ ला	...	...	३७
१६ ,, ,, ,, ,, २ रा	....	...	४०
१७ रामदास स्वामींची गोष्ट	...	...	४३
१८ स्फुट अभंग (कविता)	...	...	४६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धड्याचें नांव पृ

१९ एकनाथांची भूतदया... ... ... ४८
२० वर्षाचे तीन काळ–भाग १ ला ५१
२१ „ „ „ „ २ रा ५३
२२ „ „ „ „ ३ रा ५४
२३ मला काय त्याची पर्वा !–भाग १ ला ... ५६
२४ „ „ „ „ „ २ रा ... ५८
२५ हत्ती–भाग १ ला ६०
२६ „ „ २ रा ६३
२७ माझी काठी (कविता) ६६
२८ निरोगी कसें राहावें ?–भाग १ ला ६८
२९ „ „ „ „ २ रा ७१
३० प्राप्तीचा अर्धा वाटा (नाटक)–भाग १ ला ... ७४
३१ „ „ „ „ „ २ रा ... ७७
३२ आमचें घर (कविता) ८०
३३ वटवाघूळ ८२
३४ पचमढीची सफर ८४
३५ मातीचें तेल ८९
३६ कालियामर्दन (कविता) ९२
३७ कुत्रा व त्याचे भाऊबंद–भाग १ ला... ... ९५
३८ „ „ „ „ २ रा ९८
३९ गूळ वा साखर १००
४० लतिकाताईच्या सुमनची तक्रार (कविता) ... १०४
४१ शिवाजीमहाराज–भाग १ ला १०६
४२ „ „ „ २ रा १०९
४३ गोंड लोक ११२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

	धड्याचें नांव	पृष्ठ
४४	प्रसंगावधान	११६
४५	फिरून यत्न करून पहा !	११८
४६	रानपाखरास (कविता)	१२१
४७	हिवताप व डांस	१२२
४८	खेडेगावाचा कारभार	१२६
४९	भातुकली-भाग १ ला	१३०
५०	,, ,, २ रा...	१३२
५१	राणी दुर्गावती	१३५
५२	चिमुकलें महाभारत-भाग १ ला	१३८
५३	,, ,, ,, २ रा	१४०
५४	,, ,, ,, ३ रा	१४२
५५	मुलींचे शारीरिक खेळ-भाग १ ला	१४४
५६	,, ,, ,, ,, २ रा	१४६
५७	गाई घरा आल्या (कविता)	१४९
५८	शाहूमहाराजांचा थोरपणा	१५१
५९	आमची हिंदभूमि (कविता)	१५३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीसरस्वती



हे सरस्वती ! नमन तुझ्या पदकमलीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुलभ वाचनपाठमाला

मराठी तिसरें पुस्तक

धडा पहिला.

सरस्वतीस नमन.

पद

हे सरस्वती ! नमन तुझ्या पदकमलीं ।
तव ठायीं वृत्ती रमली ॥ ध्रु. ॥

विश्वाची चालक शक्ति,
असशी तूं प्रेमळ मूर्ति
देवादिक तुजला नमिती
गुण गातां रसना थकली ॥ १ ॥

चौसष्ट कला विद्यांला,
शास्त्रगुणीं गुंफुनि माला
गणराज अर्पितो तुजला,
तव चरणीं विद्या रमली ॥ २ ॥

विद्येचा छंदचि ज्याला
तो नमील देवी तुजला
तव कृपाकटाक्षहि पडला
तत्कंठीं विद्या ठसली ॥ ३ ॥

—ना. के. बेहेरे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा दुसरा.

एकीचें बळ.

भाग १ ला.

फार जुन्याकाळची गोष्ट. गोदावरी नदीचे काठीं एक काटेसावरीच्या झाडावर लघुपतनक नांवाचा एक कावळा राहात असे. एके दिवशीं त्याला एक फासेपारधी जाळें घेऊन झाडा जवळून चाललेला दिसला. "कोठें बरें चालला असावा हा?" कावळा मनाशींच म्हणाला व पारध्याचे मागोमाग तो कोणीकडे जातो हें पाहण्यासाठी जाऊं लागला.

थोड्याच वेळाने पारधी थांबला; त्याने आपलें जाळें जमिनीवर पसरलें व थोडे तांदूळ फेकलें आणि स्वतः झाडा आड लपून बसला. कावळा ही मौज बघतच होता.

यानंतर कांही वेळाने पारव्याचा एक थवा आकाशांतून उडत चालला होता. त्या पारव्यांची नजर सहजच खाली पडलेल्या तांदळांच्या दाण्यांकडे गेली. पुष्कळ अंतर उडून आल्यामुळे पारवे चांगले भुकेलेले होते. तेव्हा खाली उतरून ते तांदूळ खाण्याचा त्यांना मोह पडला. पण त्यांचा वृद्ध व अनुभवी राजा चित्रग्रीव म्हणाला, "बाबांनो, अशी घाई करू नका. पाहूं द्या बरें मला हे तांदूळ!" चित्रग्रीवाने अमळ बारकाईने पाहिलें. तो बोलला, "हे तांदूळ मुद्दाम कोणीतरी फेकलेले दिसतात. यांत कांही तरी धोका आहे असें मला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाटतें. तुम्हीं हे तांदूळ खाण्याच्या भानगडींत पडूं नये हें बरें!"

पारव्यांना हें म्हणणें पटलें नाही. त्यांना वाटलें, "म्हाताऱ्या माणसांना उगीच लहानसहान गोष्टींचें भय वाटतें. आम्हांला लागली आहे भूक; अशा वेळीं याचें ऐकून काय फायदा ?" मग त्यांच्यापैकी एक धीट पारवा म्हणाला, "पण महाराज, धाडस करून जीव धोक्यांत घातल्याखेरीज रानांत अन्न कोणाला मिळालें आहे का ?" हें ऐकून चित्रग्रीव गप्प बसला. पारव्यांनी वरून जी झडप मारली तीसरशी ते सर्वजण जाळ्यांत अडकले !

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) वृद्ध पारव्याचें म्हणणें दुसऱ्या पारव्यांना कां आवडलें नाही ? (२) चित्रग्रीव गप्प कां बसला ? (३) लघुपतनक हा कोण ? तो कोठे राहात होता ? (४) कावळा कोणती मौज बघत होता ?

२. समानार्थी शब्द सांगून त्यांचा वाक्यांत उपयोग करा.

भानगड, मोह, अनुभवा, झडप.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा तिसरा.

एकीचें बळ.

भाग २ रा.

आता मात्र पारव्यांना आपली चूक कळून आली. चित्रग्रीवाचा सल्ला न ऐकतां आपण तांदूळ खाण्याच्या नादीं लागलो म्हणून या संकटांत पडलों, असा सर्वांना पश्चात्ताप झाला.

चित्रग्रीव म्हणाला, "मित्रहो, आता असें रडत बसण्यांत शहाणपणा नाही. हिंमत धरा व यांतून मोकळे होण्याच्या उद्योगाला लागा."

पारवे म्हणाले, "बरोबर आहे महाराज. आम्ही आपल्या उपदेशाप्रमाणे वागावयास तयार आहों; आम्हांला या जाळ्यांतून सुटण्याची युक्ति तर कांहीच सुचत नाही."



चित्रग्रीव म्हणाला, "घाबरूं नका. आता मी सांगतों तसें करा. तुम्ही सर्वजण एकोप्याने वागाल तर ही युक्ति साधेल. आपण सर्व एकदम या जाळ्यासकट वर उडूं व तसेच उडत उडत दूर जाऊं. व्हा तर तयार. मी हू असें म्हटलें की सारेजण एकदम उडा!"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पारव्यांनी बरोबर तसें केलें व जाळ्यासकट ते आकाशांतून भरारी मारूं लागले. हें पाहून पारधी त्यांच्या मागोमाग धावत सुटला. पण पारव्यांनी अशी भरारी मारली की, लवकरच ते पारध्याच्या नजरेच्या पलीकडे गेले. तेव्हा निराश होऊन पारधी परत फिरला.

पारवे म्हणाले, "येथपर्यंत सर्व ठीक झालें; पण आता जाळ्यांतून कसें सुटावयाचें ?"

चित्रग्रीव म्हणाला, "माझा मित्र हिरण्यक नांवाचा उंदीर येथून जवळच एका बिळांत राहतो. तेथपर्यंत आपण जाऊं. तो आपणांस जाळयांतून सोडवील."

त्याप्रमाणे ते गेले. फार दिवसांनी आपला मित्र चित्रग्रीव भेटल्यामुळे हिरण्यकास फार आनंद झाला. मग चित्रग्रीवाच्या सांगण्याप्रमाणे हिरण्यकाने आपल्या दातांनी जाळें कुरतडून सर्व पारव्यांची त्यांतून सुटका केली.

कावळा दुरून ही सर्व मौज पाहात होता. तो म्हणाला, "शाबास ! एकीचें बळ व मैत्रीचें फळ हें असें असतें. आता सर्व कावळ्यांना ही गोष्ट सांगून मी त्यांना एकीचें महत्त्व समजावून देईन."

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) पारव्यांना कोणती चूक कळून आली ? (२) रडत बसण्यांत शहाणपणा कां नाही ? (३) संकटांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सापडलें असतां कसें वागावें ? (४) पारव्यांची सुटका कोण व कशी केली ? (५) 'एकीचें बळ व मैत्रीचें फळ' कसें असतें ह्याचा खुलासा करा.

धडा चवथा.

भुकाळू पाहुणा.

एका झोपडींत एक फकीर राहात असे. एके दिवशीं एक प्रवासी लांबून थकला भागलेला त्याच्याकडे आला व म्हणाला, "फकीरसाहेब, आजची रात्र भोजन व आसऱ्याला जागा द्याल, तर अल्ला तुमचें भलें करील."

फकीर--मोठ्या आनंदाने. माझ्या या झोपडींत जें मिळेल तें मी आपल्या सेवेला हाजर करतों.

फकिराने जेवणाची तयारी केली व ताटांत पाचसहा रोट्या आणून त्या पाहुण्यापुढे ठेवल्या आणि वरण आणण्यासाठी म्हणून तो झोपडींत गेला. परत येऊन पाहातो तों पाहुण्याने रोट्या खाऊन फस्त केल्या होत्या. म्हणून वरण वाढून आणखी थोड्या रोट्या आणण्यासाठी तो आंत गेला. पुनः येऊन पाहातो तों वरणाचा पत्ता नाही. पाहुण्याने त्याचा केव्हाच समाचार घेतला होता ! फकीर फिरून आंत गेला वा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऱ्याने आणखी वरण आणलें. पण पाहतों तों रोट्या आणल्या तोंपर्यंत वरणाचा निकाल झाला होता. वरण व रोटी यांची गांठच पडेना.

पण त्या भल्या फकिराने कंटाळा केला नाही. सुमारे दहा हेलपाटे होऊन पंचवीस एक रोट्या व पातेलेंभर वरण यांचा फन्ना पडल्यावर मात्र पाहुण्याची भूक अमळ शांत झालाशी दिसली.

फकीर—आपणास कोणीकडे जावयाचें आहे ?

पाहुणा—बुखारा येथे.

फकीर—काय बरें काम आहे आपलें तेथे ?

पाहुणा—बुखारा येथे एक नामांकित हकीम आहे असें मी ऐकलें आहे, त्याला माझी तब्येत दाखवावी असें मनांत आहे.

फकीर—(आश्चर्याने) काय तुमची प्रकृति दाखवायची आहे ! काय झालें आहे तुम्हांला ?

पाहुणा—अहो काय सांगूं ! अलीकडे माझी भूक फार मंद झाली असून अन्नाला चव ती कशी लागतच नाही !

फकीर—खरेंच की काय ? ईश्वर करो व तुम्हांला वैद्याच्या औषधाने आराम पडो. आणखी माझ्यासाठी सुद्धा मी अल्लाला एक प्रार्थना करणार आहे.

पाहुणा—ती कोणती ?

फकीर—प्रार्थना अशी की, वैद्याचें औषधपाणी घेऊन आपली भूक ताळ्यावर आली म्हणजे आपण परत जाल, त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेळीं आपणाला दुसऱ्या एखाद्या रस्त्याने जाण्याची बुद्धि व्हावी !

प्रश्न

१. खरें किंवा खोटें हें लिहा.

(१) वरण व रोटी यांची गांठच पडेना.—

(२) पाहुण्याची भूक फार मंद झाली होती.—

२. स्मृति चांचणी—(१) फकीराने कोणती प्रार्थना केली कां ? (२) प्रकृति ताळ्यावर येणें म्हणजे काय ? (३) भुकाळू पाहुण्यापासून काय शिकाल ?

धडा पांचवा.

फुलपाखरूं व पतंग.





बागेंत फुलें फुललीं म्हणजे या फुलावरून त्या फुलावर उडणारीं सुंदर फुलपाखरें पाहण्याची फार मौज असते. अहाहा, काय ते त्यांचे मोहक व चित्रविचित्र रंग ! एकसारखें त्यांज-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडे पाहात बसावें असें वाटतें. त्यांचें शरीर अत्यंत मऊ असतें. जरा धक्का लागला की तें चिरडून जातें !

मुंग्या, माशा वगैरे प्राण्यांप्रमाणें फुलपाखरांची व पतंगांची गणना किड्यांमध्येच होते. यांना सहा पाय व चार पंख असतात. बहुतेक सर्व किड्यांचीं चार रूपांतरें होतात, त्याप्रमाणे फुलपाखराचीहि होतात. तीं अंडें, अळी अथवा सुरवंट, कोशावस्था व फुलपाखरूं हीं होत. अंडीं फुटतांच त्यांतून अळ्या बाहेर पडतात. कोणत्या तरी झाडाच्या पानावर त्या जगतात. कांही दिवसांनी ह्या अळ्या सुस्त झाल्यासारख्या होतात व त्यांच्याभोवती एक वेष्टण (कोसा) तयार होतें. नंतर कांही दिवसांनी या कोशांतून एक सुंदर फुलपाखरूं निघतें. मग तें बागेंतील फुलांवर नाचूं बागडूं लागतें. थोड्या दिवसांपूर्वी वळवळणाऱ्या अळ्यांपासून इतकें सुंदर फुलपाखरूं निघालें असें सांगितलें, तर खरें देखील वाटणार नाही; पण हें कोणासहि प्रत्यक्ष पाहतां येईल !

पतंग वा फुलपाखरूं यांत पुष्कळ सारखेपणा आहे, पण त्यांत कांही ठळक फरक आहेत. पतंगाचा रंग चित्रविचित्र नसून साधा असतो. दुसरें असें की, पतंग बहुधा रात्रीं उडतात. त्यांना प्रकाश फार आवडतो. म्हणून ते दिव्यावर झडप घालतात व पुष्कळ वेळां जळून मरतात. फुलपाखरांपेक्षा पतंगांचा आकार मोठा असतो. त्यांचा कोसलाहि मोठा असतो.

ज्यापासून रेशीम तयार होतें त्या किड्यांपासून शेवटी एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पतंगच बाहेर पडतो. हे किडे बहुधा तुतीच्या झाडावर जगतात. आपणांस जें मिळतें तें निद्रावस्थेंत असलेल्या अळीच्या कोशांपासून मिळतें. एरंडाच्या पानावर जगणाऱ्या किड्यांच्या कोशांपासूनहि एक प्रकारचें रेशीम निघतें. हें तितकें चांगलें नसतें.

पतंग च फुलपाखरें यांचें आयुष्य फार तर एखाद दुसरा दिवस च असतें.

प्रश्न

(१) कृतिपर—फुलपाखरूं व पतंग यांचीं चित्रें काढा, रंग द्या.
(२) पतंग व फुलपाखरूं यांच्यांत कोणता फरक आहे ?
(३) अळीपासून फुलपाखरूं कसें होतें हें सांगा.

धडा सहावा.

काच.



बाबांनी नागपुराहून नुकतेंच कांही काचेचें सामान आणलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें, दोन मोठे बिलोरी आरसे, टेबलावर ठेवण्याकरितां दोन फुलदाण्या, दिनूकरितां एक सुंदरशी दौत, यमूकरितां एक छोटा आरसा व मुरंब्याच्या दोन बरण्या.

"अहाहा ! काय छानदार वस्तु आहेत ह्या !" मुलें म्हणालीं. दिनूने आपली दौत शेजारच्या नागू व भिकूस दाखवली व बाबांनी आणलेले जिन्नस त्यांना दाखवण्यास तो घेऊन आला.

यमूच्या हातांतला आरसा पाहण्याची नागूला इतकी घाई झाली की, ती "अरे, अरे ओरडत असतां त्याने आरसा तिच्या हातून ओढन घेतलाच. पण घेतां घेतां तो खाली पडला व फुटून त्याचे तुकडे झाले ! यमूने मोठ्याने रडण्यास सुरवात केली."

बाबा—यमू आता रडून काय उपयोग ? नागू, काच ठिसूळ असते व पडल्याबरोबर फुटते हें तुला माहीत नव्हतें का रे ? काचेच्या वस्तु सुंदर खऱ्या, पण त्यांना फार जपावें लागतें.

नागू—खरें बाबा, माझ्या हातून चूक झाली, पण का हो, काच म्हणजे चकचकीत दगडच ना ?

बाबा—दगड नव्हे. पण वाळु व गारगोटीचा दगड यांचा भट्टींत घालून रस तयार केला म्हणजे त्यापासून काच बनते. आपल्या प्रांतांत नागपूर, गोंदिया येथे काचेचे कारखाने आहेत. आपल्या घराच्या खिडक्यांना काचेचीं तावदानें कां लावलीं आहेत हें तुला सांगतां येईल का ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिकू—हो त्यांतून पलिकडचें दिसावें म्हणून. आमच्या घराच्या खिडक्यांना साधीं लाकडी फळ्यांचीं झडपें आहेत. त्या बंद केल्या म्हणजे आंत उजेड च येत नाही.

बाबा—शाबास. काच पारदर्शक असते. म्हणजे तिच्यांतून आरपार दिसूं शकतें. प्रकाश व ऊन तर आंत यावें; पण थंडगार वारा लागूं नये, अशी सोय काचेच्या तावदानांनी होते. यमू, काचेच्या बरण्यांचा उपयोग तुला सांगतां येईल का ?

यमुना—हो ! काचेच्या भांड्यांत पदार्थ कळकत नाही व स्वच्छ राहतो ! यामुळेच मुरंबे, सरबतें वगैरे पदार्थ त्यांत ठेवतात.

बाबा—बरोबर ! काचेचा आणखी कोणता बरें महत्त्वाचा उपयोग आहे ? ही पहा या दिव्याची चिमणी. ती काढून घेतली तर काय होतें पहा बरें !

मुलें—याचा उजेड मंद झाला व धूरहि फार निघूं लागला; यामुळे जिकडे तिकडे काजळ पडून कपडे खराब व्हावयाचे.

बाबा—शाबास ! आणखी देखील काचेचे कांही उपयोग आहेत. हा पहा माझा चष्मा. याने मला स्वच्छ दिसतें, हें पहा, दुसरें एक भिंग. याच्याखाली मी एक मुंगी ठेवली आहे. पहा बरें कशी दिसते ती !

मुलें—अबब ! ती मुंगी तर झुरळापेक्षा मोठी दिसते.

बाबा—असल्याच भिंगांच्या दुर्बिणी करतात. त्यांतून आपणांस दूरचे पदार्थ स्पष्ट दिसतात. सूक्ष्मदर्शक यंत्रेंहि अशाच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिंगांचीं करतात. त्यांतून साध्या डोळ्यांनी मुळीच न दिसणारे कित्येक पदार्थ आपणांस अगदी स्पष्ट व फार मोठे दिसतात.

काच फार उपयोगी पदार्थ असून बरीच स्वस्त आहे; त्यामुळे गरीबगुरिबांनाहि ती थोडी बहुत घेतां येते ! नाही तर औषधाच्या बाटल्या, बांगड्या, आरसे वगैरे घेणें पुष्कळांना शक्य झालें नसतें !

प्रश्न

१. खरें किंवा खोटें हे लिहा——

(१) काच ठिसूळ असते———

(२) काच स्वस्त नसते———

२. स्मृति चांचणी——(१) काच कशाची करतात ? (२) काचेचे उपयोग सांगा ? (३) सूक्ष्मदर्शक यंत्राचा उपयोग काय ?

३. शब्दांचा वाक्यांत उपयोग करा——

पारदर्शक, अचव, तावदान.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा सातवा.

विजया.

पद्य



रम्य किती हें चित्र मनोहर विजया बालेचें।
सुंदरशा या वदनिं तियेच्या मुग्ध हास नाचे।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुंतल कुरले भालिं शोभती विरल दंत वदनीं ।
बोल बोबडे ऐकावेसें वाटे चोरोनी ॥
पह खेळते पाण्यामध्ये तन्मय होवोनी ।
ऐशा वेळीं तिला लागतें जवळीं ना कोणी ॥
चंद्रकोर ही गमे खेळते स्थिरशा पाण्यांत ।
रम्य दृश्य हे आनंदोर्मी उठवी हृदयांत ॥
गुलाब कलिका गमे उमलली वाटे चुंबावी ।
परमेशाने अखंड आम्हां हृदयीं ठेवावी ॥
मुग्ध हास्य हें उदंड राहो बाले ! तव वदनीं ।
किती तरी मी ऐशीं गाणीं गाइन तुजवरुनी ॥

—यशोदासुत.

धडा आठवा.

सोन्याचें ताट.

एकदा काशीक्षेत्रीं श्रीविश्वनाथाच्या मंदिरांत शिवरात्रीची यात्रा जमली होती. मंदिराच्या आवारांत माणसांची चिकार गर्दी झाली होती.

इतक्यांत एक मोठा आवाज झाला; आकाशांत वीज चमकावी तसें कांही चमकलें व मंडळी जमली होती तेथे एक लखलखीत सोन्याचें ताट घेऊन पडलें !

मंदिराचें मुख्य उपाध्याय पुढे आले व त्यांनी तें ताट निरखून पाहिलें, त्यावर असें लिहिलें होतें की, "खऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्यवान माणसाला हें मिळालें तरच सोन्याचें राहील, नाही तर तें लोखंडाचें होईल."

उपाध्याय म्हणाले, "लोकहो, ऐका! तुम्हांपैकी जो खरा पुण्यवान असेल त्याने हें घेऊन जावें."

प्रथम एक सावकार पुढे आला. तो दानधर्मांत पुष्कळ पैसा खर्च करीत असे; यामुळे आपण पुण्यवान आहों अशी त्याला खातरी होती. त्याने ताट उचललें. पण त्याच क्षणीं तें लोखंडाचें बनलें! हें पाहून सावकार अगदी खट्टू झाला व त्याने ताट खाली ठेवलें. त्याबरोबर तें पुनः सोन्याचें झालें.

नंतर एक विद्वान् ब्राह्मण पुढे आला. तो दिवसांतला बहुतेक वेळ संध्या, पूजा वगैरेंत घालवी. लोक त्याला फार पुण्यवान समजत व त्याच्या पायां पडत. लोक म्हणाले, "भटजी, आपण उचलावें हे ताट." ब्राह्मणाने तें उचललें, पण काय? लगेच तें लोखंडाचें बनलें. त्याने खाली ठेवतांच पुनः सोन्याचें झालें!

असें आणखी कांही लोकांनी केलें; पण तितक्या वेळां तें ताट फिरून लोखंडाचें झालें.

इतक्यांत देवदर्शनासाठी एक गरीब माणूस दूर देशाहून आला. देवळाच्या आवाराबाहेर एक आंधळा भिकारी भुकेने व्याकूळ होऊन "गरिबाला थोडें अन्न द्या हो," म्हणून ओरडत होता. सोन्याच्या ताटाकडे सर्वांचें लक्ष! विचाऱ्या आंधळ्याला कोण विचारतो? पण या नवख्या माणसाने

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मात्र प्रथम आपल्याजवळची मिठाई त्या आंधळ्याला दिली व मनांत देवाची प्रार्थना केली, देवा, अशा दीनदुबळ्यांवर दया कर व त्यांना मदत करण्याची बुद्धि आम्हांला दे."

मग तो मंदिराच्या आवारांत गेला. तेव्हा एक थट्टेखोर माणूस या नवख्या माणसास म्हणाला, "काय हो पाहुणे, तुम्ही कां नाही पाहात हें ताट उचलून ?"

पाहुणा म्हणाला, "मला गरिबाला कसें तें मिळेल ? माझें पुण्य कोठचें येवढें असावयाचें ?"

पण तो थट्टेखोर ऐकेना. तो म्हणाला, "पहा पहा हो ! तुमचें काय जातें त्यांत ? इतक्या लोकांनी हात लावला तसा तुम्ही लावा !"

"बरें बाबा ! तुझें समाधान का होईना !" असें म्हणून पाहुण्याने ताट उचललें. तो काय चमत्कार ! तें ताट सोन्याचें तर राहिलेंच, पण पूर्वीहून जास्त लकाकूं लागलें !

इतक्यांत आकाशवाणी झाली, "पहा, लोक हो ! प्राण्यांवर दया करणें हेंच खरें पुण्य आहे !"

प्रश्न

१. चूक किंवा बरोबर हें लिहा—

(१) सावकाराने ताट उचलतांच तें सोन्याचें राहिलें.—

(२) ताट पाहुण्याला मिळालें.—

२. विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा—पुण्यवान, आंधळा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. स्मृति चांचणी—(१) खरें पुण्य कोणतें? (२) श्रीविश्वनाथाच्या देवळांत कोणता चमत्कार झाला? विद्वान् ब्राह्मणाला ताट कां मिळालें नाही?

धडा नववा.

स्वच्छ हवा.

जानबा गवंडी एके दिवशीं सकाळी वैद्यबुवांच्या घरीं धावतच आला व धापा टाकीत बोलला,

"वैद्यबुवा, कृपा करून माझ्या घरीं चला. माझा मुलगा कालपासून तापाने फणफणला आहे; व आता त्याचा जीव अगदी घाबरा झाला आहे. चला लवकर पहा त्याला."

वैद्यबुवा लगेच अंगरखा पागोटें घालून जानबाच्या घरीं गेले.

जानबाचें घर कांही तसें वाईट नव्हतें. पण मुलाला तापांत वारा लागेल या भीतीने त्याने दारें, खिडक्या सर्व बंद करून टाकल्या होत्या. यामुळे दिवसाढवळ्या खोलींत अंधार पडला होता व दिवा लावावा लागला होता. मुलाला थंडी वाजून ताप आलेला; तेव्हा खोली गरम ठेवण्यासाठी जानबाने एक रसरशीत निखाऱ्यांची शेगडी मुलाच्या बिछान्याशेजारींच ठेवली होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्यबुवा हें पाहून चकित च झाले. ते म्हणाले, "अहो, त्या खिडक्या अगोदर उघडा. माझा जीव या कोंडलेल्या हवेने घाबरा झाला आहे ; मग आजारी मुलाचा जीव घाबरा होईल यांत नवल काय ? तशेंच ही शेगडी न्या पाहूं येथून दूर !"

जानबाला वैद्याचें बोलणें फारसें आवडलें नाही ; पण करतो काय ? मुकाट्याने त्याने खिडक्या उघडल्या व शेगडी काढून नेली, तों काय चमत्कार सांगावा ! मुलगा जो इतका वेळ कासावीस झाला होता, त्याला थोडा आराम वाटलासें दिसलें.

वैद्यबुवा--पाहिलेंत जानबा ! तुमच्या मुलाला हुशारी वाटूं लागली. त्याच्या अंगांत या वेळीं ताप नाही फारसा. पण हवेविना त्याचा जीव घाबरा होत होता.

हवेची जरूर प्रत्येक माणसाला किती असते हें तुम्हांला माहीत नाही असें दिसतें. अन्नपाण्यावाचून प्राणी कित्येक दिवस जगूं शकेल ; पण हवेशिवाय तो दहा पांच मिनिटांत मरेल. एवढी जरूरीची वस्तु असून हवा आपणांला फुकट वाटेल तितकी मिळते. पण तुम्हाला तिची किंमत कळेल तेव्हा ना ? स्वच्छ अन्न पाणी ; हें तर आरोग्याला जरूरीचें आहे. पण स्वच्छ हवा त्याहून अधिक जरूरीची आहे. आपण श्वासोच्छ्वास करतो तेव्हा आपणांस शुद्ध व स्वच्छ हवा मिळाली तरच आपण निरोगी राहूं.

जानबा--पण वैद्यबुवा, हवा बिघडण्याचें कारण काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्यबुवा—हवा बिघडण्याला कारणें अनेक होतात, पहिलें कारण प्राण्यांचा श्वासोच्छ्वास, आपण बाहेर सोडतों ती हवा अशुद्ध व विषारी असते. समजा, एका लहानशा खोलींत पांचपंचवीस माणसें बसलीं व दारें, खिडक्या बंद आहेत, तर थोड्याच वेळांत तुम्हांला गुदमरल्यासारखें होऊन डोकें फिरूं लागेल. मागे एका किल्लेदाराने सुमारे दीडशें कैद्यांना एका लहानशा कोठडींत रात्रभर कोंडून ठेवलें, सकाळीं उठून पाहतात तों त्यांतील बहुतेक माणसें मरून पडलीं होतीं ! बिचारीं हवेविना गुदमरून मेलीं.

दुसरें कारण आग. कोणताहि पदार्थ जळूं लागला म्हणजे तो भोवतालची स्वच्छ हवा खाऊन टाकून विषारी हवा बाहेर टाकीत असतो. ही गोष्ट ठाऊक नसल्याने अनेक अपघात झाले आहेत. एका बाईने खोलींत मूल निजविलें व त्याला थंडी लागूं नये म्हणून दारें खिडक्या बंद करून, आंत भली मोठी शेगडी पेटवून ठेवली; व ती बाहेर गेली. परत येऊन पाहाते तों मूल मरून पडलेलें !

जानवा—खरेंच की काय ! मग तुम्ही मघाशीं शेगडी दूर काढविली याच साठीं काय ?

वैद्यबुवा—यांत काय संशय ? अहो आजारी माणसाला तर शुद्ध हवेची गरज इतरांपेक्षा जास्त असते. व ती तर तुम्ही आपल्या मुलाला मुळीच मिळूं देत नव्हता. घरांत नेहमी हवा खेळती राहिली पाहिजे. नाहीतर एकीकडून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्वासोच्छ्वास व आग यांनी हवा बिघडावी ; व बाहेरून शुद्ध हवा मात्र आंत येऊं नये असा बंदोबस्त ! मग रोग्याने घाबरें होऊं नये तर काय करावें ?

घराप्रमाणे घराच्या आसपासची हवा देखील स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करावा. घराच्या आसपास घाण केरकचरा गुरांचें शेणमूत, पालापाचोळा हीं सर्व साचत असलीं व तीं हळू हळू सडूं लागलीं, म्हणजे त्यांपासून दुर्गंध येऊं लागते व तिच्यांतून विषारी हवा बाहेर पडते. यासाठी असले पदार्थ घराच्या आसपास सांचूं देऊं नयेत. शहरांत ही सर्व घाण, कचरा काढून, रस्ते नाल्या साफ ठेवण्याचें काम म्युनिसिपालिट्या करतात. खेड्यांत तशी सोय नसते ; पण गावच्या लोकांनी मिळून याची तजवीज केली पाहिजे. प्रत्येकाने आपलें घर स्वच्छ ठेवावें. त्याच्या आसपास घाण पाणी सांचूं देऊं नये. अशा तुंबलेल्या पाण्यांतच डास उत्पन्न होतात व त्याने हिवताप सुरू होतो.

असो, आता ध्यानांत ठेवा की, ज्या घरांत शुद्ध मोकळी हवा व सूर्यप्रकाश हीं भरपूर असतील त्या घरांत आरोग्य नांदतें.

जानबाने वैद्याचे आभार मानले व त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागण्याचें कबूल केलें.

प्रश्न

१. उलट अर्थाचे शब्द लिहा—

(१) विषारी— (२) दुर्गंध—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(३) निरोगी— (४) पेटविणें—

२. कारण सांगा.

(१) जानवाच्या मुलाचा जीव घाबरा झाला. कारण —

(२) स्वच्छ हवा अन्नपाण्यापेक्षाहि अधिक महत्त्वाचं आहे. कारण—

धडा दहावा.

पोष्ट ऑफिस.

गोविंदराव एके दिवशीं मुलांशीं गप्पागोष्टी करीत बसले होते ; इतक्यांत पोष्टाचा शिपाई दारांत आला. दिनू धावतच गेला व त्याने पोष्टमनच्या हातून पत्रें घेऊन गोविंदरावांस दिलीं.

पत्रें वाचून झाल्यावर गोविंदराव म्हणाले, "मुलांनो, तुमच्या मामाचें पत्र आलें आहे. ते उद्यां येथे येणार आहेत."

मुलांना मामा येणार म्हणून फार हर्ष झाला.

मनी—बाबा, येथे मुंबईहून पत्र कसें येतें हो ? व तें कोण आणतें ?

गोविंदराव—सांगतों हं. पण मला तुम्ही प्रथम हें सांगा की, पत्रें पाठवावीं व यावीं असें तुम्हांला कां बरें वाटतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिनकर—पत्रें आलीं म्हणजे आपल्याला दूरच्या मंडळींचा समाचार कळतो. कोणी येणार असलें तर तसें कळवितां येतें.

गोविंदराव—शाबास, पण आणखी कांही उपयोग आहेत का ?

शामू—हो, मी सांगतों. गतवर्षीं काका इंदूरास फार आजारी पडले होते. त्यांचें पत्र आलें, तेव्हा आजीला तिकडे पाठविलें तुम्हीं. हा मोठा उपयोग आहे, नाही का ?

गोविंदराव—आणखी उपयोग आहेत याचे, पत्रांनी व्यापारी लोक मुंबई, कलकत्ता, विलायत अशा दूर देशांहून माल मागवितात.

मनी—पण हीं पत्रें नेण्याआणण्याची काय तजवीज करतात ?

गोविंदराव—हे काम करण्यासाठी सरकारने एक स्वतंत्र खातें ठेवलें आहें, त्याला पोष्टखातें असें म्हणतात.

पत्र लिहून झाल्यानंतर प्रथम काय करावें लागतें हें तुम्हांला माहीत आहे काय ?

दिनकर—होय, प्रथम तें पोष्टाच्या पेटींत टाकावें लागतें.

गोविंदराव—बरोबर. मोठ्या शहरांत अशा पेट्या अनेक असतात. लहान गावीं फक्त पोस्ट ऑफिसांत एक पेटी असते. जेथे पोस्ट ऑफिस नाही अशा गावीं सुद्धा एखादी पेटी ठेवतात. पण पत्रें या पेटींत टाकलीं म्हणजे पुढें काय होतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वसंत—एक शिपाई येतो व हीं पत्रें काढून नेतो असें मीं एकदा पाहिलें आहे.

गोविंदराव—बरोबर. गावांतील सगळीं पत्रें पेट्यांमधून पोस्ट ऑफिसांत नेतात. मग तेथे जे कामगार असतात ते पत्रांची वर्गवारी करतात. उदाहरणार्थ, मुंबईकडे जाणारीं पत्रें एकीकडे, कलकत्त्याकडे जाणारीं दुसरीकडे, दिल्लीकडे जाणारीं तिसरीकडे अशीं त्यांची वेगवेगळीं पुडकीं तयार करतात, व शेवटी तीं थैल्यांमध्ये घालून बाहेरगावीं रवाना करतात. बहुतेक पत्रें हल्ली आगगाडीने रवाना होतात. पण जेथे आगगाडी नसेल तेथे मोटारीने, तांग्याने, अगर दौडणाऱ्या माणसांकडून रवाना होतात. आगगाड्या व मोटारी यांनी आता पत्रें फार जलद पोंचतात. मुंबईचें पत्र हें पहा कालच रवाना झालें व आज आपणांस चारशें मैलांचे अंतरावर येथे मिळालें! पूर्वीच्या काळीं माणसांबरोबर पत्रें पाठवावीं लागत त्या वेळीं दूरच्या स्थळीं पत्रें पोचायला महिना दोन महिने सुद्धा लागत. शिवाय खर्च फार येई. आता तीन पैशांत एक कार्ड व पांच पैशांत एक लिफाफा वाटेल तितक्या दूर जाऊं शकतो!

वसंत—पण का हो बाबा? पत्रावर हीं तिकिटें कसलीं लावतात!

गोविंदराव—ही तिकिटें पत्र पोचविण्याबद्दल जें भाडें सरकार घेतें, त्यांची खूण होय. पत्राच्या अथवा पार्सलच्या वजनाप्रमाणे कमी जास्ती हाशील पडतें. तें देण्यासाठी आप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

णांस तितक्या किंमतीचीं तिकिटें पत्रावर लावावीं लागतात.

दिनकर—पण का हो ? हे ह्या पत्रावर कसले शिक्के मारले आहेत ?

गोविंदराव—पत्र रवाना करण्यापूर्वी पोस्टांत प्रत्येक पत्रावर त्या तारखेचा व पोस्टाच्या नांवाचा शिक्का मारतात. तसाच पत्र ज्या स्थळीं पोचतें तेथील पोचलेल्या तारखेचा शिक्का मारतात. असें केल्याने पत्रें केव्हा रवाना झालीं व केव्हा पोचलीं हें समजतें जर वाजवीपेक्षा उशीर झाला, तर आपणांस अधिकाऱ्यांकडे तक्रार करतां येते. मग ते चौकशी करून ज्याची हयगय असेल त्यास दंड करतात.

पोस्टाकडून नुसतीं पत्रेंच जातात असें नाही, तर पार्सलें व पैशाच्या मनीआर्डरीहि जातात. जितके पैसे आपणांस पाठवावयाचे असतील त्याचा आंकडा व ज्याला पाठवावयाचे असतील त्याचें नांव व पत्ता एका फार्मावर लिहून पैसे पोस्ट-मास्तरांचे हवालीं करावे. म्हणजे मास्तर आपणास एक पावती देतात, पैसे ज्याचे त्यास पोचते होतात व त्याजकडून आलेली पावती ही आपणास मिळते.

पत्रावरील व मनीआर्डरीवरील पत्ता मात्र बिनचूक व पूर्ण लिहिला पाहिजे. नाहीतर पत्रें पोचण्यांत गडबड होते.

पोस्ट ऑफिस आणखीहि कांही कामें करतें, तारेने फारच जलद बातमी पोचते. तिचें खातें वेगळें आहे, पण बहुतेक जागीं दोहोंचें ऑफिस एकच असतें; व तारमास्तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि पोस्टमास्तर एकच माणूस असतो. तारांमुळे व्यापाऱ्यांचे तर फारच सोय होते.



पोस्टांत लोकांचे पैसे ठेवून घेऊन त्यावर थोडें व्याज देण्याची तजवीज सरकारने केली आहे. याला 'सेव्हिंग्ज् बँक' म्हणतात. यांत पैसा ठेवल्याने सुरक्षित राहतो; त्याची हळू हळू वाढ होते; व अडचणीचे वेळीं तो आपणांस मिळतो!

किती बरें उपयोगी खातें आहे हें! थंडी असो, पाऊस असो; नियमितपणें येऊन आपलीं पत्रें व पार्सलें पोचविणारा पोस्टमन आपणा सर्वांचा मित्रच नाही काय?

प्रश्न

१. पोष्ट ऑफिस कोणतीं कामें करतें?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. खरें की खोटें हें लिहा.

(१) पोष्टांतून शंभर आंब्याचें पार्सल पाठवितां येतें.—

(२) तारेने बातमी फारच जलद पोचते.—

३. कृतिपर—मनीआर्डर फार्म भरून दाखवा.

४. कारण सांगा.

(१) सेव्हिंग्ज् बँकेंत पैसे सुरक्षित राहतात. कारण —

(२) पोष्टमन आपणा सर्वांचा मित्रच आहे. कारण—

धडा अकरावा.

अडचण का सोय ?

भाग १ ला.

"कंटाळलों बुवा. केव्हाचा मी हें उदाहरण सोडवितो आहे, पण सुटेल तर शपथ ! मला वाटतें मला गणित कध्धी कध्धी यावयाचें नाही !" विनू अगदी वैतागून म्हणाला.

जवळच त्याची आई कांही शिवणकाम करीत बसली होती. ती अमळ हसून म्हणाली.

"कध्धी कध्धी नाही येणार हे ? विनू तुझ्यापेक्षा मंद बुद्धीच्या मुलांनासुद्धा गुणाकार बरोबर करतांना मी पाहिलें आहे. मग तुला न यावयाला काय झालें ? पाहूं तुझें उदाहरण काय आहे तें ?"

विनूः—बघ, वर चार आकडे व खाली दोन. चार वेळा मीं करून पाहिलें हें उदाहरण. पण उत्तर जमतच नाही.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आईः—पण तुला पाढे नीट येतात का ? पाहूं दे ; मला गुणाकारांतील पहिला आकडा काय आहे ? सात. येतो का साताचा पाढा तुला ? म्हण पाहूं.

विनू पाढा म्हणूं लागला. सातासत्ते जवळ येतांच त्याची गडबड होऊन तो म्हणाला, "सातासत्ते सत्तेचाळीस !"

आईः—हं ! विनू, सांपडली तुझी चूक. पाहिलेंस एकूण पन्नासाच्या जागीं सत्तेचाळीस मांडलेस तर पुढचें उत्तर कसें बरोबर येईल ?

विनूः—खरेंच आई ! माझी पाढा म्हणण्यांत चूक झाली खरी. पण मला नाही ते पाढे पाठ होत. ही पाढ्यांची आणि गणिताची नसती पीडा तर काय बहार झाली असती !

आईः—ही पीडा नव्हे, हे आपले पंख आहेत !

विनूः—म्हणजे ? मी नाही समजलों !

आईः—मी तुला याची एक मौजेची गोष्टच सांगतें, म्हणजे पाढे आपले पंख कसे तें तुझ्या लक्ष्यांत येईल.

"गोष्ट" म्हटल्याबरोबर विनूला फार हर्ष झाला व आपली पाटी-पेन्सिल बाजूला ठेऊन तो आईच्या जवळ येऊन बसला.

प्रश्न

१. चूक किंवा बरोबर हें लिहा—

(१) विनू अगदी आनंदाने म्हणाला.—

(२) गोष्ट म्हटल्याबरोबर विनूला हर्ष झाला.—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. खालील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा—
हर्ष, वैतागून, पीडा.

३. स्मृति चांचणी—(१) विनू कां कंटाळला होता ? (२) विनूचें उत्तर बरोबर कां येत नव्हते ? (३) विनूला हर्ष कां झाला ?

धडा बारावा.

अडचण का सोय ?

भाग २ रा.

फार जुन्या काळची गोष्ट. त्या वेळीं पक्ष्यांचे पंख आताप्रमाणे त्यांच्या अंगाला चिकटलेले नव्हते, उडण्याच्या वेळीं त्यांना ते आपल्या अंगाला बांधून घ्यावे लागत.

दर खेपेला हे बांधून घ्यावयाचा त्यांना कंटाळा येई चिमणी म्हणाली. "नको हे ओझें मला; त्याशिवाय टुणटुण उड्या मारण्यांतच मौज वाटते !"

कबूतरानेहि तिच्याच म्हणण्यास दुजोरा दिला.

मोर म्हणाला, "माझे पंख व पिसें सुंदर आहेत खरीं पण मी त्यांच्या वजनाला व लांबीला कंटाळलों बुवा !"

पंखांचा उपयोग करावयाचा नाही, असें सर्वांनी विचार करून ठरविलें. चिमणी ऐटीने टुणटुण उड्या मारीत दाणे टिपूं लागली. कबुतरें, चंडोल, मोर, बगळे जमिनीवरच नाचूं फिरूं लागले. पण उंच भरारी मारणारी घार व गरुड म्हणालीं. "ओझें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमी झालें खरें ! पण आकाशांत सहल करण्याची मौज कांहीं वेगळीच आहे. निदान एक तरी पंख लावून पाहूं बरें."

तसें करतांच त्यांना आढळून आलें की, एका पंखानें थोडें बहुत उडतां येतें खरें; पण एक तर फार वर व सरळ जातां येत नाही गिरक्या घेत घेत तिरपें उडावें लागतें.

इतक्यांत त्या पक्ष्यांच्या नजरेस आणखी एक गोष्ट आली. चिमणीवर एका मांजराने एकदम झडप मारून तिला गट्ट केलें ! बिचारीला त्या वेळीं आपल्या पंखांची आठवण झाली, पण काय उपयोग ?

शेवटी, ओझें असलें तरी पंख हे आपणास उपयोगी आहेत अशी जेव्हा खात्री पटली, तेव्हा पक्ष्यांनी फिरून पंख बांधून घेण्यास सुरवात केली !

इतकी गोष्ट सांगून आई थांबली; तेव्हा विन्नू म्हणाला, "हें सर्व ठीक झालें; पण त्याचा माझ्या पाठ्यांशीं काय संबंध ?"

"सांगतें. पंखांशिवाय पक्ष्यांना जसें उडतां येत नाही, तसें माणसांनाहि पाठ्यांशिवाय उडतां येत नाही. 'उडणें' म्हणजे व्यवहारांत उपयोगी अशा कित्येक गोष्टी करतां येणें. बाजारांत जा व भाजी, धान्य, तूप, साखर असे पदार्थ घेऊन ये, असें तुला सांगितलें; आणि तुला साधे पाढेहि येत नसतील तर वाणी तुला सहज फसवूं शकेल ! शिवाय तूं परवां म्हणालास ना की मला मोठा एंजिनियर होऊन पूल, इमारती वगैरे बांधावयास शिकावयाचें आहे म्हणून !"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"हो हो ! मी तर मोठीं आगगाडीचीं एंजिनें तयार करण्याचें काम शिकणार !"

"शाबास. अशी हिंमत बाळगावी. पण हे तुझे पुढचे वेत पाढे शिकला नाहीस तर कसे साधावयाचे ? एंजिनियरला तर गणिताची फारच जरूर लागतें !"

"खरें की काय ? तर मग मी आता पाढे व गणित मन लावून शिकेन."

प्रश्न

१. अशुद्ध शब्द शुद्ध लिहा—

धान्य, चीमनी, कटाळा, इंजनेर, पखाची, वेवहार, वझे, माजर.

२. स्मृति चांचणी—(१) विनूच्या आईने कोणती गोष्ट सांगितली ? ती तुम्ही वर्गांतील मुलांना सांगा. (२) चिमणी मांजरीला कशी सांपडली ? (३) पंख नसल्यामुळे घार, गरुड यांना माज कां वाटत नव्हती ?

३. कृतिपर—चित्रें काढा—

घार, चिमणी, गरुड, बदक, मोर, बगळा.

धडा तेरावा.

खेळ.

श्लोक.

केला रवीने निजताप दूर,
वाहे हराया श्रम हा समीर ;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें सृष्टि-सौंदर्य खुलें तुम्हाला
ठेवीतसे देव पहावयाला ॥ १ ॥
घेऊन माथां फल-पुष्प भार
द्याया तुम्हां तोष तरू तयार ;
शाळेंतलें काम करून सारें
खेळावयालागिं निघा, चला रे ! ॥ २ ॥
खेळूं नका केवळ गंजिफांचे
ते खेळ गादीवर बैसण्याचे ;
त्या सोंगट्या भांडण लावितातीं,
होई न तत्संगति सौख्य-दाती. ॥ ३ ॥
पळा, पळा ! कोण पुढे पळे तो
पाहूं बरें ! कोण थकून जातो
की खेळ खेळा तुम्हि लंगडीचा,
चित्तास वाटे जरि तो मजेचा. ॥ ४ ॥
गडी विभागा, अथवा समान ;
होऊनियां खुंट बसा जपून,
खो देउनियां उठवा गड्याला ;
अर्धे करा यत्न पळावयाला ॥ ५ ॥
कोंडींत अर्धे अथवा चला या
बाहेर अर्धेहि निघा पळाया,
घेऊनियां सूर धरा गड्याला,
ह्या सूरकोंडीं रमवा मनाला. ॥ ६ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खेळांमधी खेळ तथापि पाट्या,
व्यायाम देण्यास तयार, मोठ्या,
साऱ्या गड्यांना श्रम सारखाच;
म्हणूनि खेळांमधि खेळ हाच! ॥ ७ ॥
बालत्व आहे वय वाढण्याचें,
स्नायूंस सामर्थ्य चढावयाचें;
ते खेळ देतात सुखें तुम्हांला,
खेळा तरी टाकुनि आळसाळा. ॥ ८ ॥

—मो. ग. लोंढे.

प्रश्न

१. पुढील अर्थाच्या कविता पाठ म्हणा—
(१) गंजिफा, सोंगट्या यांच्या खेळामुळे भांडणें होतात.
(२) आट्यापाट्या साऱ्या गड्यांना सारखाच व्यायाम देणारा खेळ आहे.

२. टिपणें लिहा—
खंट, सुरकोंडी, सुरपाटी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा चौदावा.

रस्त्याचे नियम.

एकदा मी नागपूरच्या गंजीपेठ मोहोल्ल्यांतून इतवारी बाजाराकडे जात होतों. बरोबर वसंत व शरद हे दोघे होते. जातां जातां एके ठिकाणीं बरीच गर्दी जमलेली दिसली. जवळ जाऊन चौकशी करतां असें समजलें की, तेथे रस्त्यावरच कांहीं मुलें विटीदांडूने खेळत होतीं ; इतक्यांत एका बाजूने पों पों करीत मोटार आली. मोटार फार वेगांत होती. मोटारवाल्याने जोराने पोंगा वाजविला. मुलें पण खेळण्यांत खूप गुंग झालीं होतीं. त्यांना मोटार आल्याचें कळलेंसुद्धा नाहीं. मोटारवाला हिंमतवखा होता. वेळेवर ब्रेक दाबून मोटार थांबविण्याचें त्यास सुचलें नाही. शेवटी त्याने खूप जोराने ब्रेक दाबला; पण मोटार थांबण्यापूर्वीच ती एका मुलाचे अंगावरून गेली, व एका क्षणांत मुलाचा प्राण गेला ! आम्हीं तेथे पोचण्यापूर्वीच मुलाचें प्रेत तेथून नेलें होतें. आता पोलिस येऊन त्या बाबतींत चौकशी करीत होते व मोटारवाल्याची जबानी घेत होते.

वसंत——काय हो तात्या, हे मोटारवाले किती वाईट असतात ! आता आम्हांला रस्त्याने जावयाची सोय नाही म्हणावयाची ?

मी——असें कां बरें म्हणतोस ? कदाचित् हा मोटार-ड्रायव्हरनवखा व घाबरट असेल. पण सगळेच तसे नसतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिवाय त्याने देखील पोंगा मोठमोठ्याने वाजविला असें आताच तूं ऐकलेंस ना ?

वसंत—होय; पण मुलें खेळण्यांत गुंग झालीं होतीं.

मी—असतील. पण भर रस्त्यामध्ये अशा रीतीनें खेळणें हा त्यांची मुख्य चूक होय. नागपूरसारख्या शहरांत आता शेकडों मोटारी झाल्या आहेत; शिवाय हजारों तांगे, गाड्या यांची रहदारी सुरू असते. अशा ठिकाणीं बेधडक रस्त्यावर खेळणें म्हणजे वेडेपणा नव्हे काय ? शिवाय रस्त्याने जातांना देखील माणसांनी फार सावधपणें गेलें पाहिजे. विशेषेंकरून जेथे वळण असेल तेथे फारच जपावें लागतें. कारण बाजूने येणाऱ्या मोटारी अगर तांगे अशा वेळीं जाणाऱ्याला दिसत नसतात. याविषयी काही महत्त्वाचे नियम आहेत.

शरद—ते कोणते ?

मी—नियम दोन प्रकारचे. (१) पहिला प्रकार मोटारी व गाड्या हाकणाऱ्यासाठी—त्यांनी नेहमी रस्त्याच्या डाव्या बाजूने गाडी चालवली पाहिजे असा कायदा आहे. मागून किंवा पुढून येणाऱ्या गाड्यांसाठी वाट करून देतांना त्यांनी डावीकडे वळलें पाहिजे. रस्त्यांत थांबावयाचें असल्यासहि डाव्या बाजूकडे थांबावयाचें. वळणावर अगर चौरस्त्यावर गाडी उजवीकडे वळवावयाची असेल, तर आपला उजवा हात बाहेर काढून आपण उजवीकडे जात आहों अशी खूण ड्रायव्हरनेकेली पाहिजे. नाहीतर तो कोणीकडे वळण घेणार आहे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें दुसऱ्यांना कळणार नाही व गाड्यांच्या टकरा होऊन अ
घात होतील.

(२) पायीं चालणाऱ्यासाठी नियमः--

जेथे रस्त्याच्या बाजूने पायवाटा केलेल्या असतील ते
पायवाटेनेच जावें. रस्त्याच्या मध्यावरून कधी चालूं नये
भररस्त्यांत कधी उभे राहूं नये. नेहमी रस्त्याच्या कडेने चाला
मुलांनी विशेषेंकरून पुढील नियम लक्षांत ठेवले पाहिजेः--

१ भररस्त्यांत खेळूं नका.

२ मोटारीच्या रस्त्यांवर दगड, विटा, लाकडें वगैरे टा
नका. तसे केल्याने एखादे वेळीं मोटारीचें चाक उलथून गाडी
अंगावर येण्याचा संभव असतो.

३ रस्ता ओलांडण्यापूर्वी मोटार वगैरे येत आहे की काय,
हें पाहण्यास विसरूं नका; व ती मोटार अथवा गाडी निघून
जाईपर्यंत रस्ता ओलांडूं नका.

मुलांनो, येवढे नियम लक्ष्यांत ठेवले म्हणजे मग सहसा
अपघात होणार नाही.

प्रश्न

१. आठवणीची चांचणी--

(१) पायीं चालणाऱ्यांनी कोणते नियम लक्ष्यांत ठेवावे ?

(२) मोटार, सायकल चालविणाऱ्यानी कोणते नियम
लक्ष्यांत ठेवावे ?

(३) मुलांनी रस्त्यांत कां खेळूं नये ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. खरें असेल तेथे √ अशी व चूक असेल तेथे × अशी खुण करा.

(१) भररस्त्यांत खेळूं नये.

(२) रस्ता ओलांडण्यापूर्वी मोटार, गाडी वगैरे पाहूं नये.

धडा पंधरावा.

रानगवतें व धानगवतें.

भाग १ ला.

आषाढ श्रावणाचे दिवस होते. पाऊस चांगला पडून गेला होता व एक दोन दिवस उघाड होती. अहमदभाई मुलाला घेऊन शेताकडे गेले होते.

शेतांत धान्याचीं रोपें वीत दीड वीत उगवून आलीं होतीं. पण त्यांच्या बाजूने गवतहि बरेंच वाढत चाललें होतें. तें काढण्यासाठी डवरा चालला होता.

हसन—बाबा हे शेतकरी काय करीत आहेत हो ?

अहमदभाई—ते डवऱ्याने गवत काढीत आहेत. याला डवरणी म्हणतात; केव्हा हाताने व विळ्याने गवत उपटून काढतात, त्याला निंदणी म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हसन--पण गवत काढलें नाही तर काय होईल ?

अहमदभाई—चांगला प्रश्न केलास. झाडें आपलें अ मुळांनी खातात. ज्या झाडांना अन्न मिळावें अशी आपली इच्छ असेल. त्यांखेरीज इतर झाडें जर त्यांच्या शेजारीं उगवलीं त तीं सर्व अन्न आपणच खाऊन टाकतील व आपण लावलेल झाडांना उपाशी राहावें लागेल. ज्वारी, बाजरी, कपाश यांचीं मुळें या गवताच्या मुळांपेक्षा नाजूक असतात. ग तांचीं मुळें आपलें अन्न शोधण्याकरितां चारी बाजूस पस तात. मग त्यांचीच वाढ झपाट्याने झाल्यावर अन्नरस धान्यांच्य रोपांना कसा मिळणार ?

हसन--पण बाबा, शेतकरी दरसाल डवरणी, निंदण करतात ना ? मग हे इतकें गवत कसें उगवतें ?

अहमदभाई--याचें कारण असें आहे की, गवताचें बी आपोआप जमिनींत पडतें व त्यापासून गवत वाढतें. पिकांपेक्ष गवताची वाढ लवकर होते व पिकास फुलें येऊन बीं धरण्या पूर्वीच गवतास फूलें येऊन बीं धरतें; आणि तें पीक कापाव याच्या पूर्वीच वाळून जमिनीवर पडून मातींत मिसळून जातें अर्थात् फिरून पाऊस पडला की, गवत उगवलेंच ! म्हणून गवताचा नाश करण्यासाठी शिकस्त करावी लागते.

हसन--मग गवत म्हणजे एक उपद्रव आहे म्हणावयाचा ?

अहमदभाई (हसून)--केवळ असेंच नव्हे. पिकांमध्ये उगवणारें गवत उपद्रव करतें हें खरें. पण गवतांपैकी कांही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकारचीं गवतें बरींच उपयोगी आहेत. ही पहा हरळी अथवा दूर्वा; हा दुसरा प्रकार मारवेल. गुरें असलीं गवतें फार आवडीने खातात व पावसाळ्यांत हा चारा त्यांना चांगला मानवतो. जनावरांना उपयुक्त चारा मिळावा म्हणून कांही रानें मुद्दाम पडीत ठेवतात; म्हणजे त्यांत धान्य वगैरे न पेरतां गवत वाढूं देतात. अशा रानांस कुरणें म्हणतात. हें पहा दुसरें



काडीचें गवत ! कोवळें असतांना हें गुरें खातात व वाळलें म्हणजे त्याचा उपयोग घरांवर छपरें बांधण्यास चांगला होतो. कांही जातीच्या गवतांच्या मुळ्या सुवासिक असतात. जसें खस अथवा वाळा. हा थंड पाण्यांत घातला म्हणजे छानदार वास लागतो. याचें अत्तरहि काढतात. नागरमोथ्याच्या मुळ्या औषधाला उपयोगी पडतात. लव्हाळ्याच्या चटया छान होतात. मुंजाच्या दोऱ्या वनवतात व त्याने खाटा विणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

१. क्रम लावा--

(१) डवऱ्याने गवत काढणें, शेत नांगरणें, कापणी करणें पेरणें.

(२) खस वास लागतो वाळा थंड अथवा पाण्यांत हा छानदार म्हणजे घातला.

२. कारणें लिहा--

(१) पिकांतील गवत निंदून किंवा डवरणीने काढावें लागतें कारण—

(२) दरसाल डवरणी, निंदणी करतात, तरी गवत उगवतेंच. कारण—

धडा सोळावा.

रानगवतें व धानगवतें.

भाग २ रा.

हसन--पण बाबा हीं ज्वारीचीं रोपेहि जवळ जवळ गवतासारखीं च दिसतात ?

अहमदभाई--बरोबर ओळखलेंस. आपण जीं अनेक धान्यें खातों तीं अनेक प्रकारच्या गवतांचीं बियेंच आहेत ! हा पहा जोंधळ्याचा धांडा व ही गवताची काडी ; दोहोंचीं पानें सारखींच आहेत. लहान मोठीं एवढाच फरक. धांड्यास जशीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांडीं व पेरें आहेत तशींच गवताच्या काडीसहि आहेत. हा धांड्याच्या शेंड्याचा तुरा पहा. तो गवताच्या तुऱ्यासारखाच आहे ना ? दोहोंच्या मुळ्या पहा; दोहोंत सारखेपणा आहे ना ?





हसन—होय; दिसतो खरा. पण गवताचीं बियें बारीक व हलकीं असतात व धान्यें तर जड असतात हे कसें ?

अहमदभाई—याला कारण माणसांची मेहनत ! गहू, तांदूळ, जोंधळा वगैरे धान्यें माणसें हजारों वर्षें खात आलीं आहेत. म्हणून त्यांची लावणी करतांना निवडक बीं, चांगली जमीन, खात वगैरे मिळत गेलीं व धान्यांचें बीं दिवसेंदिवस सुधारत गेलें. गरीब लोक कोदो, कुटकी वगैरे जीं धान्यें खातात त्याचें बीं गवतासारखेंच बारीक असतें. कोकणाकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरी व नाचणी हीं धान्यें अशाच जातीचीं असतात. वरीला आपण भगर म्हणतों. या धान्यांना तृण धान्यें (गवताचें धान्यें) असें म्हणतात. तें योग्यच आहे. गवताचा आणखी एक प्रकार तुला माहीत आहे ना ? त्याच्यापासून आपणास गूळ व साखर मिळतात.

हसन--(थोडा गोंधळून) म्हणजे, ऊस की काय ? खरेंच, हें नव्हतें माझ्या लक्षांत आलें. एकंदरीत आपण बऱ्याच अंशीं गवतावर जगतों म्हणावयाचें !

अहमदभाई--यांत काय संशय ?

प्रश्न

१. एकच नांव द्या--

(१) गहू, तांदूळ, जोंधळा. (——)

(२) वखरणें, नांगरणें, खत देणें. (——)

२. स्मृति चांचणी--(१) आपण बऱ्याच अंशीं गवतावर जगतों तें कसें ? (२) कोकणांत गवताच्या जातीचीं कोणतीं धान्यें होतात ? (३) जोंधळा, गहू यांचीं बियें गवताच्या बियांपेक्षा जड कां असतात ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा सतरावा.

रामदास स्वामींची गोष्ट.

भाग १ ला.

गोदावरी नदीच्या काठीं जांब म्हणून एक गाव आहे. तेथे सूर्याजीपंत नांवाचे एक गृहस्थ होते. ते गावचे कुळकर्णी होते. त्यांना दोन मुलगे होते. थोरल्याचें नांव गंगाधर व धाकट्याचें नारायण. हा धाकटाच पुढे 'रामदास' या नांवाने प्रसिद्धीस आला.

वयाच्या पांचव्या वर्षीं दोघांच्याहि मुंजी झाल्या. नंतर लवकरच सूर्याजीपंत वारले व दोन्ही मुलें लहानपणींच पोरकीं झालीं.

पूर्वीं मुलांचीं लग्नें फार लहानपणींच करीत. त्याप्रमाणे गंगाधराचें लग्न सातव्या वर्षींच झालें. तसेंच नारायणाचें लग्नहि लवकर उरकावें असें त्याच्या आईने (राणूबाईने) ठरविलें.

नारायणास मात्र हा बेत मुळीच आवडला नाही. आपण पुष्कळ विद्या शिकून व तप करून मोठा साधु व्हावें अशी त्याची इच्छा होती. यामुळे आपल्या लग्नाचा बेत चालूं आहे असें कळतांच त्याने पळ काढला. वडील भावाने कशीबशी त्याची समजूत करून त्यास परत आणलें. लग्नाचें 'सुमुहूर्त सावधान' होईपर्यंत आपण स्वस्थ बसूं असें नारायणाने वचन दिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढे लग्न ठरलें. सर्व तयारी झाली. मुहूर्ताची वेळ आली तेव्हा अंतरपाट धरून ब्राह्मणांनी मंगलाष्टकें म्हणण्यास सुरवात केली. "सुमुहूर्त सावधान" असे शब्द ऐकतांच नारायणाने विचारलें, 'याचा अर्थ काय ?' तेव्हा ब्राह्मणांनी सांगितलें "आता संसाराची बेडी तुमच्या पायांत पडली. आता 'सावध असावें !" हे शब्द ऐकतांच नारायणाने ताडकन उडी मारून पळ काढला, तो हां हां म्हणतां दिसेनासा झाला. सगळ्यांनी शोध केला; पण पत्ता लागला नाही.

नारायण जो पळाला तो थेट नाशिकजवळ पंचवटीस गेला. तेथून जवळच टाकळी येथील गुहेंत राहून स्नान-संध्या व श्रीरामनामाचा जप करण्याचा क्रम त्याने बारा वर्षें चालू ठेवला. याप्रमाणे बारा वर्षें जपतप करण्यांत घालवून पुढे नारायण तीर्थयात्रेस निघाला. काशीपासून रामेश्वरापर्यंतची सर्व पवित्र तीर्थें त्याने पाहिलीं. यामुळे त्याला पुष्कळ नवीन माहिती मिळाली; व लोकांच्या स्वभावाचें चांगलें ज्ञान झालें, बारा वर्षांत ही तीर्थयात्रा आटोपून तो पुन्हा पंचवटीला आला.

इकडे बिचारी राणूबाई मुलाच्या काळजीने आंधळी झाली होती. माझा मुलगा नारायण मला केव्हा भेटेल, असें तिला झालें होतें. पंचवटीहून गोदावरी नदीची प्रदक्षिणा करण्यास नारायण निघाला, तेंव्हा वाटेंत जांब येथे मुद्दाम थांबून त्याने आपल्या मातेचें दर्शन घेतलें. त्यावेळचा तिचा आनंद काय सांगावा ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही प्रदक्षिणा आटोपल्यावर नारायण कृष्णा नदीच्या काठीं चाफळ येथे येऊन राहिला. भिक्षा मागून राहावें, व लोकांना धर्माचा उपदेश करावा असा क्रम त्याने सुरू केला. पुढे तर फार मोठे साधु म्हणून त्यांचा लौकिक झाला. म्हणून लोकहि त्यांना 'समर्थ रामदासस्वामी' असें म्हणूं लागले.

रामदास हे साधु तर खरेच. पण त्यांचा उपदेश व्यवहारांतहि फार उपयोगी असा आहे. "दासबोध" या ग्रंथांत त्यांचा सर्व उपदेश आला आहे. हा ग्रंथ तुम्ही पुढे अवश्य वाचा.

समर्थांचा लौकिक ऐकून श्रीशिवाजीमहाराजहि पुढे त्यांच्या दर्शनास गेले व त्यांनी समर्थांचा उपदेश घेतला.

पुढे साताऱ्यानजिक परळी येथील किल्ला दुरुस्त करून तेथे रामदासांनी श्रीरामचंद्राचें मंदिर बांधलें. या किल्ल्यास त्यांनी 'सज्जनगड' असें नांव दिलें. येथे च ते अखेरपर्यंत राहिले. त्यांची समाधि सज्जनगडास आहे.

"मरावें परी कीर्तिरूपें उरावें" हा आपला उपदेश त्यांनी आपल्या आचरणाने खरा करून दाखविला !

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) नारायण 'रामदास' कसा बनला ? हें थोडक्यांत लिहा. (२) 'सावधान' याचा अर्थ काय ? (३) रामदासाने कोणता ग्रंथ लिहिला ? (४) दासनवमी कोणत्या महिन्यांत येते ? (५) 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें' हें रामदासाने कसें खरें करून दाखविलें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. चुकीचीं वाक्यें खोडा—

(१) सूर्याजीपंताने नारायणाचें लग्न केलें.

(२) नारायण काशीजवळ पंचवटीस गेला.

(३) श्रीशिवाजीमहाराजांनी समर्थांचा उपदेश घेतला.

धडा अठरावा.

स्फुट अभंग.

(१) जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥
साधु तोचि ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥
ज्यासी आपंगिता नाही । त्यासी धरी जो हृदयीं ॥
दया करी जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥
तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ति ॥

(२) आंधळ्यासी जन अवघेचि आंधळे ।
आपणासी डोळे दृश्य नाही ॥
रोगीयासी विषतुल्य हें मिष्टान्न ।
तोंडासी कारण चवी नाही ॥
तुका म्हणे शुद्ध नाही जो आपण ।
तया त्रिभुवन अवघें खोटें ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(३) कां रे नाठवीसी कृपाळू देवासी ।
पोसीतो जगासी एकलाची ॥
फुटे तरुवर उष्णकाळ मासीं ।
जीवन तयासीं कोण घाली ?
वाळा दुग्ध कोणी केलेंसे उप्तत्ती ।
वाढवी श्रीपति सर्वें दोन्ही ॥
तेणें तुझी काय नाही केली चिंता ।
राहे त्या अनंता आठवूनी ॥
तुका म्हणे त्याचें नांव विश्वंभर ।
करा निरंतर ध्यान त्याचें ॥

(४) कन्या सासुरासी जाये । मागे परतोनी पाहे ॥
तैसें झालें माझ्या जिवा । कधी भेटसी केशवा ॥
चुकलीया माये । बाळ हुरू हुरू पाहे ॥
जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥

—तुकाराम

प्रश्न

(१) 'जो स्वतःच खोटा त्याला सारें जग खोटें दिसतें. या अर्थाचा अभंग पाठ म्हणून दाखवा.

(२) कन्या सासुरी जाते तेव्हा तिच्या मनाची स्थिति कशी होते हें वर्णन करा.

(३) परमेश्वराला 'विश्वंभर' कां म्हणतात ? हें स्पष्ट करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा एकोणिसावा.

एकनाथांची भूतदया.

"भूतांची दया हे भांडवल संता"—श्रीतुकाराम.

प्राणिमात्रांवर दया करणें हाच खरा धर्म असें पुष्कळ सांगतात व आपण ऐकतों. पण तसें आचरण करणारे महात्मे विरळेच सांपडतात. म्हणून त्यांना आपण श्रेष्ठ समजतों. अशा श्रेष्ठ साधूंत पैठणचे श्रीएकनाथ यांची गणना होते. भूतदया त्यांच्या अंगीं किती बाणली होती. हें पुढील गोष्टीवरून समजून येईल.

× × ×

(१) एकनाथ एकदा तीर्थयात्रेस गेले होते. काशीहून गंगेच्या पाण्याने भरलेली कावड घेऊन रामेश्वरास समुद्रांत टाकावयाची अशा उद्देशाने ते निघाले होते. वाटेंत एका ठिकाणीं ते उतरले. तेथे एक गाढव पाण्याविना कासावीस होऊन तडफडत आहे असें त्यांना दिसलें. दिवस उन्हाळ्याचे व त्या ठिकाणीं अगदी पाण्याचा दुष्काळ होता. नाथांना जवळपास पाणी मिळण्याची आशा दिसेना. गाढवाची कासाविशी पाहून त्याचें मन द्रवलें व त्यांनी चटकन आपल्या गंगेच्या कावडींतील पाणी काढून त्या गाढवास पाजलें. गाढव शांत होऊन निघून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेलें. जवळच्या इतर यात्रेकरूंना हा प्रकार चमत्कारिक वाटला. ते म्हणाले, "नाथ, हे काय गंगेची कावड रामेश्वरास न्यावयाची ना ? गाढवास पाजावयाची हें काय ?"



(एकनाथ गाढवास पाणी पाजीत आहेत.)

एकनाथांनी उत्तर केलें, "हाच माझा रामेश्वर ! पोचली माझी कावड रामेश्वराला !"

× × ×

(२) पैठणास रोजचा गोदावरीवर स्नानास जाण्याचा नाथांचा नित्यक्रम होता. उन्हाळ्यांत एके दिवशीं भर दुपारीं त्यांना स्नान करण्याचा प्रसंग आला. स्नान करून परत येतांना घाटावर एक महाराचें दोन तीन वर्षांचें मूल उन्हांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घाबर होऊन रडत असल्याचें दिसलें, नाथ थांबले व त्यांनी मूल कोणाचें म्हणून चौकशी केली. मूल महाराचें असून त्याच्या आईची चुकामूक झाली आहे असें त्यांना समजलें. नाथांना त्या मुलाची कीव आली. त्यांनी मुलाला चटकन् उचलून कडेवर घेतलें. महारवाड्यांत जाऊन त्याच्या घराचा पत्ता लावला व मूल आईबापांच्या स्वाधीन केलें.

"जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥"

ही साधुवर्य तुकारामाची उक्ति एकनाथांस बरोबर लागू पडत नाही काय ?

प्रश्न

१. स्मृति चांचणी--(१) तुकारामाची कोणती उक्ति एकनाथांस बरोबर लागू पडते ? ती पाटीवर लिहा. (२) एकनाथाला महाराचा विटाळ होत नव्हता. हें खरें कशावरून (३) एकनाथाने काशीची गंगा रामेश्वरास कशी पोचविली

२. उलट अर्थाचे शब्द लिहा--

श्रेष्ठ, धर्म, दुष्काळ, महात्मा.

३. समानार्थी शब्द लिहा--

चुकभूल, कीव, कासावीस, भूतदया.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा विसावा.

वर्षाचे तीन काळ.

भाग १ ला.

चैत्र महिन्याचे दिवस होते ते. सदू जगदळे याने आपल्या मुलाला भाकरी घेऊन शेतांत पोचविण्यास सांगितलें होतें. गावापासून शेत सुमारे अर्धा मैल लांब होतें. सकाळचे दहा-वाजण्याच्या सुमारास हरि भाकरी घेऊन शेतांत पोचला. पण त्यावेळीं इतकें ऊन कडक पडलें होतें की, हरीचा जीव अगदी घाबरा झाला, अंगांतून घामाच्या धारा वाहूं लागल्या होत्या, हुशू हुशू करून त्याने एकादाचें भाकरीचें गोठोडें बापापुढे ठेवलें व तो म्हणाला.

"बाबा ! किती वाईट उन्हाळा हा ! आताच किती ऊन कडक पडलें आहे पहा ! दुपारचें तर तोंड घराबाहेर काढवत नाही, दिवसभर हुशू हुशू करीत बसावें लागतें, सारखी तहान लागते व किती पाणी प्यालें तरी पुन्हा तहान आहेच !"

सदू--खरे आहे; पण उन्हाळ्याखेरीज आपलें कसें चालेल ? उन्हाळ्यांत जेव्हा जमीन चांगली तापते तेव्हाच ती नांगरणीला सोईची होते. दुसरें असें की, उन्हाने पाण्याची वाफ होऊन जर वर गेली नाही, तर ढग व पाऊस तरी कोठून येणार ?

हरी--हें मात्र खरें, पण आता भाकरी खावयाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ना ? (मग दोघांनी मिळून न्याहारी केली. मडक्यांतील थंडगार पाणी पिऊन हरि अगदी खुष झाला.) सदू म्हणाला, "हरी, ही थंड पाण्याची मजा उन्हाळा नसता तर मिळाली असती काय ? तसेंच झाडांना हिरवीगार पालवी फुटून तीं आता कशी सुंदर दिसत आहेत. शिवाय हे आंब्याचे दिवस. कच्च्या कैऱ्यांचें लोणचें, रायतें तर आपण खातोंच हल्ली. पण थोड्याच दिवसांत आंबे पिकून भाकरीबरोबर आमरस मिळेल आपणांला; तसेंच काकड्या, टरबुजें व खरबुजें खाण्याची मौजहि याच दिवसांत असतें."

हरि--हो, उन्हाळ्यांतहि मौज असते खरी !

प्रश्न

१. योग्य शब्द ठेवून चुकीचे शब्द खोडा--

(१) उन्हाळ्याचे दिवसांत आंबे, काकड्या, सीताफळें, टरबुजें हुरडा, पेरू खाण्याची मौज असते.

(२) हरि गाठोडें, पाटीदप्तर, कडबा, भाकरी घेऊन शेतांत गेला.

२. स्मृति चांचणी--(१) उन्हाळा कोणत्या महिन्यांत असतो ?

(२) सदूने उन्हाळ्यास वाईट कां म्हटलें ?

(३) उन्हाळ्यापासून कोणते फायदे आहेत ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा एकविसावा.

वर्षाचे तीन काळ.

भाग २ रा.

उन्हाळा संपला. आषाढ महिना आला. आकाशांत ढग जमून जोराने पाऊस पडूं लागला. नद्या, तळीं पाण्याने तुडुंब भरून गेलीं. रस्त्यांत जिकडे तिकडे चिखल झाला. हरीचा संध्याकाळचा खेळ वारंवार बंद पडूं लागला. हरि अगदी चिडला व म्हणाला, "किती वाईट हा पावसाळा! मला नाही आवडत."

सदू (हसून) म्हणाला--

"हरी, पावसावर रागावून कसें चालेल? तुझें खेळणें अमळ बुडालें म्हणून तूं रागावतोस पावसावर. पण एक वर्ष पाऊस पडलाच नाही तर काय अनर्थ होईल हे माहीत आहे का तुला? धान्य पिकणार नाही; नद्या, तळीं आटून जातील; झाडें, गवतें सुकून जातील; माणसें, जनावरें व पक्षी यांना पाणी मिळणार नाही; मग सर्वांचा नाश होईल!"

हरि--खरें आहे बाबा तुमचें म्हणणें. पावसाळ्यावर रागावण्यांत चूक केली खरी!

सदू--आणखी पावसाळ्यांत भोवतालचा देखावा तरी किती सुंदर दिसतो थोड्या! दिवसांपूर्वी रानें कशी रखरखीत दिसत होतीं; पण आता पहा कशीं हिरवींगार दिसत आहेत तीं! जनावरांची तर आता चैन झाली आहे. त्यांना आता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुबलक हिरवें गवत मिळत आहे ! भाजीपाल्यांची सुद्धा चंगळ असते या दिवसांत.

हरि—खरेंच मी नाही आता पावसाळ्याला नांवें ठेवणार !

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) उन्हाळा कधी संपतो ? (२) उन्हाळ्यानंतर कोणता काळ येतो ? (३) पाऊस पडला नाही तर कोणता अनर्थ होईल ?

२. शब्दांचा वाक्यांत उपयोग करा—

चंगळ, तुडुंब, अनर्थ, देखावा, रखरखीत.

३. कारणें सांगा—

(१) सदू पावसावर फार रागावला. कारण—

(२) सदू म्हणाला, आता पावसाळ्याला नांवे ठेवणार नाही. कारण——

धडा बावीसावा.

वर्षाचे तीन काळ.

भाग ३ रा.

आणखी कांही दिवस गेले. पाऊस बंद झाला. आकाश स्वच्छ झालें. नद्यांचें, तळ्यांचें पाणीहि निर्मळ झालें; ज्वारी, बाजरी, कापूस वगैरे पिकें वाळून कापणी मळणीस तयार झालीं. हळू हळू थंडी चमकूं लागली व पुढे खूप गारठा पडूं लागला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतका की, सकाळचे प्रहरीं हरीला आंथरुणांतून बाहेर पडवेना. सदू म्हणाला, "हरी, लवकर ऊठ आज आपल्या वावरांत धान्याची मळणी सुरू होणार आहे. आपण सर्व तिकडेच जाणार आहों."

हरीला उठावयाचें अगदी जिवावर आले. तो म्हणाला, "काय वाईट हिवाळा हा ! पांघरुणांतून अंग बाहेर काढलें की, कांकडायला लागतें. आम्हाला निदान पांघरुणें तरी आहेत पांघरायला. काल मी रस्त्यावर एक भिकारी पाहिला. तो विचारा थंडीने कुडकुडत होता. किती बरें त्याचे हाल होत असतील या दिवसांत !

सदू--होय, थोडें खरें आहे तुझें बोलणें. गरिबांना हे दिवस जरा कठीण जातात. पण एकंदरीने हाच काळ सर्वांत उत्तम. या दिवसांत नवीन धान्यें तयार होतात. थंडीच्या दिवसांत भूक उत्तम लागते, अन्नाला चव लागते, एकंदरीने प्रकृति उत्तम राहाते. कामधाम करण्याला उत्साह असतो. थकवा लवकर येत नाही. हुरडा खावयाची, वनभोजनास जावयाची मजा या दिवसांत जशी असते, तशी इतर ऋतूंत नसते.

हरि--खरेंच बाबा ! एकूण प्रत्येक ऋतूंत कांही वाईट व कांही चांगलें असें असतेंच म्हणावयाचें !

सदू--अगदी बरोबर बोललास. देवाने हे जें ऋतूंचें रहाटगाडगें चालूं ठेवलें आहे, तें आपल्या उपयोगासाठीच आहे. उन्हाळा, पावसाळा व हिवाळा हे तीन्ही ऋतु आळीपाळीने

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri .

नियमित येतात; म्हणून तर आपलें सर्व जीवन व्यवस्थितपणे चालतें.

प्रश्न

१. खालील वाक्यांचा अर्थ स्पष्ट करा--

(१) जिवावर आलें.

(२) थंडी चमकूं लागली.

२. स्मृति चांचणी--(१) आता कोणता ऋतु चालूं आहे? (२) हिवाळ्यांत कोणती मौज असते? (३) तुम्हांला कोणता ऋतु आवडतो? कां?

घडा तेविसावा.

मला काय त्याची पर्वा!

भाग १ ला.

एक कुत्रा होता. तो स्वभावाने फार आप्पलपोट्या आणि गर्विष्ठ होता. लोकांना किती का त्रास होईना! माझी चैन चालली पाहिजे असें त्याला वाटे.

त्याला एकदा वाटलें, की आपण थोडा प्रवास करावा व जग कसें आहे हें पहावें. म्हणून तो आपलें गाव सोडून निघाला.

जातां जातां एके ठिकाणीं "अहो, मी बुडत आहे, मला कोणी तरी बाहेर काढा-" असे शब्द त्याच्या कानीं आले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असळ पुढे जाऊन पाहातो तों एका नदींत एक बकरा पडून बुडूं लागला होता. कुत्र्याला चांगलें पोहतां येत होते. पण तो बकऱ्याच्या मदतीस धावला नाही. "अः ! मला काय त्याचें !" असें म्हणून पुढे चालूं लागला.

बकरा पाण्याच्या धारेबरोबरच थोड्या उथळ जागीं गेला. मग तो उडी मारून बाहेर आला व निघून गेला.

कुत्रा पुढे चालला. कांही वेळाने त्याला भूक लागली. "काय बरें खावें ? असा विचार करीत असतां जवळच एका घरांत एक मांजर थाळींतील दूध पीत आहे असें त्याला दिसलें. कुत्रा घरांत शिरला व मांजरीला दरडावून म्हणाला,

"हं ! खबरदार. दूध मला पाहिजे आहे,"—विचारें मांजर ! तें मुकाट्याने मागे हटलें. "कुत्रोबा ! दया करा व मजसाठी थोडें तरी दूध ठेवा. माझा मालक मला येवढेंच दूध देतो" असें मांजराने नम्रपणाने सांगितलें. पण कुत्रा म्हणाला, "जा रे ! मला काय त्याची पर्वा ! त्याने सारें दूध पिऊन टाकलें."

असें किती एक दिवस चाललें. वाटेंत जातांना एक गाय, एक पक्षी, एक वडाचें झाड यांनी कुत्र्याची कांही ना कांही मदत मागितली. पण कुत्र्याचें आपलें एकच उत्तर, "मला काय त्याचें !" कोणाच्याहि उपयोगी न पडतां तो पुढे चालला.

प्रश्न

१. होय किंवा नाही हें सांगा—

(१) कुत्रा स्वभावाने [illegible] होता ?—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) मांजरीने कुत्र्याला आनंदाने दूध दिलें ?———

२. उलट अर्थाचे शब्द लिहा——

(१) आप्पलपोट्या——— (२) गर्विष्ठ———

(३) दरडावून——— (४) उथळ———

धडा चोविसावा.

मला काय त्याची पर्वा !

भाग २ रा.

पुढे त्याला एक जंगल लागलें व चालतां चालतां थकून एका ठिकाणीं तो झोपीं गेला. झोपेंत त्याला स्वप्न पडलें, ते असें:— "एक लांडगा आपणाला धरून मारूं लागला आहे. महाराज, दया करा व माझे प्राण घेऊं नका," असें कुत्रा म्हणाला. पण लांडगा म्हणाला, "कां बरें मी तुझे प्राण वांचवावे ? तुला चांगले म्हणणारा कोणी आहे का ? असल्यास दाखव."

इतक्यांत ज्या बकऱ्याला आपण मदत केली नव्हती. तो बकरा तेथे आल्याचें त्याला दिसलें. तो लांडग्यास म्हणाला, "मी बुडत असतां याने मला कांही मदत केली नाही. आता याचा प्राण जाऊं लागला तर मी ही म्हणेन——मला काय त्याची पर्वा !"

इतक्यांत तें मांजरहि आलें. तें म्हणाले, "लांडगेदादा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझ्या भुकेची याने कोठे पर्वा केली होती ? आता याचे प्राण गेले तर मला काय त्याची पर्वा ?"

त्यानंतर गायहि आली. तिने लांडग्यास म्हटलें, "तुम्ही खुशाल वाटेल तसें करा ! माझें काय अडलें आहे या गर्विष्ठ कुत्र्याची तरफदारी करायला ?"

याच रीतीने वाटेने भेटलेले सर्व पशु, पक्षी, झाडें यांनीहि सांगितलें. तेव्हा आता मात्र आपले प्राण वांचत नाहीत अशी कुत्र्याची खातरी पटली. या धास्तीने तो गांगरून गेला व त्यामुळेच जागा झाला ! आपणाला खाणारा लांडगा खरोखरीचा नसून तें स्वप्न होतें असें समजतांच त्याच्या जीवांत जीव आला.

पण हे स्वप्न खरेंच झालें असतें तर ? माझी वागणूक खरोखरच आप्पलपोटेपणाची होती ! मजवर खरेंच संकट आलें असतें, तर कोण बरें माझ्या उपयोगी पडलें असतें ? यापुढे "मला काय त्याची पर्वा !" असें मी कधी म्हणणार नाही !

असा विचार करून कुत्र्याने आपलें वर्तन सुधारलें व तो लोकांच्या उपयोगी पडूं लागला.

प्रश्न

१. चुकीचे शब्द खोडा—

(१) कुत्रा धास्तीने—लज्जेने—भूकेने—गांगरून—घाबरून—पळून—निजून—गेला.

(२) कुत्र्याने काम—वर्तन—भांडण—सुधारलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. स्मृति चांचणी—(१) तुम्हांला स्वप्न पडलें असल्यास त्यां
तुम्ही काय पाहिलें ? (२) 'कुत्र्याला वांचवा' असें म्हणणा
कोणीच कां भेटला नाही ? (३) कुत्र्यानें आपलें वर्तन क
सुधारलें ? (४) तुम्ही या धड्यापासून कोणता बोध घ्याल ?

धडा पंचविसावा.

हत्ती.

भाग १ ला.



मुलांनो, तुम्हीं कधी हत्ती पाहिला आहे काय ? नसे
तर वरील चित्र पहा म्हणजे तुम्हांस त्याची कल्पना येईल.
आपणाला जेवढीं जनावरें माहीत आहेत, त्या सर्वां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हत्ती मोठा होय. तो दोन अडीच पुरुष उंच व अंगाने फार दांडगा असतो. जसें शरीर तसेंच त्याचें बळहि मोठें असतें. आपल्या मध्यप्रांतांत छत्तीसगडाकडील जंगलांत हत्ती पुष्कळ सापडतात. रानांत ते कळप करून राहातात. हत्ती दांडगा असूनहि निरुपद्रवी आहे. तो सिंह–वाघाप्रमाणे इतर प्राण्यांना मारून त्यावर उपजीविका करीत नाही. तो झाडपाल्यावर आपला निर्वाह करतो.

हत्तीचा मौजेचा अवयव म्हणजे त्याची सोंड होय. त्याला नाक नसतें, पण नाकाच्या जागीं एक लांबलचक मांसाचें नळकांडें असतें. हीच सोंड, ही फार लवचिक असते, त्यामुळे त्याला ती वाटेल तिकडे फिरवितां येते. त्याला झाडाची फांदी मोडावयाची असली म्हणजे तो आपली सोंड तिला गुंडाळतो व एका हिसड्यासरशी फांदी मोडून घेतो. हत्ती सोंड पाण्यांत बुडवून पाणी वर शोषून घेतो व मग ती वाकडी करून तें पाणी तोंडांत सोडतो व पितो या दांडग्या प्राण्याला खाणेंपिणेंहि भरपूर लागतें. पांच दहा घोड्यांची चंदीवैरण एकटा हत्ती फस्त करतो.

जे नर हत्ती असतात, त्यांना दोन लांबलचक सुळे दात असतात. हें दात त्याला खाण्याच्या कामीं बिलकुल उपयोगी पडत नाहीत. यांनी तो जमिनींतील मुळें वगैरे उकरून खातो. हें हस्तिदंत फार पांढरे स्वच्छ असून त्यांचे फार सुंदर नक्षीचें सामान होऊं शकते. फण्या, कंगवे, देवांच्या मूर्ति, नक्षीदार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पेट्या व करंडे इत्यादि पदार्थ म्हैसूर, दिल्ली वगैरे ठिकाणी बनवितात.

हत्ती बाळगणें हें श्रीमंतांनाच शक्य आहे. राजेरजवाडे आजकाल हत्ती शोभेसाठीच बाळगतात. समारंभाची मिरवणूक निघाली म्हणजे हत्तीवर अंबारी अथवा हौदा चढवून त्यांत श्रीमान् लोक बसतात.

अशा वेळीं हत्तीची सोंड रंगवितात व त्याला दागिने वगैरे घालतात. हत्ती अशा प्रसंगीं फार सुंदर दिसतो.

हत्ती केवळ शोभेसाठी बाळगतात असें नाही. जंगली मुलखांत स्वारीसाठी व जड सामानाच्या वाहुतकीसाठीहि त्याचा उपयोग करतात.

प्रश्न

१. समानार्थी शब्द लिहा—

निर्वाह, लवचिक, नक्षीदार, वाहतुक.

२. शब्दाचा वाक्यांत उपयोग करा.

दांडगा, निरुपद्रवी, निर्वाह, समारंभ, फस्त.

३. विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा—

निरुपद्रवी, कळप, लवचिक, उपयोगी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा सव्विसावा.

हत्ती.

भाग २ रा.

माणूस हत्तीपेक्षा लहान आहे खरा ; पण तो अधिक बुद्धिमान् आहे. तो युक्तीने हत्तीस पकडतो. ती युक्ति अशीः—



रानांत जेथे हत्तीचे कळप असतील. तेथे एक मोठा खळगा खणतात. यास 'खेड्डा' असें म्हणतात, त्याच्या भोवतालीं मोठमोठीं बळकट लाकडें एकाशीं एक अशीं उभीं पुरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मजबूत कठडा करतात. त्यास एक दार ठेवतात. मग पाळलेल्या हत्तींपैकी एक दोन मोकळे सोडून देतात. ते जंगली हत्तींत मिसळतात. मग तो एखाद्यास फुसलावून त्या दारावाटे खेड्यांत आणतात. असें झालें म्हणजे मागे तयार असलेला मनुष्य झटकन दार बंद करून त्याला कोंडून टाकतो. आपण कोडलें गेलों; असें कळलें म्हणजे रानटी हत्ती बाहेर पडण्यासाठी यत्न करूं लागतो. परंतु त्याला ते पाळीव हत्ती सोंडेने बडवून बडवून अर्धमेला करतात. नंतर एक माणूस हळूच त्याचा पाठीशीं जातो व मोठा थोरला एक दोरखंड त्याच्या पायाला बांधून दोन झाडांना बांधून टाकतो. मग एक दोन दिवस त्याला अगदी उपाशी ठेवतात. याने तो इतका गरीब होतो की, त्यास घोड्यासारखें धरून वाटेल तिकडे नेतां येतें. एकंदरीने हत्ती स्वभावाने गरीब असल्यामुळे पुढे हा इतका माणसाळतो की, त्याच्याकडून वाटेल तें काम करून घेतां येतें. मात्र तो चवताळला म्हणजे फार भयंकर ! अशा वेळीं तो पुष्कळ नुकसान करूं शकतो.

हत्तीच्या हुशारीविषयी कित्येक मौजेच्या आख्यायिका सांगतात. एक हत्ती रोज नदीवर पाणी पिण्यास जात असे. वाटेवर एक शिंप्याचे दुकान होतें. तेथील शिंपी बहुधा त्यास जातां येतां कांही खाण्यास देत असे. त्यामुळे हत्ती ठरलेल्या वेळीं त्या शिंप्याच्या खिडकींत सोंड घालीत असे. एके दिवशीं शिंपी कांही कारणाने रागांत होता. त्याने खाण्यास देण्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोंडेस सुई टोंचली. सोंड मागे घेऊन हत्ती पुढे पाणी पिण्यास गेला. पाणी प्याल्यावर त्याने चिखलाचें घाणेरडें पाणी सोंडेंत भरून घेतलें. परत येतांना शिंप्याच्या दुकानासमोर उभा राहिला. मग त्याने खिडकीवाटें सर्व घाणेरडें पाणी त्या शिंप्याच्या अंगावर नेमकें फेंकून दिलें. शिंप्याचें सर्वांग चिखलाने भरलें व जवळचे कांही उंची कपडेहि खराब झाले. अशा रीतीने हत्तीने शिंप्याला शिक्षा केली.

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) हत्तीला कसें पकडतात ? (२) हत्तीच्या हुशारीची गोष्ट सांगा. (३) हत्तीचें वर्णन करा. (४) खेडुा कशाला म्हणतात ?

२. खरें किंवा खोटें हें लिहा—

(१) हत्ती चवताळला म्हणजे फार गरीब होतो.—

(२) हत्तीने घाणेरडें पाणी सोंडेंत भरून घेतलें नाही.—

३. उलट अर्थाचे शब्द लिहा—

घाणेरडें, पाळीव, नुकसान, खराब.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा सत्ताविसावा.

माझी काठी.

पद

(हावभाव करून म्हणावयाचें)

ही सुंदर माझी काठी । आवडे मनाला मोठी
खेळाया हिंमत पोटीं । येतसे इच्या योगाने
मन रमतें आनंदाने ॥ १ ॥

करितसे हिची मी घोडी । पळण्याला जागा थोडी
कोणती न इजला खोडी । चौफेर उडे वेगाने
मन रमतें आनंदाने ॥ २ ॥

खोगीर नको घालाया । तो लगाम नलगे वायां
नलगे हिस खाया प्याया ! ही माझी मोठी प्यारी
वाऱ्यापरि मारि भरारी ॥ ३ ॥

काठीला हातीं घेतों । दांडगी गुरें मी वळतों
पाण्यावर त्यांना नेतों । पाहुनी हिला भीतीने
पळतात टाकुनी रानें ॥ ४ ॥

काठीवरी कसरत करतों । मी मागें वेगें उडतों
पुढतीही फिरून येतों । खेळतों हिच्या रंगाने
मन भरतें आनंदाने ॥ ५ ॥

मी कोळी केव्हा होतों । काठिचें वल्हें बनवीतों
होडीला वल्हवित नेतों । पाण्याविण होडी धावे
मौज ही थोडकी नव्हे ॥ ६ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मी वनतों शूर शिपाई । तरवार हातामधिं घेई
फोडितों शत्रुची डोई । परि न पडे रक्त कधीही
ही थोडी काय बढाई ? ॥ ७ ॥
हातामधिं भाला घेतों । शत्रूवरि रोखूनि धरतों
नेटाने धावत जातों । मारूनि परत मी येतों
कोणाचि न हत्या करतों ॥ ८ ॥
मी माझी बंदूक घेतों । खांद्यावर ठेवुनि देतों
नेमाने जर मारीतों । कोणास इजा न त्याने
मन रमतें आनंदाने ॥ ९ ॥
माझि ही पहा तंबोरी । गाण्याही मारूं लकेरी
हरीदास करी ना दूरी । लागतां चांगला सूर
हरिदास मनामधिं गार ॥ १० ॥
टेकुनी उडी मारावी । बोथाटी परि फिरवावी
मौजेने गिरकी घ्यावी । तोषतों हिच्या संगाने
मन रमतें आनंदाने ॥ ११ ॥
आंधळ्यास रस्ता दावी । लंगड्यास पाय निटावी
वृद्धाने हातीं घ्यावी । टाकुनी तिच्यावर भार
होतेसे मनामधिं गार ॥ १२ ॥
ऐसी ही माझी काठी । दिसते ही वरुनी छोटी
उपयोगी वस्तु मोठी । आवडे मनाला भारी
वाटते जिवाहुनि प्यारी ॥ १३ ॥

—मोरो गणेश लोंढे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) माझी काठी कशी आहे ? (२) काठीचे उपयोग सांगा. (३) हरीदास कोणाला म्हणतात ?

२. कृतिपर—होडी, भाला, तंबोरी यांचीं चित्रें काढा.

३. हातांत भाला घेऊन शत्रूवर धावून जातो. या अर्थाची कविता पाठ म्हणून दाखवा.

धडा अट्ठाविसावा.

निरोगी कसें राहावें ?

भाग १ ला.

वर्धा जिल्ह्याचे मुख्य डाक्टर (सिव्हिल सर्जन) आज पिंपळगावास आले असून ते शाळाहि पाहण्यास येणार होते. मुलांनी निरोगी कसें राहावें याबद्दल आपण दोन शब्द बोलणार आहों, असा त्यांचा निरोप आला होता. म्हणून पिंपळगावच्या शाळेंत आज फार गडबड दिसत होती. शाळेंतील मुलांनी बाकें, खुर्च्या वगैरे व्यवस्थित मांडून ठेवल्या होत्या. गावांतील चार सभ्य गृहस्थांनाहि व्याख्यानास बोलाविलें होतें.

बरोबर साडेचार वाजतां डॉक्टरसाहेबांची मोटार येऊन थडकली. थोडा वेळ शाळा पाहून झाल्यावर डॉक्टरसाहेबांनी आपल्या भाषणास सुरवात केली. ते म्हणालेः—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"माझ्या बालमित्रांनो, आरोग्य म्हणजे कोणताहि रोग अथवा आजार नसणें, आपले सर्व अवयव धड असून त्यांनी आपापलीं कामें नियमितपणें करणें, कांही दुखणें, खुपणें नसणें याचेंच नांव आरोग्य. यांत कांही बिघाड झाला की, त्याला आजार अथवा बीमारी म्हणतात. रोग अनेक आहेत. पडसें, खोकला, ताप, हगवण, पोटदुखी हे अगदी सामान्य रोग होत. प्लेगचा ताप, पटकी अथवा महामारी, देवी अथवा माता हे क्वचित् येणारे पण भयंकर रोग होत. या दुसऱ्या प्रकारच्या रोगांना साथीचे रोग म्हणतात; झपाट्याने गावभर पसरतात व त्यांनी शेंकडो माणसें मरतात.

पुष्कळ लोकांना असे वाटतें की, रोग हे ईश्वराच्या कोपामुळे येतात. त्याला माणसें काय करणार ? पण ही चूक आहे. बहुतेक रोग आपल्याच चुकीने अथवा अज्ञानाने होतात. माणसाला प्रयत्नाने त्यांच्यापासून सुटका करून घेतां येते व आपलें आयुष्य वाढवितां येतें. हें कसें, तेंच आज तुम्हांस सांगावयाचें आहे.

धट्टेकट्टे शरीर ही ईश्वरी देणगी खरी. पण ती कमावणें ईश्वराने आपल्या हातीं ठेवलें आहे. कांही साधे व सोपे नियम माणसाने पाळले, तर प्रकृति सहसा बिघडत नाही. यांपैकी कांही ठळक नियम मी आता सांगतों.

(१) स्वच्छता—पहिला नियम स्वच्छतेचा. बहूतेक रोग पाणीपासून होतात. अलीकडे असा शोध लागला आहे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

की, बहुतेक रोग कांही प्रकारच्या अतिशय बारीक जंतूंपासून उत्पन्न होतात. हे जंतु इतके बारीक असतात की, तें साध्या डोळ्यांना दिसतहि नाहीत. हे तोंडावाटे, नाकावाटे, किंवा इतर कोणत्याहि मार्गाने आपल्या शरीरांत गेले की, तेथे त्यांची झपाट्याने वाढ होते व त्यामुळेच रोग उत्पन्न होतात.



(रोगजंतूंचा नमुना)

हे जंतु घाणीपासून उत्पन्न होतात, म्हणून स्वच्छता ठेवणें अगत्याचें आहे. उष्णतेने हे रोगजंतु मरतात. म्हणूनच पाणी व दूध उकळण्याने तें निरोगी बनते. पटकीच्या दिवसांत तर पाणी उकळल्याशिवाय पिऊंच नये. कारण पटकीचे जंतु बहुधा पाण्यावाटेच पोटांत जातात. परमँगनेट ऑफ पोटॅश या नांवाची एक पूड मिळते, ती पाणी किंचित् लाल होईल अशा बेताने विहिरींत, तलावांत टाकली म्हणजे देखील त्यांतील रोगजंतु मरून जातात. अंग, कपडे, घर व त्यांभोवतालची जागा, हीं सर्व स्वच्छ ठेवणें हें आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचें कसें आहे यावरून तुमच्या ध्यानीं येईल.

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) आरोग्य म्हणजे काय ? (२) रोगांचे मुख्य प्रकार किती व कोणते?(३) मनुष्याला मिळालेली ईश्वरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देणगी कोणती. (४) रोगांचा फैलाव कोणापासून व कसा होतो? (५) परमँगनेट ऑफ पोटॅश याचा उपयोग सांगा.

२. उलट अर्थाचे शब्द लिहा—

धट्टेकट्टे, नियमित, कमावणें, झपाट्याने.

धडा एकोणतिसावा.

निरोगी कसें राहावें?

भाग २ रा.

(२) मिताहार—खाण्यापिण्यांत बेत ठेवणें हा दुसरा नियम होय. फाजील खाण्याने अंगांत ताकद तर येत नाहीच; उलट पाचनशक्ति मंद होऊन अपाय मात्र होतो. पचेल तेंच खावें व थोडी भूक राखून जेवावें. 'भुकी तो सुखी', ही म्हण लक्षांत ठेवा. गोड लागतें म्हणून मिठाई, भजीं असले जड पदार्थ फार खाऊं नयेत.

(३) व्यायाम—नियमित व्यायाम करणें हा तिसरा मोठा नियम होय. खाल्लेलें अन्न पचून त्याचें रक्तमांस वगैरे बनण्यास व्यायामाची अत्यंत आवश्यकता असते; या बाबतींत युरोपीयन लोकांचें उदाहरण आपण घेण्यासारखें आहे. त्यांना कितीहि काम असो, ते सकाळीं अगर संध्याकाळीं कसला तरी व्यायाम केल्याखेरीज राहत नाहीत. आपल्या इकडील पोक्त माणसांना खेळ खेळण्याची लाज वाटते. पण त्यांच्याकडे पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अगदी म्हातारपणापर्यंत ते मर्दानी खेळ खेळतात. त्यामुळे ते दीर्घायुषी, गाजरासारखे लाल व सशक्त असतात.

(४) नियमितपणा--हा महत्त्वाचा चवथा नियम होय. कोणतीहि गोष्ट वेळच्या वेळीं व बिनचूक करणें याचा अर्थ नियमितपणा. खाणें, पिणें व व्यायाम हीं ठरीव वेळी व ठरीव प्रमाणांत जे बिनचूक करतात ते सहसा आजारी पडत नाहींत. वेळच्या वेळीं निजणें व सूर्योदयापूर्वी निजून उठणें ह्या गोष्टीफार आरोग्यकारक आहेत. पुष्कळ मुलें ही गोष्ट लक्षांत ठेवीत नाहींत. तसेंच अभ्यासाचें. रोजचा अभ्यास जो नेमाने, वेळच्या वेळी करतो, त्यावर परीक्षेच्या वेळी बोजा पडत नाही. पण मुलें पहिल्याने अभ्यासाची हयगय करतात व पुढे रात्रीं जागरण करून अभ्यास करूं लागतात. मग जागरणाने शौचास साफ होईनासें होतें, कपाळ दुखूं लागतें, नाना प्रकार होतात.

(५) कोठा साफ ठेवा--नियमितपणाचा हा एक प्रकार आहे, मलावरोध अथवा शौचास साफ न होणें हें अनेक रोगांच्या मुळाशीं असते. जो मळ शरीरांतून बाहेर निघून गेला पाहिजे तो जर पोटांत राहूं लागला, तर तो पोटांत एक प्रकारचें विष तयार करतो व त्याने प्रकृति बिघडते. प्रकृतींत जरा कमजास्त दिसूं लागलें की, प्रथम एखादें हलकेंसें रेचक (एरंडीचें तेल फार उत्तम) देऊन कोठा साफ करावा. म्हणजे एक तर रोग होत नाही व झालाच असला, तर त्यावरील औषध जलद लागूं पडते. नियमित व्यायाम घेणाराला मलावरोध सहसा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होत नाही. झालाच तर त्यावर साधा उपाय म्हणजे पेलाभर गरम पाण्यांत थोडें खाण्याचें मीठ (सैंधव जास्त चांगलें) टाकून तें प्यावें. थोडें इकडे तिकडे फिरावें. म्हणजे थोड्याच वेळांत पोट साफ होऊन बरें वाटेल.

हे नियम पाळणारा बहुतकरून आजारी पडत नाही.

मी सांगितलें नियम तुम्ही काळजीपूर्वक ध्यानांत ठेवा व तुमच्या घरच्या मंडळींनाहि समजावून सांगा. मी पुन्हा तुमच्या गावीं आलों म्हणजे आणखी कांही गोष्टी सांगेन.

डॉक्टरांचें भाषण झाल्यावर हेडमास्तरांनी त्यांचे आभार मानले व मंडळी घरोघर निघून गेली.

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) निरोगी राहण्याचे नियम सांगा. (२) 'भुकी तो सुखी' याचा अर्थ काय? (३) कोठा साफ कसा ठेवावा? (४) नियमितपणापासून कोणते फायदे होतात?

२. उलट अर्थाचे शब्द लिहा—

दीर्घायुषी, सशक्त, सूर्योदय, फाजाल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा तिसावा.

प्राप्तीचा अर्धा वाटा.

भाग १ ला.

(नाटक)

[सुभेदार कान्होजीराव आंग्रे यांचे वाड्यांतील खोली. सुभेदार व त्यांचे दिवाणजी बोलत आहेत. जवळ एक चपराशी उभा आहे.]

कान्होजीराव--कसें काय, दिवाणजी ! मेजवानीची सर्व तयारी झाली ना ? उद्यांचा बेत अगदी उत्कृष्ट झाला पाहिजे।

दिवाणजी--सर्व तयारी उत्तम आहे. फक्त एका वस्तूवाचून मात्र खोळंबा झाला आहे. अद्याप मासे आले नाहीत; व ते उद्यांपर्यंत येतील किंवा नाही याची शंका वाटते.

कान्होजीराव--कां बरें ?

दिवाणजी—कालपासून समुद्र फार खवळला आहे; व कोळी लोक म्हणतात की वादळ अमळ शांत झाल्यावांचून मासे धरण्याला कोणी धजणार नाही.

कान्होजीराव--ही तर मोठी पंचाईत झाली. माशांवाचून उद्यांच्या मेजवानीचा अगदी बेरंग होणार. आमची व्याही-मंडळी काय म्हणतील ? कांही तरी खटपट करून एखाद दुसरा तरी मासा उद्यांपर्यंत मिळविलाच पाहिजे.

दिवाणजी--पाहतों प्रयत्न करून. पण मिळण्याची फारशी आशा दिसत नाही.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[बाहेर देवडीवर पहारेकरी पहारा करीत आहे. इतक्यांत एक कोळी मला मोठा मासा घेऊन प्रवेश करतो. तो सरळ वाड्यांत जाऊं पाहतो. पण पहारेकरी त्यास अडवतो.]

पहारेकरी—कोण रे तूं ? एकदम आंत कसा चाललास ?

कोळी—दादा, मी एक कोळी आहे.

पहारेकरी—मग वाड्यांत काय काम आहे तुझें ?

कोळी—मला एक चांगला मासा सापडला आहे. तो नेऊन सुभेदारसाहेबांना विकीन म्हणतों.

पहारेकरी—चल जा ! सोडीत नाही तुला आंत, आज वाड्यांत मासे मुळीच न को.

कोळी—असें म्हणूं नका जी ! मासा तरी काय फक्कड आहे पहा. धनीसाहेब घेतील हा पाहिल्याबरोबर.

पहारेकरी—पण मी सांगतों ना तुला ? आंत जाण्याची परवानगी नाही.

कोळी—असें नका म्हणूं पहारेकरी साहेब; गरीबाच्या पोटाला दोन पैसे मिळूं द्या, हा मासा जर विकला नाही तर आज पोरेंबाळें उपाशी राहतील माझीं !

पहारेकरी—(विचार केलासें दाखवून) बरें बाबा, दया येते तुझी, जा आंत.

कोळी—देव तुमचें भलें करो, मी तुमचे उपकार विसरणार नाही (जाऊं लागतो)

पहारेकरी—अरे, पण थांब जरा ! मी तुला आंत सोडतो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण एका अटीवर. या माशाची जी किंमत तुला मिळेल तिच्यांतला अर्धा वाटा तूं मला दिला पाहिजेस.

कोळी—अर्धा वाटा ! मी तुम्हांला एक आणा देईन.

पहारेकरी—छेः ! आण्याने भागणार नाही. अर्धा वाटा पाहिजे.

कोळी—असें काय हो ? दोन आणे घ्या, मग तरी झालें ना ?

पहारेकरी—चल हट् ! तुला जें मिळेल त्याचा बरोबर निम्मा हिस्सा मला मिळेल तरच तुला आंत सोडीन.

कोळी—(थोडा विचार करून) बरें बुवा, कबूल तुमचें म्हणणें.

[पहारेकरी कोळ्यास आंत जाऊं देतो.]

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) 'प्राप्तीचा अर्धा वाटा' ही गोष्ट सांगा. (२) कान्होजीरावांच्या येथील मेजवानीचा बेरंग कां झाला होता ? (३) पहारेकऱ्याने कोळ्याला कोणत्या अटीवर सोडले होते ?

२. समानार्थी शब्द लिहा—

उत्कृष्ट, खवळला, बेरंग, फक्कड, खोळंबा.

३. विरुद्धार्थी शब्द लिहा—

उपकार, उपाशी, आशा, विसरणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा एकतिसावा.

प्राप्तीचा अर्धा वाटा.

भाग २ रा.

कान्होजीराव—कोण आहे रे तो ?

चपरासी—सरकार एक गरीब कोळी आहे व त्याने एक मोठा मासा विक्रीसाठी आणला आहे.

कान्होजीराव—अरे वाः ! अगदी पाहिजे होती ती वस्तु आणली याने. पाहूं तर खरा मासा केवढा आहे तो ?



[काळी सुभदेरसाहबाच्या पुढे उभा आहे.]

(कोळी दाखवितो.) वाः छान ! चंगळ होईल या एकाच माशाने, अगदी वेळेवर आलास बाबा तूं. काय रे, काय किंमत या माशाची ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोळी—साहेब, मला याबद्दल पैसे मुळीच नकोत. माझ्या उघड्या पाठीवर चाबकाने वीस फटके मारावयाचे हीच याची किंमत !

कान्होजीराव—(आश्चर्याने) काय ! वेड तर नाही लागलें या कोळ्याला ! (कोळ्यास) काय म्हणालास तूं ? पुनः सांग पाहूं !

कोळी—उघड्या पाठीवर वीस फटके. हीच माझ्या माशाची किंमत !

कान्होजीराव—भलतेंच कांही तरी. तूं आज अत्यंत आवश्यक असलेला माल आणलास व याबद्दल आम्हीं तुला कोरड्यांनी झोडपावें, हा खासा न्याय !

कोळी—पण सरकार मी दुसरी कोणतीच किंमत घेणार नाही.

कान्होजीराव—(स्वतःशी) हें तर अगदी विलक्षण आहे. असा विचित्र माणूस कोणी पाहिला असेल का दुनियेंत ? पण आम्हाला तर आज माशाची गरज आहे. तेव्हा हा मागत आहे ती किंमत देऊन तो घेतला पाहिजे ? (कोळ्यास) ठीक आहे बाबा. तुझ्याच म्हणण्याप्रमाणे होऊं दे. (चपराशास) चपरासी !

चपरासी—जी हुजूर !

कान्होजीराव—ह्या कोळ्याला उघडा करून त्याच्या पाठीवर वीस फटके मार पाहूं ! (हळूच त्याच्या कानांत पण हे पहा, जरा बेतानेच मार फटके हं !)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[हुकमाप्रमाणे चपरासी चाबूक आणतो व तों कोळ्यास फटके मार-तार इतक्यांत-]

कोळी—हं जरा थांबा. सरकार, या कामांत माझा एक वाटेकरी आहे; व त्याचा वाटा मी त्याला प्रथम देणार !

कान्होजीराव—म्हणजे ? ही काय आणखी भानगड आहे ? असला मूर्ख दुनियेंत आणखीहि एक आहे की काय ? कोठे आहे तुझा वाटेकरी ?

कोळी—बाहेरच उभा आहे.

कान्होजीराव—कोण बुवा तो ? बोलाव त्याला.

कोळी—तो आपला पहारेकरीच आहे. मी हा मासा घेऊन आंत येऊं लागलों, तेव्हा त्याने मला अडविलें व मला तें मिळेल त्याचा अर्धा वाटा जेव्हा त्याला देण्याचें कबूल केलें, तेव्हाच त्याने मला आंत सोडलें.

कान्होजीराव—अरे बदमाष ! चपरासी, आण त्या हरामखोराला माझ्यासमोर. (चपरासी तसें करतो.) काय रे ? हा कोळी सांगतो तें खरें आहे का ?

पहारेकरी—(लाजेने खाली मान घालून) होय, सरकार !

कान्होजीराव—असें काय ? घे तर तुझा वाटा ! अर्धाच काय पण सगळाच तुला देतों ! चपरासी, काढ याचे कपडे व दे ह्याला वीस फटके मोजून; आणि पहा, चांगले झणझणीत फटके दे बरें ! चांगली आठवण राहिली पाहिजे गुलामांला ! (चपरासी तसें करतो.) झाले वीस फटके ? चल, जा आता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येथून. तुला पहारेकऱ्याच्या कामावरून कमी केलें आहे ! (कोळ्यास) कोळीदादा शाबास ! खाशी युक्ति काढलीस तूं या पाजी पहारेकऱ्याला शिक्षा करण्याची ! या हुशारीसाठी तुला मी खुशीने इनाम म्हणून हे पन्नास रुपये व एक पागोटें देतों. पुन्हा जेव्हा मासे विकायाचे असतील तेव्हा ते आमच्या वाड्यांत तूं जरूर आणीत जा.

(कोळी आनंदाने लवून मुजरा करतो व निघून जातो.)

प्रश्न

१. खरें किंवा खोटें हें लिहा--

(१) कान्होजीराव म्हणाले, काय ! वेड तर नाही लागलें या कोळ्याला !---

(२) मीं खुशीने शंभर रुपये व एक पागोटें इनाम देतों.--

२. स्मृति चांचणी--(१) चपराशाचें काम कोणतें ?

(२) कोळ्याने पहारेकऱ्याला कोणता अर्धा वाटा दिला ?

(३) कोळ्याच्या हुशारीबद्दल त्याला काय मिळालें ?

धडा बत्तिसावा.

आमचें घर.

(दिंडी).

वाडवडिलांची आमुच्या हवेली
आज कालाने जीर्ण जरी झाली
तरी आहे अम्हांस जीवप्राण
माय म्हातारी दूरवील कोण ? ॥ १ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जरी तुळ्या वाश्यांस कीड लागे
खांब कलती, छत कुजें वृष्टियोगें
तरी सारे दृढ धरूं सावरून
वृद्ध माउलिची काळजी कुणा न ? ॥ २ ॥
पूर्वजांना सांभाळिलें तियेने
दिलीं त्यांना विश्रामवासदाने
सिद्ध आजहि ! जरि रूप चंद्रमौली
अशा कालीं निज कोण दुजा वाली ? ॥ ३ ॥
रुधिर ज्यांचें आमुच्या रोमरोमीं
पिंड ज्यांच्याविण आमचा निकामी
बापदादे ते नांदले जिच्यांत
दूर आम्ही जरि–प्राण हे तिच्यांत ! ॥ ४ ॥
दैवयोगें जरि अंतरलों तीतें
तरी नाहीं तुटणार पूर्व नातें
ठेवु तिजवर निरपेक्ष सत्य लोभ
सत्य लोभ न कधिं इच्छि लेश लाभ ! ॥ ५ ॥

—भ. श्री. पंडित

प्रश्न

(१) आमचें घर कसें आहे ?
(२) घर वर प्रेम कां करावें ?
(३) चंद्रमौली घर म्हणजे क य ?
(४) "दैवयोगें जरि..... ....."
ही कविता मुखपाठ लिहा.
(५) पूर्वजांना सांभाळिलें तियेने' या कवितेचा अर्थ लिहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा तेहतिसावा.

वटवाघूळ.



एकदा पशु व पक्षी यांच्यामध्ये युद्ध सुरू झालें. पशूंच्या बाजूने सिंह, वाघ, हत्ती, आस्वलें वगैरे दांडगे प्राणी लढत होते; व पक्षांच्या बतीने गरुड, गिधाड, घार, बहिरीससाणा असे शिकारी पक्षी झगडत होते.

कधी पक्ष्यांची जीत होई, तर कधी पशूंना जय मिळे. कित्येक दिवस लढाई चालली. कोणीच मागे घेईना. दोन्ही पक्षांचे अनेक वीर मरून पडले व कित्येक घायाळ झाले. अखेरीस माणसाने येऊन दोन्ही पक्षांची समजूत घातली; तेव्हा तह होऊन युद्ध एकदाचें थांबले.

युद्ध चालूं असतां वटवाघूळ फार मौज करीत असे. ज्या पक्षाची सरशी दिसेल त्या पक्षांत झटदिशी जाऊन सामील व्हावयाचें व आपला लौकिक वाढवायचा, असा त्याचा क्रम असे. लढाईच्या धांदलींत या गोष्टीकडे कोणाचें लक्ष गेलें नाही.

युद्ध संपल्यानंतर मात्र हा दिसणारा प्राणी कोण, या बद्दल वाटाघाट सुरू झाली. शोधाअंतीं असें समजलें की, तें वटवाघूळ असून तें कधी या पक्षास तर कधी त्या पक्षास असें मिळत असे. तेव्हा त्याला कोणीच आपल्यांत घेईनात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पशु म्हणाले, "आम्हीं नाही तुला आपल्या जातींत घेत. तुला तर पक्ष्यांसारखे पंख आहेत व उडतां येते."

मग वाघूळ पक्ष्यांकडे गेलें. पण पक्षी म्हणाले, तुझ्यांत आमच्यांत फार फरक आहे. तुमते पंख असून काय उपयोग ? तुमच्या जातींत पिलांना अंगावर दूध पाजतात, तसें आमच्यांत कोठे आहे ? शिवाय तुझे कानहि उंदराच्या कानांप्रमाणे आहेत. आमचें तुझें नातें मुळीच नाही.

निराश होऊन वाघूळ उंदराकडे गेलें. पण उंदीर त्याला पाहून दूर पळूं लागले. त म्हणाले, "वा ! वाघळोबा, तुम्ही आमच्यांत कसे येऊं शकाल ? तुम्हाला आमच्यासारखे चार पाय नाहीत व शेपूट तर मुळीच नाही. आमच्यावर झडप घालून तुम्हीं आम्हांला गट्ट मात्र करावयाचे ?"

आता मात्र वाघळाची पूर्ण निराशा झाली. आपल्या आडीमुळेच कोणी आपल्यास थारा दत नाही असें त्याला वाटून आलें; व लाजेने ते इतकें खिन्न झालें कीं, तें आपणास वाडास उलटें टांगून घेऊं लागलें व रात्रीच्या वेळीं एकटेंच बाहेर पडूं लागलें.

प्रश्न

१. कृतिपर—

वटवाघूळ, गरुड, घार, सिंह, वाघ, आस्वल, हत्ती यांच्या चित्रांची नकल करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. खरें किंवा खोटें हें सांगा—

(१) पशूंच्या बाजूने कोल्हा लढत होता.—

(२) पक्ष्यांच्या बाजूने घुबड लढत होतें.—

३. समानार्थी शब्द द्या—

खिन्न, निराशा, विचित्र, सरशी.

धडा चौतिसावा.

पचमढीची सफर.

मु० नागपूर, ता० १८—६—३

प्रिय मित्र वसंत यासः—

सप्रेम नमस्कार विनंती विशेष.

मित्रा वसंता, तुझ्या पत्राचें उत्तर मीं लवकर पाठवि नाही, याबद्दल तूं मजवर रागावला असशील. पण उशिराचें कारण समजलें की, तुझा राग तेव्हाच नाहीसा होईल, अशी मला खात्री वाटते.

आम्ही सर्व मंडळी गेल्या पंधरवाड्यांत पचमढीला गेलो होतों. नागपूरच्या रखरखीत उन्हाळ्यांतून गेल्यावर तर पचमढी म्हणजे नंदनवनच वाटतें. आमचे दिवस किती मजेंत गेले म्हणून सांगू ? तूं बरोबर असतात तर किती बहार झाली असती ? मला तर तुझी आठवण वारंवार येई.

असो; निदान पत्रद्वारें तुला माझ्या आनंदाचा वांटेकरी करण्याचा प्रयत्न मी करीत आहे. आमच्या बाबांचें पचमढीला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांही सरकारी काम होतें. ती संधि साधून त्यांनी आम्हां सर्वांनाच तेथे नेण्याचें ठरविलें. ता. २ जून रोजीं आम्ही नागपूराहून निघालों. नागपूरपासून इटारसीपर्यंत पॅसेंजर गाडीने जाऊन तेथे आम्ही कलकत्ता मेल गांठला; व तेथून पिपरियापर्यंत गेलों. तेथून पचमढी सुमारें बत्तीस मैल दूर आहे. तो प्रवास मोटरगाडीने करावा लागतो. सुमारे अर्धें अंतर चालून गेल्यानंतर डोंगराच्या चढावाल सुरवात होते. चढणीचा घाट फार मौजेचा असून त्यांतून वळणावळणांनी काढलेल्या रस्त्याची मौज पहाण्यासारखी आहे. पिपरियापर्यंत आम्हाला हवेंत मुळीच फरक भासत नव्हता. पण घाटांत आम्ही जसजसें वर चढूं लागलों तसतशी थंड वाऱ्याची झुळूक ऊं लागून मनास खूप हुशारी आली.

पचमढी हें आपल्या मध्यप्रांत सरकारचें उन्हाळ्यांतील मुक्कामाचें ठिकाण आहे. हुशंगाबाद जिल्ह्याच्या सोहागपूर तहशिलींत जो सातपुडा पर्वताचा भाग आहे. त्यांत महादेवाचा डोंगर हा मुख आहे. याच डोंगरांतील एका पठारावर पचमढी हा गाव वसलेला आहे. हा पठार म्हणण्यासारखा उंच नाही. त्याची पातळी समुद्राच्या सपाटीपासून अदमासें ३५०० फूट आहे. असें म्हणतात की, महाबळेश्वर, नैनीताल, सिमला हीं थंड ठिकाणें याहून पुष्कळ उंच आहेत. तें काय असेल ते असो; पण नागपूरच्या आगींतून आल्यावर आम्हांला येथे फार बरें वाटलें हें खरें. नागपूरचे दुपारचे गरम वारे तर येथे मुळीच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हते. उलट संध्याकाळ झाली की, थंड व आनंददायक वारा वाहूं लागे; व दुपारीं थोडावेळ वाटणारा उकाडा पा नाहीसा होई.



पचमढी येथील एक सुंदर देखावा.

पचमढीस आमचा मुक्काम श्रीयुत आबासाहेब मोहि मालगुजार यांजकडे होता. त्यांच्या मुलांना येथील सर्व प्रे णीय स्थळें माहीत होतीं. म्हणून त्यांना बरोबर घेऊन रो एक दोन ठिकाणें पाहाण्यास आम्ही जात असूं. येथील मुक्का मांत अशा सहलींचीच फार मौज असते. कारण हवा थं असल्यामुळे थकवा लवकर येत नाही; व सृष्टीचें सुंदर स्वरू

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाखविणारे देखावे येथे अनेक आहेत. टेकड्या फारशा उंच नसल्या तरी गर्द झाडीने त्या फार सुंदर दिसतात. पण टेकड्याहूनहि येथील खोल दऱ्या व घळी या अधिक प्रेक्षणीय आहेत. या घळींना इकडील भाषेंत 'खड्ड' म्हणतात. या घळींत उतरून त्यांच्या तळाशीं पोचलें म्हणजे बहुधा सुंदरसा खळखळ वाहणारा जलप्रवाह किंवा एखादा लहानसा तलाव किंवा छोटासा धबधबा असे नाना तऱ्हेचे देखावे दृष्टीस पडतात.

या सर्व खड्डांत 'हंडी खो' नांवाचा जो खड्ड आहे तो फारच खोल आहे. आम्ही अर्थात्च त्यांत उतरण्याच्या भानगडींत पडलों नाहीं. याच्या काठाशीं उभे राहून आम्हीं खाली नजर फेकली. तेव्हा आमचे डोळे फिरले. याच्या तळाशीं सत्तर ऐंशी फूट उंचीच्या झाडांचें रान माजलें आहे, पण आम्ही वरून पाहिलें; तेव्हा हीं झाडें केवळ निळसर रंगाच्या ठिपक्याप्रमाणे दिसलीं. हा देखावा मौजेचा खरा. पण अमळ भयानकच वाटला. येथून परत फिरणेंच बरें असें सर्वांस वाटलें.

एक दिवस आम्ही महादेवाचें स्थान पाहून आलों. हें आसपासच्या सर्व भागांत फार पवित्र क्षेत्र मानलें जातें. येथे श्रावणसोमवारीं व माघ शिवरात्रीस मोठी जत्रा भरते असें म्हणतात. धूपगड चौरागडच्या टेकड्याहि फार सुंदर आहेत. येथील जलप्रवाहांत वाटर्समीट (जलसंगम) व साँडर्स ही दोन स्थळें फारच सुंदर आहेत.

उन्हाळ्यांत येथील हवा फार आल्हादकारक असल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुळे येथील शाळेला उन्हाळ्यांत सुटी नसते. पुढे पावसाळ्यांत जुलै व ऑगस्ट महिन्यांत शाळा बंद ठेवतात. कारण येथे पाऊस पुष्कळ सुमारे ८०–९० इंच पडतो. पचमढीची थंड हवा व सकाळ संध्याकाळ फिरण्याचा भरपूर व्यायाम यांनी आम्हां सर्वांच्या तब्बेती मात्र छान सुधारल्या आहेत.

ता. १५ जून रोजीं आम्ही पचमढी सोडून ता. १६ रोजीं परत नागपुरास आलों. हें थंड ठिकाण सोडतांना आमच्या अगदी जिवावर आलें होतें. पण उपयोग काय ? बाबांचीं कोर्टें उद्यांपासून सुरू होणार; तेव्हा जास्त थांबणें शक्यच नव्हतें.

असो; पत्र फार लांबलें, म्हणून येथेच पुरें करतो. लोभ असावा ही विनंती.

तुझा मित्र
आनंद

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) पचमढीची माहिती सांगा. (२) तुम्ही केलेल्या एखाद्या सफरीचें वर्णन करा. (३) मध्यप्रांतांत पचमढीला महत्त्व कां ?

२. टिपणें लिहा—खडु, हंडी खो, धूपगड, चौरागड.

३. कारण सांगा—

(१) पचमढी येथील शाळांना उन्हाळ्यांत सुटी नसते. कारण.—

(२) पचमढी येथे दूरवर सहली केल्या तरी लवकर थकवा येत नाही. कारण.—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा पसतिसावा.

मातीचें तेल.

मातीचें तेल किंवा राकेल हा पदार्थ माहीत नाही, असा मनुष्य आता विरळा. सुमारे साठ वर्षांपूर्वी मात्र अशी स्थिति नव्हती. त्यावेळी दिवाबत्तीसाठी तीळ, जवस, करडई, करंजी वगैरेचें तेल वापरीत असत. परंतु आता अगदी गरिबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांच्या घरीं राकेलचे दिवे वापरतात. कांचेची चिमणी लावून वापरलेले राकेल तेलाचे दिवे प्रकाशाच्या बाबतींत पूर्वींच्या समईपेक्षा पुष्कळच तेजस्वी असतात, हें सांगण्याची गरज नाही.

मोटारीचें एंजिन ज्याने चालते तें पेट्रोलहि आता सर्वांच्या ओळखीचें झाले आहे. पेट्रोल म्हणजे शुद्ध केलेलें मातीचें तेलच होय. मातीच्या तेलास जर पेटलेली बत्ती लागली तर एकदम भडका होऊन तें पेटतें हें प्रसिद्ध आहे. पेट्रोल तर या बाबतींत फारच भयंकर असतें. म्हणून तें फारच जपून वापरावें लागते; व आगीपासून तें फार दूर आणि बंदोबस्ताने ठेवावें लागतें. या बाबतींत सावधगिरी ठेवली नाही तर फार मोठे अनर्थ होतात.

मातीच्या तेलास इंग्रजींत रॉक-आईल (रॉकेल)—म्हणजे खडकांतलें तेल असें म्हणतात. पेट्रोल या शब्दाचा अर्थहि तोच आहे. रशिया देशाच्या दक्षिणेस, ब्रम्हदेशांत व अमेरिकेंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याच्या खाणी पुष्कळ आहेत. जमिनींत पुष्कळ वेळां तें बरेंच खोल असतें. तें काढण्यासाठी खडकांना भोंके पाडणारीं यंत्रें असतात त्यांचा उपयोग करून जमिनींत एक लांबच लांब लोखंडी नळी खुपसतात. ही नळी तेलाचा साठा जेथे असेल तेथपर्यंत खाली पोचली की, तीमधून तेल वर येऊं लागतें. केव्हा केव्हा ते इतकें जोराने वर येतें की, त्याचा कित्येक फूट उंचीचा एक फवाराच उडतो.



खाणींतून बाहेर पडलेलें तेल फार घाणेरडें व अमळ दाटसें असतें. याचा कित्येक वेळा गिरण्यांतील एंजिनला कोळशाप्रमाणे जाळण्यास उपयोग करतात, हें अशुद्ध तेल स्वच्छ केलें म्हणजे केरोसीन व पेट्रोल तयार होतें, त्याची पद्धत अशी—

उष्णतेने प्रथम तेलाची वाफ करावयाची. ही वाफ एका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नळीच्याद्वारें दुसरीकडे न्यावयाची व तेथे ती पुन्हा थंड करावयाची. थंड झालेल्या वाफचें तेल शुद्ध झालेलें असतें व सर्व घाण पहिल्या भांड्यांत तळाशीं सांचलेली दिसून येते.

हा खालचा गाळसुद्धा व्यर्थ जात नाही. यामधून कित्येक उपयोगी पदार्थ निघतात. या पैकी 'व्हॅसलीन' हा पदार्थ अंगाची कातडी मऊ ठेवण्यास, केसांना लावण्याचीं सुगंधी पोमेडें बनविण्यास व औषधांचीं मलमें तयार करण्यास फार उपयोगी पडतो. तसेंच गाड्यांचीं, गिरणींतील यंत्रांचीं चाकें घासून जाऊं नयेत म्हणून त्यांना वंगण देतात. त्याला उपयोगी अशीं तेलें हि या गाळांतूनच निघतात.

प्रश्न

(१) मातीचें तेल अत्यंत जरूरीचा पदार्थ कां ?
(२) राकेल कोठे कोठे सांपडते.
(३) मातीच्या तेलापासून कोणकोणते पदार्थ केले जातात ?
(४) मातीच्या तेलापूर्वी दिवाबत्तीसाठी कोणत्या तेलाचा उपयोग करीत ?
(५) शुद्ध केरोसीन व पेट्रोल करण्याची रीत सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा छत्तिसावा.

कालियामर्दन.

अभंग



कालिंदीचे डोहीं काळीयाची वस्ती ॥
ऐक परीक्षिती चरित्र हें ॥ १ ॥
पक्षि-श्वापदांनी सोडलें त्या स्थलां ॥
निघताती ज्वाला तया डोहीं ॥ २ ॥
विषाचीया योगें झाडें जळताती ॥
जीवन न येती कोणी त्याचें ॥ ३ ॥
वैकुंठनायक तया वनीं आला ॥
गोपाळांचा मेळा बरोबरी ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हुतुतु हमामा लपंडाव खेळती ॥
देवासी म्हणती लपें आता ॥ ५ ॥
तृषाक्रांति झाले ते गाई गोपाल ॥
पिती तेव्हा जळ काळीयाचें ॥ ६ ॥
तहानलीं मुलें नाही तया ज्ञान ॥
झाले गत-प्राण सकळांचें ॥ ७ ॥
नामा म्हणे तेव्हा कृपा-दृष्ट पाहात ॥
उठवी समस्त गाई-गडी ॥ ८ ॥
जगजेठी तेव्हा क्रोधावला चित्तीं ॥
करीन मी शांती तुझी आता ॥ ९ ॥
माझीया लेंकरां दीधलासी त्रास ॥
करीन मी नाश आता तुझा ॥ १० ॥
कळंबाचे वृक्षीं देव चढतसे ॥
टाकतसे उडी जळामध्ये ॥ ११ ॥
घाली तसे वेढे दिसते जळीं ॥
आकांत सकळीं मांडीयेला ॥ १२ ॥
गडी रडताती वत्सें पडताती ॥
कपाळ पीटिती सकळीक ॥ १३ ॥
वियोगाने तेव्हा पक्षी रडताती ॥
आता कृष्ण मूर्ती कैची अम्हां ॥ १४ ॥
बोलोनियां ऐसे निस्तेज पडती ॥
नद्या वाहती त्या स्थिरावल्या ॥ १५ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कपाळ पीटिती यशोदा, रोहिणी ॥
आता चक्र-पाणी कैचा आम्हा ॥ १६ ॥
धाव धाव कृष्णा दावी रे वदना ॥
पाजूं आता पान्हा कोणालागीं ॥ १७ ॥
नंद म्हणे माझें बुडालें जहाज ॥
अभाग्यासी मज कृष्ण कैचा ॥ १८ ॥
चिंतेने व्याकुळ पिटी वक्षस्थळा ॥
दावा रे सांवळा प्राण माझा ॥ १९ ॥
तयाचे मस्तकीं नाचे नारायण ॥
आरंभी गायन जगदीश ॥ २० ॥
त्रैलोक्याचा भार घाली हृषीकेशी ॥
दमीत दुष्टासी स्वामी माझा ॥ २१ ॥
होतां एक क्षण झाला तेव्हा क्षीण ॥
जाऊं पाहे प्राण काळियाचा ॥ २२ ॥
तेव्हा त्याच्या स्त्रिया येती काकुळती ॥
लक्ष्मीच्या पती कृपाळूवा ॥ २३ ॥
आम्हांलागीं आता देई चुडेदान ॥
धरीती चरण देवाजीचे ॥ २४ ॥
दीनाचा दयाळ दासाचा कैवारी ॥
नामा म्हणे हरी उतरला ॥ २५ ॥
राहुं नका एथें जावें समुद्रासी ॥
सांगे हृषीकेशी सकळीकां ॥ २६ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आला भगवान आनंदले गडी ॥
उभारीती गुढी जन तेव्हा ॥ २७ ॥
आला वनमाळी ॥ मग भेटती सकळी ॥ २८ ॥
यशोदा रोहिणी ॥ पोटि धरी चक्र-पाणी ॥ २९ ॥
गाई धावताती ॥ कृष्ण अंगाने चाटती ॥ ३० ॥
उड्या मारिताती ॥ गडी आनंदे नाचती ॥ ३१ ॥
न वर्णवे तो आनंद ॥ नामयाची बुद्धि मंद ॥ ३२ ॥

—नामदेव.

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) कालियामर्दनाची कथा सांगा. (२) श्रीकृष्णाने गोकुळांतील लोकांना कसें सुखी केलें ? (३) श्रीकृष्णाला चक्रपाणी कां म्हणतात ? (४) श्रीकृष्णाच्या आठवणीसाठा आपण कोणता सण कधी साजरा करतो ?

धडा सदतिसावा.

कुत्रा व त्याचे भाऊबंद.

भाग १ ला.

वाघ्या कुत्रा फार शूर व इमानी होता. त्याचा मालक शेतकरी होता. त्याचीं कोंबडीं, बदकें, शेळ्या मेंढ्या गुरें वगैरे बरींच होतीं. त्यावर रात्रीचा पहारा करण्याचें काम वाघ्याकडे होतें व तें तो विनचूक करी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एके दिवशीं वाघ्या घरापासून जरा दूर गेला. तेथे जंगलाच्या लगतच त्याला एक कोल्हा व एक लांडगा हे दोघे भेटले. त्या दोघांची मुद्रा वाघ्याला फारशी आवडली नाही. त्यांच्याशीं कांही न बोलतां तो परत फिरला; पण कोल्ह्याने त्यास हांक मारली व तो म्हणाला--



"वाघोबा, असें हो काय करतां ? तुम्ही तर आमचे भाऊबंद. तुम्ही आम्ही मूळचे एकाच कुळांतले. आपलें घर फार प्राचीन काळीं आशियाखंडाच्या जंगलांत होतें. पुढें आपल्यापैकी कांही माणसांशीं दोस्ती करून त्यांच्या सहवासांत राहूं लागले; व कांही जण पूर्वीप्रमाणेच जंगलांत राहिले. लांडगोबाला शिकारीखेरीज दुसरें खायाला कांही मिळेना, म्हणून त्याची मुद्रा अगळ भयंकर झाली आहे. बाकी त्याचा स्वभाव कांही वाईट नाही. हे आपलें जुनाट नातें ओळखून आपण आता मित्रभावाने वागावें असें मला वाटतें. तुम्हांला नाही असें वाटत ?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लांडग्यानेहि असेंच भाषण केलें, वाघ्याने त्या दोघांकडे निरखून पाहलें. तेव्हां चेहरा, अंगाची ठेवण, पंजे दात वगैरे बहुतेक गोष्टींत आपण कोल्हा व लांडगा यांत सारखेपणा आहे असें पाहून त्यांचें म्हणणें वाघ्यास पटलें. तो स्वभावाने सरळ व निष्कपटी होता. म्हणून त्याने त्यांच्याशीं दोस्ती करण्याचें कबूल केलें.

मग ते तिघे मिळून सहल करण्यास गेले. जातांना वाघ्याला एका गोष्टीचा अचंबा वाटला. रोज त्याला पाहून शेळ्या, मेंढ्या, गाई वगैरे प्राणी हसून स्वागत करीत. पण या कोल्ह्यालांडग्याच्या संगतीने हिंडतांना पाहून त्याला जो तो टाळण्याचा यत्न करूं लागला. एकदा तर या मंडळींना दुरून पाहूनच मेंढ्यांच्या कळपाने धूम ठोकली. तरी वाघ्यास त्या दोघांविषयी कांही शंका आली नाही.

प्रश्न

१. आठवणीची चांचणी—

(१) कोल्होबाने त्यांच्याशीं दोस्ती करण्याचें कबूल कां केलें ?

(२) वाघ्याला कोणत्या गोष्टीचा अचंबा वाटला ?

२. खरें किंवा खोटें हें सांगा—

(१) वाघ्या स्वभावाने सरळ व निष्कपटी होता.—

(२) त्या दोघांची मुद्रा वाघ्याला आवडली.——

३. वाक्यांत उपयोग करा—

मुद्रा, निष्कपटी, मित्रभाव, आमंत्रण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा अडतिसावा.

कुत्रा व त्याचे भाऊबंद.

भाग २ रा.

एके दिवशीं "उद्या आमच्या शेतांतील वाडींतच मला भेटण्यास तुम्ही या" असें आमंत्रण वाघ्याने त्यांना दिलें.

आमंत्रणाप्रमाणे ते दोघे वाघ्याकडे संध्याकाळच्या सुमारास आले, वाघ्याने त्यांचा सत्कार करून त्यांना थोडें बहुत खावयास दिलें. बरीच रात्र झाल्यावर मोठ्या प्रेमाने वाघ्याचा निरोप घेऊन हे पाहुणे परत गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं शेतांत असा बोभाटा झाला की, दोन तीन बदकें नाहाशीं झालीं. थोड्या वेळाने एकाने येऊन सांगितलें की, शेताच्या बांधापाशीं अर्धीमुर्धी खाल्लेलीं एक दोन कोंकरेंहि आढळलीं. वाघ्या स्वतः अगदी ईमानी; त्याला या बाबतींत आपल्या नातलगांची शंका मुळीच आली नाही.

एक दोन दिवसांनी हे पाहुणे पुन्हा वाघ्याच्या भेटीस आले. त्या दिवशीं दोन कोंबड्या व लट्ठशी मेंढीच नापत्ता झाली. आता मात्र वाघ्याला वाटलें, "यांत माझ्या भाऊबंदांचा तर कांही संबंध नाही ना ?"

यानंतर पाहुणे तिसऱ्यांदा आले. या वेळीं वाघ्याने त्यांचा पाहुणचार फारसा मनापासून केला नाही. तो म्हणाला, "बंधुहो, तुम्ही मजकडे दिवसा याल तर बरें. रात्रीं मला जरा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काम असतें." पण त्यांनी उत्तर केलें, "मोठ्या खेदाची गोष्ट आहे. पण दिवसा आम्हांला फार काम असतें. म्हणून दिवसा येणें शक्य नाही." ते परत निघाले; तेव्हा आज शेताच्या हद्दीपर्यंत त्यांजबरोबर जाऊन ते काय करतात हें पाहावयाचें असें वाघ्याने ठरविलें. शेताच्या हद्दीशेजारींच एक गवताची गंजी होती. तिच्या शेजारीं एक डुकरी नुकतीच व्याली होती. तिचीं गुबगुबीत पिलें पाहून लांडग्याच्या तोंडाला पाणी सुटलें; व त्यांपैकी एक पिलूं उचलून तो जोराने पळत सुटला. पिलूं खूप जोराने केंकावलें. वाघ्याच्या हें लक्षांत येतांच त्याने लांडग्याचा असा जोराने पाठलाग केला की, लांडगोबाला तें पिलूं खाली टाकून देऊन पळतां भुई थोडी झाली.

इतक्यांत वाघोबा येऊन पोंचले, कोल्होबा कोंबडीच्या घराशेजारीं टेहळणी करीत होते. त्यांनी लांडग्याची फजिती लांबून पाहिलीच होती. ते संभ्यपणाचा आव आणून म्हणाले, "काय हो हा लांडग्याचा पाजीपणा ! याने आमच्या सर्व कुळाळा आज बट्टा लावला. छे छेः ! असें काम आपल्याच्याने कधीहि होणार नाही !"

वाघ्या म्हणाला, "समजलें, समजलें, कोल्होबा, आता मी फसणार नाही. तुम्हांला जिवंत राहावयाचें असेल, तर तुम्ही या शेताचे आसपासहि येतां कामा नये. व्हा चालते एकदम येथून !"

कोल्होबानेहि तेथून पळ काढला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) दुसऱ्या दिवशीं कशाचा बोभाटा झाला ? (२) वाघ्याने तिसऱ्यांदा मनापासून स्वागत कां केलें नाही ? (३) लांडग्याची फजिती पाहून कोल्हा काय म्हणाला ?.

२. स्पष्टिकरण करा—

(१) तोंडाला पाणी सुटणें.

(२) पळतां भुई थोडी झाली.

३. समानार्थी शब्द देऊन त्याचा वाक्यांत उपयोग करा—

केंकावणें, बोभाटा, पाजीपणा.

धडा एकोणचाळीसावा.

गूळ व साखर.



पौष–माघाचे दिवस. ऊस तयार होऊन त्याचें गुऱ्हाळ चालूं होतें. जानराव पाटलांचा मुलगा त्यांना म्हणाला, "बाबा, शाळेतल्या माझ्या कांही मित्रांना मीं गुऱ्हाळावर रस पिण्याला बोलावूं का ?"

जानराव म्हणाले, "बगाराम, बोलाव तुझ्या सगळ्या मित्रांना. मुलांना गुऱ्हाळाची फार मौज वाटेल."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बगारामाने दुसऱ्या दिवशीं पांचपंचवीस मुलें बोलाविलीं. जानरावांनी मुलांच्या गुरुजींनाहि आमंत्रण दिलें होतें. म्हणून तेहि मुलांबरोबर आले.

मुलें भरपूर रस प्यालीं; त्यांनी ताजा ताजा गूळहि खाल्ला; मग मास्तर म्हणाले, "चला मुलांनो, आपण हा मळा व त्यांतील गुऱ्हाळ हिंडून पाहूं. मुलांनो, हा पाहिलात उसाचा मळा ? येथील ऊस कसा जाड व उंच झाला आहे ? याचें कारण ही जमीन चांगल्यापैकी आहे व यांच्या विहिरीला पाणीहि भरपूर आहे. उसाला पाणी फार लागतें. शिवाय खातहि चांगलें द्यावें लागतें.

उसाची लावणी करण्यापूर्वी जमीन चांगली नांगरून, तींत खात टाकतात व मग तींत पाणी सोडतात. जमीन चांगली भिजली म्हणजे चांगल्या जुनाट उसाचे तुकडे जमिनींत रोवून पायाने दाबतात. लावावयाचे तुकडे हात हात लांब असतात. लावतांना त्याचे डोळे वर करतात.

कोल्हीं व रानडुकरें यांना ऊस फार आवडतो, म्हणून उसाच्या शेताची राखण रात्रंदिवस फार काळजीपूर्वक करावी लागते.

मग ती मंडळी गुऱ्हाळापाशीं येऊन पोचली. एक लोखंडी चरक होता. त्याला बैल जुंपले होते. चरकाच्या एका बाजूने एक माणूस उसाचीं कांडीं चरकांत घालीत होता. दुसरा माणूस दुसऱ्या बाजूने तीं बाहेर काढून बाजूला फेकीत होता. गळालेला रस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पन्हाळींतून एका मोठ्या भांड्यांत पडत होता. एक भांडें भरलें म्हणजे त्यांतील रस काहिलींत टाकण्याकरितां घेऊन जात व दुसरें भांडें पन्हाळीशीं लावीत.

जवळच एक मोठा खळगा खणलेला होता. त्यांत लाकडाचे मोठे मोठे ओंडखे जाळीत होते. एक मोठी लोखंडी काहील होती व तींत रस कढविला जात होता.

गुरुजी म्हणाले, "मुलांनो, हा पहा रस उकळत आहे. त्याचा आता थोड्या वेळाने गूळ तयार होईल. रस स्वच्छ करण्याकरितां यांत चुन्याची भुकटी टाकतात. मग वर जी मळी जमा होते ती झाऱ्याने काढून टाकतात. रस चांगला पक्का झाला व त्यांतील पाणी आटून गेलें म्हणजे त्याचा गूळ बनतो. गुळाच्या ढेपी बनविण्यासाठीं हे पहा येथे वाटोळे खळगे खणले आहेत. यांत स्वच्छ खादीचा कपडा आंथरतात व मग हा पक्का रस त्यांत ओततात. रस निवाला म्हणजे घट्ट होऊन ढेप तयार होते; मग कपडा काढून घेतात."

बगाराम——पण गुरुजी, साखर कशी करतात ?

गुरुजी——गूळ म्हणजे कच्ची साखर. या कच्च्या साखरेचा फिरून पाक बनवितात व त्यांत कांही औषधी पदार्थ मिसळतात. त्या योगाने त्यांतील सर्व मळ निघून जाऊन पांढरी शुभ्र साखर तयार होते. शुभ्र साखर करण्याचे कारखाने आपल्या देशांत अद्याप फार थोडे आहेत. पश्चिमेकडील देशांत ते पुष्कळ आहेत. आपल्या देशांत बरीच साखर परदेशां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ून येते. पण अलिकडे आपल्या देशांत साखरेचे कारखाने पाट्याने निघत आहेत व थोड्याच वर्षांत सर्व देशांत पुरेशी साखर त्यांत बनूं लागेल, अशी उमेद वाटूं लागली आहे.

एका मुलाने प्रश्न केला, "साखर फक्त उसाचीच होते काय ?"

गुरुजी—बहुतेक साखर उसाचीच असते व सर्वांत चांगली तीच, पण कोठे कोठे खजूरीच्या झाडांपासून साखर बनवितात. जर्मनी, फ्रान्स वगैरे देशांत 'बीट' या नांवाचे गाजरासारखे लाल कंद असतात; त्यांपासूनहि पुष्कळ साखर करतात. अमेरिकेकडे 'मेपल' म्हणून एक झाड आहे, त्यापासून साखर काढतात.

गूळ व साखर हे पदार्थ फारते बेताबाताने खाल्ले तर शरीराच्या पोषणाला फार उपयुक्त आहेत. मात्र जास्त खाणें चांगलें नाही.

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) उसांसाठी जमीन, हवा, पाणी कसें लागतें ? (२) उसाची लागवड कशी करतात ? (३) साखर कशा पासून करतात ?

२. टिपणें लिहा—

गुऱ्हाळ, चरक, पन्हाळी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. कारण सांगा——

(१) गूळ व साखर जास्त खाणें चांगल नाही. कारण——

(२) उसाची राखण रात्रंदिवस काळजीपूर्वक करावी लागते. कारण——

धडा चाळीसावा.

लतिकाताईच्या सुमनची तक्रार.

सुमन—

(कविता)

आई बघ हा भ्रमर मला। पुन्हा वेडवाया आला ॥
सारे जण अजुनी निजले। गुंजारव याचा चाले ॥
आई नाही कुणि त्याला। चुकतां रागें भरण्याला?॥

लतिका—

काय जाहलें ?। कोण बोललें ?। सांग छबुकले।
सांग बाळ सारें मजला। रागावूं त्या भ्रमराला ॥ १ ॥

सुमन—

लपत छपत धावत येतो। उगाच कानीं ओरडतो ॥
जर मी थोडी घाबरल्यें। काय त्यांत याचें गेलें ! ॥
आपण तर काळा कुट्ट। नांव दुज्या लावी दुष्ट ॥
दुसऱ्यां हसतो। त्यां चिडवितो। खोड्या करितो।
हास म्हणावे स्वरुपाला। नंतर चिडवी दुसऱ्याला ॥ २ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दंहिवर दादाने मजला । दिधलेली मौक्तिकमाला ॥
तोडुन याने टाकियली । मोत्यांची जाळी नेली ! ॥
कालच तूं मज खाउ दिला । या मधुपाने लांबविला ॥
चोर बिलंदर । न बोललें तर । येई भरभर ।
गडि फू सोडुनि दे सांगे । मजही ऐकावे लागे ॥ ३ ॥
आई तो मज आवडतो । पण कां ग ऐसें करतो ?
निरोप जरि मी सांगितले । तरि ते याने पोंचविले ॥
शांत समयिं या भ्रमराने । रिझवावे मज निज गानें ॥
थकलें बाई । खोड्यापाई । याच्या आई ।
किती चांगला जरि असला हा दुर्गुण त्याला
जडला ॥ ४ ॥
बघ आई हा बघ आला । समजावीं थोडें त्याला ॥
भ्रमरा आता केव्हाही । चिडवावयाचें मज नाही ॥
ऐकायाचें जर नसलें । तर मैत्रीचे दिन सरले ॥

भ्रमर——

हो ! हो बाई । थांबा ताई । कां ही घाई ?
काय असे पण फणकारा । माफि मागतों क्षमा करा ॥५॥

—कु० विमल मोहनी.

प्रश्न

(१) लतिकाबाई ही कोण ? (२) सुमन ही लतिकेची कोण ? (३) सुमनने कोणती तक्रार केली ? (४) भुंगा सुमनला कसा त्रास देत होता ? (५) सुमनने भुंग्याला काय सांगितलें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा एकेचाळिसावा.

शिवाजीमहाराज.

भाग १ ला.

शिवाजीचा जन्म भोसले नांवाच्या मराठा क्षत्रिय कुलांत झाला. त्याचा बाप शहाजी हा अहमदनगरच्या मुसलमानी राज्यांतील शूर व प्रमुख सरदार होता मोगलांनी हें राज्य इ. स. १६३७ च्या सुमारास बुडविलें. त्या नंतर शहाजीने विजापूरच्या सुलतानाची नोकरी पत्करली. त्याची जहागीर पुणें, जुन्नर याच्या आसपास व कर्नाटकांत बंगळूर कडे होती.

शिवाजीचा जन्म इ. स. १६३० सालीं शिवनेरी किल्ल्यांत झाला. शहाजीने शिवाजी व त्याची आई जिजाबाई या उभयतांस पुणें येथील जहागिरींत ठेवलें. तेथे दादोजी कोंडदेवाने सरदारी बाण्यास शोभेल असें सर्व शिक्षण शिवाजीस दिलें. रामायण व महाभारत यांतील अद्भुत शौर्याच्या कथा ऐकून शिवाजीचे बाहू स्फुरण पावत.

लहानपणापासून शिवाजीस आपलें स्वतंत्र राज्य असावें. अशी इच्छा होऊं लागली. पंधरा सोळा वर्षांचा होतांच त्याने

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांही मावळे पुढारी जमविले व त्यांच्या साह्याने स्वतंत्र राजा-प्रमाणे आपल्या जहागिरीचा कारभार करण्यास सुरवात केली. हळू हळू तो विजापूरच्या हद्दींतील मुलखावर स्वाऱ्या करून लूट गोळा करूं लागला. मावळे शेतकरी अगदी अडाणी होते; पण शिवाजीच्या हातास्वाली ते चांगलें शूर व काटक शिपाई बनले. कांही जुने किल्ले दुरुस्त करून व कांही किल्ले युक्तिप्रयुक्तीने काबीज करून शिवाजीने आपल्या छोटेखानी राज्याचा चांगला बंदोबस्त केला.

ही हकीकत विजापुरच्या दरबारीं समजली. तेव्हा सुल-तानाने शहाजीस पकडून कैदेंत ठेवलें. या प्रसंगीं शिवाजीने मोगल बादशहा शाहजहान याच्याशीं संधान बांधलें व वडिलांची सुटका करून घेतली.

यानंतर शिवाजीचा उद्योग फिरून सुरू झाला. त्याने जावळी प्रांत आपल्या ताब्यांत घेतला व महाबळेश्वराशेजारीं प्रतापगडचा प्रसिद्ध किल्ला बांधला.

याप्रमाणे शिवाजीचें प्रस्थ वाढत चाललें हें पाहून विजापूर दरबारने अफजलखान नांवाचा सरदार पाठविला. हा फार दांडगा व शूर होता. शिवाजीस जिवंत किंवा मारून आणीन अशी प्रतिज्ञा करून तो निघाला होता. शिवाजीहि त्याच्या मोठ्या सैन्याशीं लढाई देण्यास कचरत होता. त्याने खानाशीं तहाचें बोलणें लावलें व एकवार आपली समक्ष भेट व्हावी, अशी इच्छा प्रदर्शित केली. त्याप्रमाणे भेट होण्याचें ठरलें. खानाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनांत या भेटींत शिवाजीस पकडावें असें होतें. शिवाजीच्या मनांत ही शंका होतीच. म्हणून तो अंगांत चिलखत घालून व जवळ कट्यार, वाघनखें वगैरे बाळगूनच खानाच्या भेटीस आला. अंदाजाप्रमाणे खानाने भेटींत शिवाजीस दाबून धरून पकडण्याचा यत्न केलाच. तेव्हा शिवाजीने हातांतील वाघनखें खानाच्या पोटांत खुपसून त्याला ठार केलें. लगेच शिवाजीच्या सैन्याने खानाच्या सैन्यावर हल्ला करून त्याचा धुव्वा उडविला! या यशामुळे शिवाजीची सर्व मराठ्यांवर विलक्षण छाप बसली व तो देवाचा अवतार आहे अशी समजूत झाली.

यानंतर विजापूर दरबारने सिद्दी जौहर नांवाचा सरदार शिवाजीवर पाठविला. त्याने पन्हाळगडचे किल्ल्यापर शिवाजी असतां त्यास वेढा दिला. पण शिवाजी त्याच्या हातावर तुरी देऊन निसटून गेला. त्याचा पाठलाग करण्यास सिद्दी जौहरने सैन्य पाठविलें; पण घोडेखिंडींत बाजी देशपांड्याने या सैन्यास अडवून धरलें; व त्यामुळे शिवाजीस सुरक्षितपणें रांगणा किल्ल्यावर पोंचतां आलें.

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) श्रीशिवाजीचें चरित्र थोडक्यांत लिहा. (२) शिवाजीला आपलें स्वतंत्र राज्य असावें असें कां वाटे? (३) शिवाजीने अफजलखानाला कसें ठार केलें?

२. खुलासा करा—

(१) हातावर तुरी देणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) धुव्वा उडविणें. (३) पाठलाग करणें.

३. कृतिपर—
शिवाजीसारखे डोंगरांतून, रानांतून फिरून जुने किल्ले-दऱ्या पहा.

धडा वेचाळिसावा.

शिवाजीमहाराज.

भाग २ रा.

यानंतर शिवाजीने मोगलांच्या मुलखांत लुटालूट करून किल्ले जिंकण्यास आरंभ केला. तेव्हा औरंगजेब बादशहाने शाहिस्तेखानास शिवाजीवर पाठविले, खान पुण्यास येऊन शिवाजीच्या वाड्यांत राहिला. पण एके रात्रीं शिवाजीने अचानक छापा घालून, खानावर हल्ला केला. खान कसाबसा निसटला ; पण त्याचीं बोटें छाटलीं गेलीं व मुलगा मारल गेला !

हा प्रकार समजतांच बादशहाने राजा जयसिंग याजबरोबर मोठी फौज देऊन शिवाजीचा बंदोबस्त करण्यास पाठविलें. त्याने मात्र भराभर शिवाजीचे किल्ले व मुलूख जिंकण्याचा सपाटा चालविला, तेव्हा शिवाजी जयसिंगास भेटला. बादशहाचें मांडलिकत्व कबूल करण्यास तयार असल्यास बादशहाशीं मी तुमची भेट करवितों, असें जयसिंगाने सांगितलें ! शिवाजीने हें कबूल केलें, व थोरला मुलगा संभाजी यासह अग्रायास जाऊन बादशहाची भेट घेतली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भेटीच्या वेळीं बादशहाने शिवाजीचा जसा मान ठेवावा तसा ठेवला नाही. म्हणून दरबार सोडून शिवाजी मुक्कामाच्या जागीं गेला. बादशहाने त्यास नजरकैदेंत ठेवून त्यावर कडक पहारा बसविला. हें मात्र फार मोठें संकट आलें. पण बुद्धीची खरी परीक्षा अशा संकटांतच होते. शिवाजीने कांही दिवस आग्रा येथील अमीर उमरावांकडे फळें व मिठाई भरून करंडे पाठविण्याचा क्रम सुरु ठेवला. असें बरेच दिवस चाललयावर या करड्यांविषयी पहारेकऱ्यांच्या मनांत कांही शंका राहिली नाही. नंतर एके दिवशीं या करड्यांत आपण व संभाजी असे बसून तो आग्रा शहराबाहेर पडला. मग गोसाव्याचा वेष घेऊन यात्रा करीत करीत तो दक्षिणेस येऊन पोचला. अशा रीतीने हें महासंकट टळलें.

यानंतर मात्र तो बादशहासहि भारी झाला, गेलेले किल्ले व मुलूख झपाझप घेण्यास त्याने सुरवात केली. प्रसिद्ध कोंडाणा किल्ला तानाजी मालसुरे याने सर केला. मात्र हा वीर या युद्धांत पडल्यामुळे "गड आला, पण सिंह गेला" असे उद्गार शिवाजीने काढले व किल्ल्यास 'सिंहगड' असें नांव दिलें.

हळू हळू मराठी राज्य बरेंच वाढलें. तेव्हा शिवाजीने रायगड येथे मोठ्या थाटाचा राज्याभिषेकोत्सव करून घेऊन 'छत्रपति' हें पद धारण केलें. श्रीशिवाजीमहाराज छत्रपति झाल्याचें पाहून मातोश्री जिजाबाईच्या डोळ्याचें पारणें फिटलें. शहाजी मात्र थोड्या वर्षांपूर्वी निवर्तला होता.

यापुढे कर्नाटकची स्वारी करून जिंजीचा महत्त्वाचा किल्ला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीछत्रपति शिवाजी महाराजांनी सर केला. यानंतर लौकरच महाराजांचा अंत झाला.

शिवाजीमहाराजांचें वर्तन अत्यंत शुद्ध होतें. हिंदूचें राज्य स्थापन केलें, तरी मुसलमानांच्या मशिदी व धर्मग्रंथ यांस ते फार आदराने वागवीत. कल्याणचा खजीना त्यांनी लुटला त्या प्रसंगीं तेथील सुभेदाराची सून त्यांच्या हातीं लागली. तिला त्यांनी मोठ्या सन्मानाने परत पाठविली. सैन्यांतील शिपायांवर ते मुलांप्रमाणे प्रेम करीत; पण कोणी अन्याय अगर जबरदस्ती केली तर मात्र त्यास कठक शिक्षा करीत. अष्टप्रधान नेमून त्यांनी राज्याची व्यवस्थाहि चोख ठेवली होती. सैन्य, आरमार व किल्ले यांचा बंदोबस्त तर फारच उत्तम होता. म्हणूनच औरंगजेबासारखा धूर्त व प्रबल शत्रु असूनहि शिवरायांनी स्वतंत्र मराठी राज्य स्थापलें. यांत त्यांच्या शौर्याची, उद्योगाची व मुत्सद्दीपणाची साक्ष पटते.

मराठ्यांच्याच काय, पण सर्व हिंदुस्थानच्या इतिहासांत शिवाजी महाराजांच्या तोडीचा राज्यकर्ता दुसरा कोणी झाला नाही.

प्रश्न

स्मृति चांचणी—(१) शिवाजीने शाहिस्तेखानाचा कसा समाचार घेतला ? शिवाजीने आग्र्याहून सुरका कशी करून घेतली ? डोळ्यांचें पारणें फिटलें म्हणजे काय ? शिवचरित्रापासून कोणता बोध घ्यावा ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा त्रेचाळिसावा.

गोंड लोक.

मुलांनो, आपण ज्या मध्यप्रांतांत राहतो त्यास पूर्वी गोंडवन असें म्हणत, याचे कारण या भागांत पूर्वी मुख्यत्वें करून गोंड लोकांची वस्ती होती. अद्याप सुद्धा या प्रांतांत गोंडांची वस्ती सुमारे तीस लाखापर्यंत आहे. यांचे मुख्य वसतिस्थान



म्हणजे सातपुड्याच्या पठारावरील जंगलें व बस्तर राज्य हीं होत.

गोंड हें नांव यांना कोणी दिलें हें नीटसें समजत नाही. कारण ते आपल्यास 'कोईतूर' अथवा 'कोई' म्हणवितात. फार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राचीन कालापासून ते आपल्याला 'रावणवंशी' असेंहि म्हणवीत आले आहेत. रामचंद्राने ज्या रावणाचा वध केला त्यांच्याशीं यांचा कांहीं संबंध होता की नाहीं, हें सांगणें शक्य नाहीं.

हिंदुस्थानांतील खऱ्या मूलनिवासी जातींत गोंडांची गणना होते. पण आजमितीस ते जितके अडाणी व मागा सलेले दिसतात तितके ते पूर्वीच्या काळीं नव्हते. सुमारें चौदाव्या शतकापासून तों अठराव्या शतकापर्यंत या भागांत गोंड हे राज्यकर्ते होते. गढामंडला, चांदा, देवगड वगैरे ठिकाणीं त्यांचीं स्वतंत्र राज्यें होतीं. पुढे मोगलांच्या व मराठ्यांच्या स्वाऱ्यामुळे हीं राज्यें नष्ट झालीं, तथापि त्या लोकांत संग्रामशाह व राणी दुर्गावतीसारखे शूर व कर्तबगार राज्यकर्ते होऊन गेले, हें विसरतां कामा नये.

पण एकंदरीने ही जात जंगली हेंच खरें. शेती, व्यापार-धंदा, कलाकौशल्य इत्यादि बाबतींत हे फारच मागसलेले आहेत. त्यांची राहणी अत्यंत साधी असते. रानांतील कंद-मुळें, फळें, उंदीर, खेकडे, हरण, ससे हें यांचें खाद्य. मध्य-प्रांतांतील जंगलांत यांना काय तोटा ? यामुळे हें स्वभावतःच फार आळशी बनले. यांची शरीरप्रकृति चांगली निकोप व मजबूत असते. पण यांस काम करण्याची हौस मात्र अगदी नाहीं. जरासें खाण्यास मिळालें व दारू प्यावयास मिळाली की झालें हे नाच गाण्यांत दंग ! पूर्वी तर हे बहुधा नागवे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहात. आता लंगोटी घालतात. शहराशीं संबंध असलेले कांही लोक मात्र धोतर वगैरे कपडे वापरतात.

गोंड लोकांना नाचाची आवड फार. त्यांच्या नाचाच्या वेळचा पोशाख फार मौजेचा असतो. डोक्यावर दोन शिंगे व पाठीमागे एक शेपूट ! पूर्वी लढाईस जातांनाहि ते असाच पोशाख करीत. अजूनहि आसामांतील नागा लोकांत तशी चाल आहे.

गोंड लोकांत प्रेतें पुरण्याची चाल आहे. पूर्वी तर जेथे माणूस मरेल तेथेस त्यास गाडून टाकीत. मग तो घरांत मरो अथवा बाहेर मरो. आता मात्र स्मशानांत जातात. प्रेताच्या शांतीसाठी गाय, बैल, बकरा वगैरेचा बळी देत. गरीब लोक बकरा, कोंबडा यावर भागवीत.

गोंडांत पूर्वी जातपात कांही नव्हती. पण सुधारलेल्या हिंदू जातींच्या सहवासाने त्यांतहि पुढे थोड्याबहुत जाती निर्माण झाल्या. त्यांतले मुख्य भेद आगरी व परधान हे होत. आगरी हे आगीच्या सहाय्याने लोहार काम करतात. परधान हे गोंडामधील उपाध्यायच व्हटलें तरी चालेल. हे भिक्षा मागून उपजिविका करतात. गोंड लोकांचा धर्महि त्यांच्या अडाणीपणास साजेसाच आहे. पण आता त्यांची गणना हिंदुधर्मांतच केली जाते. त्यांचा बडादेव हा बळी देऊन खूष करावा लागतो. त्यासाठी पूर्वी माणसाचा देखील बळी देत. पण आतां कायद्यानेच या चालीस बंदी केली आहे. भुतें, खेतें जादूटोणा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांवर त्यांचा पूर्ण विश्वास असतो. अर्थात् रोगराई वगैरे आपत्ति निवारण्यासाठी देवतांना बलिदान देणें व मंत्रतंत्राने खूष करणें जरूर आहे असें हे लोक मानतात.

कांही लोक शेतकीहि करतात. पण ती अत्यंत मागासलेली व साधी असते. हे लोक पूर्वीच्या काळीं सुखी होते. कारण त्यावेळीं जंगलाचें राज्य मोकळें असे व त्यांच्या तुटपुंज्या गरजा तेथे सहज भागत. पण जसजसे जंगलाचे कायदे कडक होत चालले व जंगलाची कोणतीहि वस्तु मोफत मिळेनाशी झाली, तशी या अडाणी लोकांची स्थिति फार हलाखीची होऊं लागली. शेती करावी तर जमीनजुमला हातीं नाही; कलाकौशल्य माहीतच नाही; फुकटची दारू गाळण्याची परवानगी नाही; अशी या गरीब लोकांची स्थिति झाली आहे.

हळू हळू कां होईना, या जातींत शिक्षणाचा प्रसार होत आहे; व ते सुधारणेच्या मार्गास लागत आहेत. ही समाधानाची गोष्ट आहे.

प्रश्न

१. आठवणीची चांचणी——

(१) मध्यप्रांताच्या कोणत्या भागाला 'गोंडवन' म्हणतात ?
(२) गोंडाची माहिती सांगा.
(३) गोंड राज्यें कोठे कोठे होतीं.
(४) गोंडाची सुधारणा होण्यासाठी कोणत्या गोष्टी केल्या पाहिजे ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. समानार्थी शब्द सांगून त्यांचा वाक्यांत उपयोग करा.

आजमिती, राज्य, कर्ते, तुटपुंजे.

धडा चव्वेचाळीसावा.

प्रसंगावधान.

एखादें संकट अथवा आणीबाणीची वेळ आली असतां न घाबरतां प्रसंगास योग्य असें वर्तन करणें, याचें नांव 'प्रसंगावधान'. पुष्कळ लोकांत हा गुण नसतो. जरा कठीण प्रसंग आला की, ते गोंधळून जातात व काय करावें हें त्यांना सुचत नाही. त्यामुळे त्यांच्या हातून उपाय न होता अपायच होतो. याचीं एक दोन उदाहरणें पुढे दिलीं आहेत.

गणपतरावांची आवडी एकदा समईपाशी खेळत होती. खेळतां खेळतां तिच्या परकराचा घोळ दिव्यास लागून परकर पेटला. जवळच एक मोलकरीण होती. तिने घाबरून "बाई, बाई," अशा आरोळ्या मारण्यास सुरवात केली. आवडीला तिची यत्किंचित् मदत झाली नाही. सर्व अंग भाजून आवडीने किंकाळी फोडली. इतक्यांत तिची आई धावून आली. ती मात्र हुशार होती. तिने बिछान्यांतील घोंगडी काढून आवडीच्या अंगावर घातली व ती सडकून दाबतांच आग विझली. आई वेळेवर आली व तिला बरोबर युक्ति सुचली, म्हणून आवडीचे प्राण वांचले !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्या उलट पुढील गोष्ट आहे. एक बाई मांडावर आपला मुलगा घेऊन बसली होती. जवळच बोरें पडलीं होतीं. मुलाने एक बोर उचलून तोंडांत घातलें. तें त्याच्या घशांत अडकून श्वास कोंडला. तेव्हा तें मूल तडफडूं लागलें. आईने लगेच त्याच्या मानेवर बुक्क्या मारल्या असत्या, तर बोर केव्हाच निघालें असतें पण हें तिला सुचलें नाही. मांडीवरचा मुलगा खाली ठेवून ती शेजारच्या आयांबायांस हाक मारण्यास गेली. ज्या बाया आल्या त्याहि तिच्यासारख्याच घाबरट व अडाणी. शेवटी कांही इलाज न होतां मूल तडफडून मेलें !

एका बाईचें मूल शिडीवर पायऱ्या चढून वर गेलें हें पाहून ती इतकी घाबरली की. तिने किंकाळीच फोडली. त्या सरसें मूल दचकून शिडीवरून खाली पडलें व फार दुखावलें.

तेंच दुसऱ्या एका प्रसंगीं एका माणसाने काय केलें तें पाहा. एक मूल एका माळावर चढून अगदी कडेशीं गेलें होतें व तेथून खालीं वाकून पाहात होतें. जरा पाऊल मागे पुढे झालें असतें तर तें खाली पडलें असतें. पण त्या माणसाने कांही एक गडबड न करतां हळूच त्याच्या मागून जाऊन त्याचा कुडता पकडला न मग त्याचा हात धरून त्याला खाली आणलें.

सारांश, जो गडबडून जात नाही व डोकें शांत ठेवतो. त्यालाच योग्य इलाज सुचतो.

प्रश्न

१. स्मृति चांचणी—प्रसंगावधान म्हणजे काय ? अंगीं प्रसंगाव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धान कां असावें? उदाहरणें देऊन सिद्ध करा. प्रसंगावधान अंगीं नसल्यास कसें नुकसान होतें हें उदाहरण देऊन सिद्ध करा.

२. चूक किंवा बरोबर हें सांगा—

(१) जो संकटाचे वेळीं गडबडून जात नाही त्यालाच योग्य इलाज सुचतो.

(२) आवडीला मोलकरीणने मदत केली.

धडा पंचेचाळीसावा.

फिरून यत्न करून पहा!

इंग्लंड व स्कॉटलंड हे देश हल्लीं एकाच राजाच्या अमलाखाली आहेत. सुमारे पांचशे वर्षांपूर्वी ते स्वतंत्र होते व त्यांच्यांत सारख्या लढाया चालत.

एकदा इंग्लंडच्या राजाने स्कॉटलंड देश जिंकला व तो आपल्या राज्यास जोडला. पण थोड्याच दिवसांत स्कॉटलंडच्या लोकांनी बंड केलें. त्यांचा पुढारी रॉबर्ट ब्रूस या नांवाचा होता. तो शूर व लोकप्रिय होता. त्याने इंग्लंडशीं एकामागून एक अनेक लढाया केल्या. पण त्यांत त्याला यश मिळालें नाही. एका लढाईंत तर त्याच्या सैन्याचा पूर्ण पराभव झाला. व त्याला डोंगराच्या एका गुहेंत लपून बसावें लागलें.

या वेळीं ब्रूसचें मन निराशेने अत्यंत कष्टी झालें होतें. इंग्लंडविरुद्ध लढण्यांत यांउपर जय मिळणें शक्य नाही व तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाद आपण सोडून द्यावा, असा विचार त्याच्या मनांत सारखा येऊं लागला.

एके दिवशीं असाच विचार करीत तो आपल्या गुहेंत पडला होता. सहज त्याचें लक्ष गुहेंतील एक कोपऱ्याकडे गेलें. तेथे एक कोळी आपलें जाळें विणण्याच्या खटपटींत होता. गुहेची भिंत बरीच गुळगुळीत होती. या मुळे कोळ्याच्या जाळ्याचे तंतु एका ठिकाणीं चिकटून राहिनात. तंतूचा धागा एका बाजूने पुरा करून कोळी दुसऱ्या बाजूकडे येऊं लागला की तो धागा भिंतीवरून खाली घसरे; व कोळीहि खाली पडे.

तीनदा कोळी खालीं पडला व फिरून वर चढला. कोळ्याची चिकाटी दांडगी होती. कोळ्याने आपला प्रयत्न सोडला नाही. चढणें व पडणें असें सहा वेळां झालें. रॉबर्ट ब्रस ही गंमत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहातच होता. ब्रूस म्हणाला, काय वेडा कोळी आहे हा ! व्यर्थ धडपड करीत आहे !

कोळी मात्र आपला नाद सोडण्याला तयार नव्हता. त्याने फिरून एकदा तंतु काढला व वरची मजल गाठली या खेपेस तो खाली पडला नाही त्याने अर्ध्या एक तासांत तें पूर्णपणें तयार केलें.

हें पाहून ब्रूसने हर्षाने टाळी पिटली. तो म्हणाला:—"बाबा कोळ्या, तुला मी एक क्षुद्र किडा समजत होतों. पण तूं माझा गुरु आहेस. मी तुझ्यासारखाच यत्न करीन व यश मिळवीन !"

ब्रूसने फिरून सैन्याची जमवाजमव केली; व या खेपेस त्यास पूर्ण यश मिळून तो स्वतंत्र स्कॉटलंडचा राजा झाला !

प्रश्न

१. आठवणीची परीक्षा—

(१) रॉबर्ट ब्रुसची गोष्ट सांगा.

(२) कोळी रॉबर्ट ब्रुसचा गुरु कसा ?

(३) कोळ्यापासून काय शिकावें ?

२. खरें किंवा खोटें हें सांगा—

(१) हल्ली स्कॉटलंड देश परतंत्र आहे.

(२) कोळ्याची चिकाटी दांडगी होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा सेहेचाळीसावा.

रानपाखरास.

(कविता)

[चाल–भूपाळीची]

रानपाखरा रोज सकाळीं येसी माझ्या घरा,
गाणें गाउनि मला उठविसी, मित्र जिवाचा खरा ।
शरीर निळसर, शोभे झालर ठिपक्यांची त्यावरी,
सतेज डोळे चमचम करिती जणुं रत्नें गोजिरीं ॥ १ ॥
पाय चिमुकलें, पंख चिमुकलें, देह तुझा सानुला;
अफाट आभाळांतुनी कैसें उडतां येते तुला ? ।
रात्र संपतां डोंगर चढुनि वर येतो भास्कर,
तूंही त्याच्या संगें येसी, गात गात सुस्वर ॥ २ ॥
वाट चालुनी संध्याकाळीं रवि सोडी अंबरा,
आणि तूंहि मग पंख उभारुनि जाशी आपुल्या घरा ।
सूर्यासंगें जाशी येशी सदा कदा कां बरें ?
शेजारी आहेत काय रे परस्परांची घरें ? ॥ ३ ॥
देह ऐवढा अपाय कोणी करील तुजला इथें,
म्हणून का तुज रवीबरोबर माय तुझी धाडते ?
सांगतोस का तिला कसा हा छानदार बंगला ?
होते कारे कधी आठवण माझी सखया तुला ? ॥ ४ ॥
तुझ्यासारखें जावें वाटे उडत मजेने वरी,
नेशिल का मज तुझ्या बिऱ्हाडीं बसवुनि पंखावरी ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माय तुझी येईल, सूर्यही येईल भेटावया,
मजाच होइल सख्या पाखरा, नेइ एकदा मला ॥ ५ ॥
—गोपीनाथ.

प्रश्न

(१) कवीने रानपांखरास काय विचारलें ?
(२) कवितेंत सांगितलेलें रानपांखरूं कोणतें ?
(३) कवीने पांखरास काय सांगितलें ?

धडा सत्तेचाळीसावा.

हिवताप व डांस.

आश्विन महिन्याचे दिवस. पावसाळा नुकताच संपलेला. आकाश स्वच्छ व निरभ्र होतें. धानाचीं, ज्वारीचीं शेतें पिकून कापणीस तयार झालेलीं. जिकडे तिकडे सृष्टीचें रूप मनास प्रसन्न करणारें असें होतें. पण डोंगरगावच्या लोकांत मात्र उत्साह नव्हता. घरोघर माणसें हिवतापाने आजारी पडली होतीं. एकेंकाच्या घरीं दोन दोन, तीन तीन आंथरुणें ! शाळेंतहि निम्मीं मुलें गैरहजर दिसूं लागलीं.

आरोग्यखात्याचे डॉक्टर गावोगाव हिंडून लोकांना या रोगापासून कसा बचाव करावा याची माहिती देत होते. आज त्यांचा मुक्काम डोंगरगावीं होता. चावडीवर संध्याकाळच्या सुमारास त्यांनी गावच्या मंडळीस बोलाविलें होतें. नाथूराम मास्तरहि आपल्या शाळेंतील मुलांना घेऊन तेथे आले होते.

सर्व मंडळी जमल्यावर डॉक्टर म्हणाले—मित्रहो, तुम-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

च्या गावाची स्थिती हिवतापाने फारवाईट झाली आहे, हें पाहून मला फार खेद होतो. हा रोग या आश्विन कार्तिकच्या दिवसांत नेहमी पेक्षा जास्त येतो, म्हणून यास मोसमी ताप असेंहि म्हणतात. या तापाने माणूस अत्यंत अशक्त होतो व त्यामुळे पुढे त्याला दुसरे अनेक रोग पछाडतात. म्हणून त्याची हयगय करणें बरोबर नाही.

या तापांत प्रथम सपाटून थंडी वाजून येते; इतकी की, माणूस थंडीने थरथर कांपूं लागतो व कितीहि पांघरुणें घातलीं तरी थंडी जात नाही, थोड्या वेळाने अंगात ताप भरतो. मग थंडी अजीबात जाते. अंगाची आग होते. कपाळ दुखतें. कधी कधी ओकारी होते. ताप खूप (कधी कधी १०५°–१०६°) चढतो. कांही तासांनी सपाटून घाम येतो व मग ताप अजीबात उतरतो.

या तापाचे पुष्कळ प्रकार आहेत. कधी तो रोज दुपारीं येतो व संध्याकाळचे सुमारास उतरतो. कधी एक दिवसाआड येतो. कधी दर चवथ्या दिवशीं येतो.

हिवताप अथवा मलेरियाचा आजार होऊं नये, याला दोन प्रकारचे इलाज आहेत. पहिला प्रतिबंधक, म्हणजे हा रोग होऊंच देऊं नये. अलीकडे या बाबतींत असा शोध लागला आहे की, हा आजार एक प्रकारच्या डासांपासून होतो, डास माणसांना चावतात व या रोगाचें विष माणसाच्या रक्तांत सोडतात व मग माणूस आजारी होतो. अर्थात् डास नाहीसें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करणें हाच या रोगाचा खरा प्रतिबंधक उपाय होय. डास हे इतर किड्याप्रमाणेच अंडीं, अळ्या, कोशावस्था व पंख असलेली



(डांस व त्याच्या वेगवेगळ्यां अवस्था)

अवस्था, अशा चार अवस्थांतून जातात. पंख फुटलेल्या डासांना मारणें जरा कठीण आहे. पण अंडीं व अळ्या यांना मारून टाकणें सोपें आहे. डास आपलीं अंडीं तुंबलेल्या पाण्यांत घालतात. अर्थात् घराशेजारीं पाण्याचीं डबकीं, गटारें वगैरे राहूं देऊं नये, हा पहिला उपाय. अशीं डबकीं, एकदम काढून टाकणें शक्य नसेल तर त्या पाण्यांत मधून मधून थोडें रॉकेल तेल ओतावें. ते पाण्याच्या पृष्ठभागावर पसरतें व त्याने डासांच्या अळ्या मरून जातात.

ज्याला शक्य असेल त्याने मच्छरदाणींत निजावें म्हणजे डास चावूं शकत नाहीत. निदान निजतांना तोंडास व जो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पांघरुणाने झाकला नसेल त्या भागास थोडें मातीचें तेल अगर व्हॅसलीन लावावें.

ताप आल्यावर मात्र औषध घेणें जरूर आहे; व या तापावर रामबाण औषध कोयनेल आहे. हें औषध सिंकोना नांवाच्या झाडाच्या सालीपासून काढतात. हे सर्वांना स्वस्त मिळावें म्हणून सरकारने पोस्ट ऑफिसांत विक्रीस ठेवलेलें असतें. याच्या तीन किंवा चार पुड्या अथवा गोळ्या रोज लिंबाच्या रसांतून द्याव्या आणि वर दूध पिण्यास सांगावें. बहुधा एक आठवड्यांत गुण येतो. ताप थांबल्यावरहि कांही दिवस थोडें कोयनेल घ्यावें. म्हणजे ताप फिरून उलटत नाही. औषध देण्यापूर्वी एकदा एरंडीचें तेल देऊन पोट साफ करावें, म्हणजे कोयनेल जलद लागूं पडतें.

साथीच्या दिवसांत रोज अगर एक दिवसाआड कोयनेलची एकादी पुडी घेतल्यास, अगर काडेचिरायताचा काढा पीत गेल्यासहि हिवताप सहसा येत नाही.

मित्रहो, मीं सांगितलेल्या गोष्टींवरून तुमच्या ध्यानांत आलेंच असेल की, या रोगाच्या तडाक्यांतून वाचणें पुष्कळ अंशीं तुमच्या हातचें आहे.

इतकें बोलून डॉक्टरसाहेबांनी आपलें व्याख्यान संपविलें.

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) हिवताप कसा होतो ? (२) त्यावर उपाय काय ? (३) डांसाचें जीवन वर्णन करा. (४) हिवताप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आला म्हणजे काय होतें ? (५) डॉक्टराने दिलेलें व्याख्यान तुम्ही वर्गांत सांगा.

२. टिपणें लिहा—कोयनेल, सिंकोना, काडेचिरायता.

धडा अट्ठेचाळिसावा.

खेडेगावाचा कारभार.

भोकरवाडीचे जानराव पाटील यांजकडे हुरडा तयार झाला होता, म्हणून त्यांनी आपले मित्र रामराव मोहिते यांस एलिचपूरहून मुलांमाणसांसह बोलाविलें होतें. तेथे असतां रामराव व मुलें एक दिवस चावडीवरून चाललीं होतीं. तेथे कोंडोपंत कुळकर्णी बसले होते. त्यांनी रामरावांना हाक मारली; म्हणून ते मुलांसह चावडीवर गेले.



चावडीची इमारत म्हणजे एक प्रशस्तशी पडवी व तिच्या बाजूला एक लहानशी खोली, यापेक्षा जास्त कांही नव्हतें. तेथे जाजमावर कोंडोपंत बसले होते व त्यांच्याजवळ कसल्या तरी मोठ्या वह्या होत्या जवळ पांच सहा शेतकरी बसले होते. त्यांनी आपल्या जवळचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रुपये काढले व म्हणाले, "हे घ्या दादा शेतसाऱ्याचे पैसे," कोंडोपंतांनी ते मोजून घेतले, आपल्या मोठ्या वह्यांत त्यांनी कांही लिहिलें व मग ते शेतकऱ्यांना म्हणाले, "आणा पाहूं तुमच्या पावती–वह्या !" शेतकऱ्यांनी त्या दिल्यावर त्यांनी त्यांतहि कांही तरी लिहिलें.

मग कोंडोपंत एका गड्याकडे वळून म्हणालेः—"अरे शिदबा, तो हरबा गवळी व धाकू माळी यांजकडे अजून चावडीची बाकी राहिली आहे; तर ती ताबडतोड भरा असें त्यांना सांग, तसेंच तो लखू सोनार आहे ना, त्याने आपल्या घरासमोर उकिरडा केला आहे. तो काढून टाकण्याची त्याला ताकीद दे. आणखी हे पहा, सदू माळ्याबद्दल त्या चंद्रभान शिंद्याची काल तक्रार आली आहे कीं, सदू नेहमी आपलीं गुरें दुसऱ्याच्या रानांत मोकळीं सोडतो म्हणून. त्याला एकदा घेऊन ये मजकडे; म्हणजे चांगली ताकीद देतों त्याला."

शिदबा निघून गेला. थोड्या वेळाने रामराव व मंडळीहि परत विऱ्हाडीं आली. आल्यावर वसंत म्हणाला, "बाबा, चावडींत काय चाललें होतें हो ?"

रामराव—चावडींत गावचा कारभार चालतो. ते कोंडोपंत या गावचे पटवारी आहेत. ज्यांच्याकडे आपण आलों आहोंत ते या गावचे पाटील आहेत. पाटील हाच गावचा मुख्य अधिकारी कामगार होय. सरकारी सारा वसूल करणें, गावांत स्वच्छता ठेवणें, कोठें गुन्हेगारी झाल्यास त्याची पोलिसांत खबर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देणें, सरकारी अंमलदार तपासणीस आले म्हणजे त्यांना लागेल ती मदत देणें वगैरे किती तरी कामें पाटलास करावीं लागतात. गावच्या शाळेंत मुलांची भरती करणें, मुलांना देवी टोचणें वगैरे कामींहि पाटलाची मदत घ्यावी लागते. पाटील म्हणजे गावचा राजाच असतो, असें म्हटलें तरी चालेल.

वसंत—अबब ! किती तरी कामें असतात हीं ! मग पाटलाच्या हाताखाली दुसरे मदतगारहि लागत असतील.

रामराव—लागतात तर. कुलकर्णी अथवा पटवारी हा पाटलाचा मुख्य मदतगार. जमाबंदी व करवसुली यांत लिहिण्याचें व हिशेबाचें काम पुष्कळ असतें. हें काम पटवारी करतो.

कोंडोपंत चावडींत ज्याला कामकाज सांगत होते तो शिदवा चावडीचा चपरासी. कोठे कोठे त्याला 'जागल्या' किंवा 'कोतवाल' म्हणतात. चावडींत हजर राहून हा पाटीलपटवाऱ्यांना हरतऱ्हेची मदत करतो. पूर्वीच्या काळीं खेड्यांत रात्रींचा पाहारा करण्याचें काम त्याच्याकडे असे ; म्हणूनच त्याला 'जागल्या' म्हणत. या कामावर पूर्वी बहुधा महार जातीच्या माणसास नेमीत. आता मात्र तसा नियम नाही.

पाटील, पटवारी, जागल्या हे बहुधा वतनदार कामगार असतात ; म्हणजे त्यांची नोकरी वंशपरंपरेने चालते. पण दिवसेदिवस हा प्रकार कमी होत चालला आहे.

वसंत—पण कायहो बाबा, खेड्यांत कांही पोलिसाचा बंदोबस्त असतो का ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रामराव--शहराइतका चांगला नसतो, पण थोडाबहुत असतो. दहापांच लहान खेडीं मिळून एक पोलीसठाणें असतें. तेथील ठाणेदाराच्या हाताखाली दहा बारा शिपाई असतात. पाटलाकडून किंवा दुसऱ्या कोणाकडून गुन्ह्याबद्दलचीं खबर आली की, पोलिस गुन्ह्याचा तपास करतात ; व गुन्हेगारांना पकडून मॅजिस्ट्रेटसाहेबापुढे चौकशीस नेतात.

वसंत--येथे सफाईचा बंदोबस्त कांही असतो का नाही ?

रामराव--फारसा नसतोच, पाटील बहुधा गावच्या वतनदार महाराकडून गावांतील घाण कचरा झाडवून घेतो. शौचकूप वगैरे खेड्यांत फारसे नसतातच. लोक बाहेर रानांतच शौचास जातात. मोठेंसें गाव असलें म्हणजे तेथे मात्र गाव-पंचायत असते व तिच्याकडे सफाई वगैरेची व्यवस्था सोपविलेली असते.

नागपुर, भंडारा इकडे मात्र पाटील नेमण्याची पद्धत नाही, तिकडे गावाचा सर्व वसूल सरकारांत भरण्याचें काम मालगुजार करतो. पटवारी मात्र सर्व ठिकाणीं लागतो. मालगुजारास एकापेक्षा अधिक गावें पहावयाचीं असलीं, तर तो प्रत्येक गावीं आपला एक मुकादम नेमतो.

प्रश्न

स्मृति चांचणी--(१) खेडेगावचे मुख्य कामगार कोणते ? (२) खेडेगावचा कारभार कसा चालतो ? (३) खेडेगावांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोलीसचा बंदोबस्त कोणाकडून ठेवला जातो ? (४) पाटलाचीं कामें कोणती ? (५) तुम्ही एखाद्या गावाचे पाटील बनलां तर त्याचा कारभार कसा चालवाल ?

धडा एकोणपन्नासावा.

भातुकली.

भाग १ ला.

कमल--काग विमल, एवढी घाईने कुठे चाललीस ?

विमल--अग बोलावणीं करायला निघालें आहें.

कमल--अग पण बोलावणीं कसलीं तें तर कळूं देशील ?

विमल--उद्या आमच्या येथे भातुकली आहे; तर जेवायला व खेळायला सर्व दिवसभर आमच्याकडे यायचें बरं कां ?

कमल--अस्सं ! पण भातुकली म्हणजे काय ग ?

विमल--तें आता उद्या प्रत्यक्षच पहा म्हणजे झालं.

कमल--हो पण आईला सांगून जा.

विमल--बरं ! काकू, कमलला आमच्याकडे उद्या भातुकलीला पाठवाल का ?

काकू--हो, न पाठवयाला काय झालं ? तीच आली पाहिजे ना ! पुस्तकाचं डोकं धरून कोण बसेल मग ?

(दुसऱ्या दिवशीं दहा वाजतां)

विमल--हे बघ कमल, तुझी किनंई कोठार घरांवर नेमणूक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरं का ! संभाळ हो, कोणाला चोरी करूं देऊं नकोस. यमू, तूं भाजीपाल्याच्या तयारीकडे पहायचं बरं का ! सिंधू, तूं बाई आजीबाई म्हणून पक्कान्नाची तयारी करून द्यायची हं ! नी आपल्या सर्वांचा ह्या सुशीलाकाकू करतील स्वयंपाक. मी पाट. पानं, रांगोळ्या ह्यांकडे पाहीन. प्रमिला, तूं व आणखी दोघीतिघी मिळून विडे व हळदी कुंकवाची तयारी ठवा. सरल ! खरंच ! फुलांच्या वेण्या कर बरं सगळ्यांना.

कमल—मला नको बाई वेणी ! मी आपली फूलच घालीन.

सरला—कां ग तुला वेणी नको ?

कमल—मला नाही आवडत वेणी. छचोरपणा दिसतो त्यांत.

विमल—बरं बाई ; तिला नको करूंस. तिला नुसतं फूलच दे खोवायाला केसांत; आंकडा दे लावून हो !

सिंधु—का ग विमल, पाकांतल्या पुऱ्या हें पक्कान्न करायचं कसं ठाऊक आहे का ग काकूंना ?

विमल—आहे तर ! हुशार आहे हो सुशीला. म्हणून तर तिची नेमणूक केली स्वयंपाकावर.

सुशीला—हो पण माझ्या हाताखाली बऱ्याच मुली पाहिजेत. भांडीं स्वच्छ घासलेलीं आहेत ना ? नाहीतर कळ-कायबिळकायचा एखादा पदार्थ.

विमल—ते आता तं पाहून घे. तुझ्या हाताखाली ह्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिमी, ठकू, रंगू अनूह्या इतक्या मुली आहेत हो ना ग चिमे ?

चिमी—हो, आम्हीं मात्र भांडीं घासावीं ?

अनू—(तिच्या कानांत) अग घाबरूं नकोस. सुशीला आहे ना ? मग कांही काळजी नाही. झालेले पदार्थ चाखून पहायलाहि आपल्यालाच आधीं मिळतील.

रंगू—अग पण आज आपण विमलच्या घरीं आलों आहोंत. तेव्हा तिच्या म्हणण्याप्रमाणेंच वागूं या.

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) भातुकली म्हणजे काय ? (२) भातुकलीच्या खेळांत काय काय केलें जातें ? (३) विमलने कामांची वांटणी कशीं केली ?

२. समानार्थी शब्द सांगा—

छचोरपणा, चाखणें, आंकडा.

धडा पन्नासावा.

भातुकली.

भाग २ रा.

विमल—हे चला पानावर. जेवणाची तयारी आहे सगळी. (सर्व मुला पानावर बसतात व भराभर जेवतात.)

एक मुलगी—(जेवण झालें तरी) ए, मला भाजी हवी आहे.

दुसरी—मला चटणी वाढ ना ग चिमे !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिसरी—आमच्या पानांत तर कांही नाही.

विमल—बरं ग ! जरा दमान घ्या. अशा काय पाठीस लागतां ? सर्व संपायची वेळ आली ना. आम्हांला कांही उरूं द्याल की नाही ?

सर्वजणी—आजीबाई, आमचीं पोटंसुद्धा भरलीं नाहीत.

(सर्व उठतात व खूप हसतात बाकीच्या जेवून उठतात. नंतर विडे दिल्यावर)

विमल—आपण फुगड्या, झिम्मा, व गोफ खेळूं या. त्याशिवाय भातुकली कसली ?

कमल—विमल, मी जातें ग घरीं. अभ्यास करायचा आहे.

विमल—छेः, आज संध्याकाल पर्यंत नाही जायचं.

कमल—(रागावते) अशाने मी पुन्हा कध्धी यायची नाही तुझ्या इथं.

विमल—आम्हींच येऊं तुझ्या इथं मग. अग एखादे दिवशीं आपण मजा करतों तेव्हा असं रागवूं नये. बाकी मुली पहा बरं मुळीच रागावल्या नाहीत आज.

(कमल खेळूं लागते.)

सुशीला—हं चला ग आता चट्टामट्टा करायला (सर्वांना एक एक पुरी देते, चटणी, भाजी सर्व खाऊन टाकतात.)

अनु—ए कमल, ही तुझी बाहुली कशी छान आहे. आपणच तिचं माझ्या नवीन बाहुल्याशीं लग्न लावूं या येत्या शनिवारीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमल—काय सुशीताई ? कबूल करूं का ? (ती हो म्हणते) बरं तर.

अनु—पुढच्या शनिवारीं आमच्या बाहुल्याचं कमलच्या बाहुलीशीं लग्न आहे. तर सगळ्यांनी कमलकडे जमायचं बरं का ?

कमल—ए, पण माझा अभ्यास राहील ना !

अनु—ठाऊक आहे अभ्यासाचं ! म्हणून तर अशी लवकर लवकर रागावतेस. जरा खेळायाला येत जा, म्हणजे बरं होईल.

सर्व मुली—बरं आम्ही येतों ग विमल.

(ती सर्वांना कुंकू लावते व त्या जातात.)

प्रश्न

१. कृतिपर—

(१) भातुकलीचा संवाद करा.

२. स्मृति चांचणी—(१) कमल रागाने काय म्हणाली ? (२) मुलींच्या जेवणाचें वर्णन करा. (३) पुढच्या शनिवारीं कोणाकडे खेळायचें ठरलें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा एकावन्नावा.

राणी दुर्गावती.

सुमारें अडीचशें तीनशें वर्षांपूर्वी मध्यप्रांतांत गोंड लोकांचींच राज्यें होतीं.

या गोंड राज्यांत गढामंडल्याचें राज्य फार प्रसिद्ध होतें. याची राजधानी प्रथम गढा हे शहर होतें. पुढें मंडला हें राजधानीचें शहर झालें.

गढा येथे गोंड राजे राज्य करीत असतांच प्रथम मोगल सरदारांनी त्या राज्यावर हल्ले करण्यास सुरवात केली. त्या वेळीं राणी दुर्गावतीने हे हल्ले कित्येक दिवस आपल्या शौर्याने थोपवून धरले. हिंदुस्थानांत ज्या शूर स्त्रिया होऊन गेल्या त्यांतच दुर्गावतीची गणना होते.

बुंदेलखंडांतील महोबा येथें चंदेले रजपूत राजा राज्य करीत असत, त्या क्षत्रिय घराण्यांत इचा जन्म झाला. गोंडांचा विख्यात व प्रबल राजा दलपतशाह याने तिला मागणी घातली व त्याशीं तिचा मोठ्या थाटाने विवाह झाला.

गढ्याचें राज्य यावेळीं फार भरभराटींत होतें, पण दुर्दैवाने राणी दुर्गावतीचा पति अल्पायुषी ठरला ; व एका अल्पवयी अपत्याच्या नांवाने राज्य कारभार करण्याचा प्रसंग दुर्गावतीवर आला.

या संधीचा फायदा घेऊन अकबर बादशहाने आसफखान नांवाचा सरदार गोंड राज्यावर पाठविला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राणी दुर्गावतीस हें वृत्त समजतांच तिनेहि युद्धाची कडेकोट तयारी केली. स्वतः लष्करी पोषाख करून व हातांत नंगी समशेर घेऊन ती रणांगणावर दाखल झाली व आपल्या सैन्यास प्रोत्साहन देऊं लागली. मोठी खणाखणीची लढाई झाली. राणीच्या शौर्याने आसफखान चकित झाला. एका अबलेने आपणास दाद देऊं नये या गोष्टीने तो चिडून गेला. दुसरे दिवशीं अधिक जोराचा हल्ला करण्याचें त्याने ठरविलें, राणीचा अल्पवयी मुलगा अभिमन्युसारखा शौर्याने लढत होता. पण दुर्दैवाने त्यास वर्मी घाव लागून तो मूर्छित पडला. ही बातमी हां हां म्हणतां सैन्यांत पसरली. सैन्य हताश होऊन पळूं लागलें. पण रणशूर दुर्गावतीचें धैर्य मात्र ढळलें नाहीं. तिने हुकूम सोडला:—"ठीक आहे. राजकुमारास तंबूमध्ये न्या; मी रण सोडून येणार नाही. लढाई संपल्यानंतरच त्याची भेट घेईन !" याचें नांव खरें क्षात्रतेज !

आसफखानाच्या तोफखान्यापुढे गोंडांचा निभाव लागेना. रणांगणावर आता अवघे तीनशें लोक दुर्गावतीच्या रक्षणार्थ राहिले. तरी दुर्गावतीची लढण्याची हिंमत खचली नाही. पण येवढ्या छोट्या सैन्याचें बळ किती वेळ चालणार ? स्वतः राणी जखमी झाली होती. तिला लागलेले तीर ती स्वतः उपसून काढी व पुन्हा लढूं लागे. "आतां जास्त लढण्यांत अर्थ नाहीं ; तसें केल्याने आपण शत्रूच्या तावडींत मात्र सापडाल ; आपण मागें फिरत असाल तर मी आपल्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठ्या शर्थीने शत्रूच्या आटोक्यांतून बाहेर काढून नेतो"— असें एका स्वामिनिष्ठ सेवकाने तिला सांगितलें. पण शत्रूस पाठ दाखवून पळून जाण्याची कल्पना राणीस रुचेना. शत्रूच्या हातीं आपला देह लागावा ही कल्पनाहि तिला सहन झाली नाही. ती म्हणाली:—"मी रजपुताची बेटी आहे. माझा देह शत्रूच्या हातीं लागतां कामा नये. चल, घे तरवार व उडव माझी गर्दन !"

त्या इमानी सेवकाचा हात धजेना. पण राणीचा निश्चय ठरलाच होता. सेवक तिचा नाश करीना, तेव्हा तिने स्वतःच आपल्या कट्यारीने आत्मनाश करून घेतला ! तिच्या स्वामिनिष्ठ सेवकांनी तिचा देह शत्रूच्या हातीं लागूं दिला नाही.

रणशूर दुर्गावतीची समाधि याच प्रदेशांत बांधलेली आहे. तेथे दोन पाषाणस्तंभ उभे असून ते त्या वेळच्या युद्धाचे स्मरण करून देत असतात !

प्रश्न

१. आठवणीची चांचणी—

(१) राणी दुर्गावतीची माहिती थोडक्यांत लिहा.

(२) राणी दुर्गावतीच्या व आसफखानाच्या लढाईचें वर्णन करा.

(३) राणीने मुलगालढाईत पडला. असतांना कोणतें उत्तर दिलें ?

(४) दुर्गावतीचा अंत कसा झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. उलट अर्थाचे शब्द लिहा--

स्मरण, बेटी, अल्पायुषी, रुचेना.

धडा बावन्नावा.

चिमुकलें महाभारत.

भाग १ ला.

फार प्राचीन काळीं हस्तिनापुर येथे चंद्रवंशी क्षत्रिय राजे राज्य करीत असत. त्यांपैकी एका राजास धृतराष्ट्र व पंडु या नांवाचे दोन पुत्र झाले. धृतराष्ट्र वडील पण आंधळा होता, म्हणून बापामागे पंडूच राज्य करूं लागला. पंडूला पांच मुलगे होते. त्यांत युधिष्ठिर, भीम व अर्जुन हे शूर व बुद्धिमान् होते. धृतराष्ट्रास शंभर पुत्र झाले. त्यांत दुर्योधन सर्वांत वडील होता. पंडूचे मुलगे पांडव व धृतराष्ट्रचे कौरव या नांवाने प्रसिद्ध आहेत.

पंडु लवकरच मरण पावला. मग आंधळा धृतराष्ट्र गादीवर बसला. राज्यकारभार वृद्ध आजोबा भीष्म हेच पहात असत. त्यांनी पांडव व कौरव यांच्या शिक्षणाची चांगली व्यवस्था केली. द्रोणाचार्य गुरुजीने सर्व राजकुमारांना धनुर्विद्या व इतर सर्वविद्यांचें शिक्षण दिलें.

दुर्दैवाने लहानपणापासून च पांडव व कौरव यांच्यामध्ये चुरस उत्पन्न झाली. भीम दांडगा असल्याने तो खेळांत दुर्यो-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धनादिकांस पाडी व मारी. यामुळे ते त्याचा फार द्वेष करूं लागले. अर्जुन धनुर्विद्येंत सर्वांहून श्रेष्ठ ठरला. तेव्हा तर कौरवांना पांडवांबद्दल फारच मत्सर वाटूं लागला.

धृतराष्ट्र वडील व आपण त्याचे मुलगे ; म्हणून राज्याचा अधिकार दुर्योधनाकडे आला पाहिजे असें कौरवांस वाटे. पण धृतराष्ट्राने सर्वांत वडील व बुद्धीने आणि शीलाने सर्वांत श्रेष्ठ अशा युधिष्ठिरास जेव्हा युवराज ठरविलें, तेव्हा तर कौरवांचा मत्सर फारच भडकली.

मग कौरवांनी एक कारस्थान केलें ; एक नवीन लाखेचें घर तयार केलें. त्यांत पांडव राहात असतां त्याला आग लावून दिली. पण विदुराने पांडवांस चोरवाटेने निघून जाण्यास मदत केली. तेथून निसटल्यावर पांडव कित्येक दिवस अरण्यांत व खेड्यापाड्यांत राहात होते. त्याच सुमारास पांचाल देशाचा राजा द्रुपद याच्या कन्येचें स्वयंवर होतें. या स्वयंवरांतील पण जिंकून अर्जुनाने द्रौपदी मिळविली. मग द्रौपदीचा सर्व पांडवांशीं विवाह झाला. यावेळीं पांडव प्रकट झाले व हस्तिनापुरास परत आले.

पांडव परत आले व त्यांना द्रौपदी मिळाली, हें पाहून कौरवांना अत्यंत वाईट वाटलें. कौरव पांडवांतील चुरस पाहून धृतराष्ट्राने राज्याची वांटणी करून दिली. युधिष्ठिर आपल्या बंधूंसह इंद्रप्रस्थ येथे राज्य करूं लागला. पांडवांनी आपल्या पराक्रमाने दक्षिणेकडील नवीन देश जिंकलें व नंतर मोठ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थाटाने राजसूय नांवाचा यज्ञ केला. या सर्वकामांत त्यांना श्रीकृष्णाचें फार सहाय्य होतें.

प्रश्न

१. खरें किंवा खोटें--
(१) कौरव पांडवांत लहानपणापासून चुरस नव्हती.
(२) अर्जुनाने पण जिंकून द्रौपदी मिळविली.

२. अशुद्ध शब्द शुद्ध लिहा--
सैयंवर, दुर्योधन, धुतराष्ट्र, मस्सर.

३. स्मृति चांचणी—(१) पांडवांचीं नांवें लिहा. (२) भीष्म हे राज्यकारभार कां पहात होते ? (३) कौरव पांडवांचा मत्सर कां करीत होते ?

धडा त्रेपन्नावा.

चिमुकलें महाभारत.

भाग २ रा.

पांडवांचा हा उत्कर्ष पाहून तर दुर्योधनास झोपसुद्धा येईना. काय वाटेल तें करून त्यांचें राज्य त्यांजकडून काढून घेतलें पाहिजे असें त्यांस वाटे. पण पांडवांच्या पराक्रमापुढे त्यांचें कांही चालत नव्हतें. शेवटीं शक्तीने जें साधलें नाही तें कपटाने साधण्याचें त्याने ठरविलें. दुर्योधनाचा मामा शकुनि म्हणाला:— "युधिष्ठिराला फासे खेळण्याचा अतोनात नाद आहे. त्याला आपण द्यूत खेळावयास लावूं व पणांत त्याचें राज्य जिंकू."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याप्रमाणे पांडवांना दिवाळीच्या सणांत द्यूत खेळण्या साठी निमंत्रण देण्यांत आलें. युधिष्ठिराने, त्याचे बंधु नको नको म्हणत असतां, तें स्वीकारलें.

सर्व तयारी होऊन द्यूतास सुरवात झाली. शकुनि प्रत्येक



डाव कपटाने जिंकून दुर्योधनाची सरशी करी. युधिष्ठिर खेळतच होता, त्याने आपलें सर्व राज्यहि पणास लावलें. हें सर्व त्याने गमावलें. इतकें झालें तरी युधिष्ठिराचे डोळे उघडेनात ! त्याला खेळाचें वेडच लागलें. पुढे त्याने आपले चारी भाऊ पणास लावले; नंतर स्वतः व त्यानंतर द्रौपदी, याप्रमाणे सर्व पणास लावून तो हरला. असा तऱ्हेने सर्व जाऊन पांडव द्रौपदीसह कौरवांचे दास झाले !

वृद्ध धृतराष्ट्राला हा झालेला प्रकार पाहून वाईट वाटलें. त्याने पांडवांना दास्यांतून मुक्त केलें. पण पांडवांनी बारा वर्षें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वनवास व एक वर्ष अज्ञातवास केल्यास त्यांचें राज्य त्यांस परत मिळेल असें ठरलें.

प्रश्न

१. कारणें लिहा—
   (१) दुर्योधनास झोपसुद्धा येईना. कारण——
   (२) युधिष्ठिराचे डोळे उघडेनात. कारण——
२. स्मृति चांचणी—(१) पांडवांना वनवास कसा मिळाला ?
   (२) कौरवांनी कोणत्या उपायानें पांडवांचें राज्य घेतलें ?
   (३) 'शक्तीने जें साधलें नाही तें कपटानें साधलें' याचा खुलासा करा.

धडा चौपन्नावा.

चिमुकलें महाभारत.

भाग ३ रा.

तेरा वर्षानंतर पांडव अज्ञातवासांतून प्रकट झाले व आपलें इंद्रप्रस्थाचें राज्य परत मागूं लागले. सर्व राज्य नाहीं तर अर्धें; निदान पाव; निदान पाच गावें आपणांस दिलीं तरी आपण समाधान मानूं. असा निरोप युधिष्ठिराने पाठविला. पण सुईच्या टोंकावर राहण्यापुरती माती देखील मी देण्यास तयार नाहीं, असें दुर्योधनाने स्वच्छ सांगितलें.

श्रीकृष्णाने मध्यस्थी करून तंटा मिटविण्याचा फार प्रयत्न केला. वृद्ध धृतराष्ट्राने, भीष्माने व इतर पुष्कळ वृद्ध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुत्सद्यांनी पांडवांशीं वैर न वाढविण्याबद्दल दुर्योधनास फार आग्रह केला. पण त्याने कोणाचेंहि ऐकलें नाही.

शेवटी युद्ध पुकारलें गेलें. या वेळीं हिंदुस्थानचे बहुतेक राजे या ना त्या पक्षास मिळाले होते. दुर्योधनाच्या हातीं राज्यकारभार होता त्यास अधिक मोठें सैन्य गोळा करतां आलें. पण पांडवांना एकट्या श्रीकृष्णाची सल्लामसलत या मोठ्या सैन्याहून अधिक उपयोगी पडली.

कुरुक्षेत्राच्या मैदानावर हें भारतीय युद्धसारखें अठरा दिवसपर्यंत चाललें होतें. भीष्म, द्रोण, कर्ण यांसारखें कौरवांकडील वीर व अभिमन्यूसारखे पांडवांकडील वीर पडले, तरी दुर्योधन माघार घेईना. शेवटी सर्व सैन्याचा व कौरवांचा नाश झाला. पांडवांपैकी केवळ पांच पांडव शिल्लक राहिले.

पुढे युधिष्ठिर राज्यसिंहासनावर बसला व त्याने मोठ्या न्यायाने व दक्षतेने राज्य केलें. त्याच्या न्यायीपणामुळे लोक त्याला धर्मराज असें म्हणूं लागले. पण या राज्यामुळे पांडवांस सुख मात्र झालें नाही. सर्व चुलत बंधूंचा, स्वतच्या प्रिय पुत्रांचा व पुतण्यांचा नाश झाला, यामुळें युधिष्ठिराचें मन खिन्नच राही, शेवटी या राज्यास कंटाळून, अभिमन्यूचा पुत्र परिक्षिति यास राज्यावर बसवून पांडव हिमालयाकडे तप करण्यासाठी निघून गेले.

सारांश, या भाऊबंदकीच्या युद्धाने कल्याण आसेकोणांच झालें नाही. हिंदुस्थानांतील सर्व ठळक राजेरजवाडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व क्षत्रिय वीर मारले गेले; व अखेर परकीय शत्रूंना आपल्या देशावर स्वारी करणें सोपें गेलें.

प्रश्न

१. स्मृति चांचणी——(१) पांडवांची कथा सांगा. (२) दुर्योधनाची कोणी कोणी समजूत केली ? (३) भारतीय युद्ध कोठें व किती दिवस झालें ? (४) युधिष्ठिराला 'धर्मराज' कां म्हणत ?

२. कारण सांगा—

(१) भाऊबंदकीच्या युद्धाने कोणाचेंहि कल्याण झालें नाही. कारण——

(२) युधिष्ठिराचें मन खिन्नच राही. कारण——

धडा पंचावन्नावा.

मुलींचे शारीरिक खेळ.

भाग १ ला.

आज यमूचा वाढदिवस. म्हणून तिच्या घरीं पुष्कळ मुलींना जेवावयास बोलाविलें होतें. जेवण झाल्यावर कांही.

वेळ मुलींनी गाणीं म्हटलीं. त्यानंतर एकजण म्हणाली, "चला ग, आपण आता पत्ते खेळूं. चला ब्रिजचा डाव खेळायला. येते का ग यमू ? मी नुकतीच शिकलें तो खेळायला."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंदू म्हणाली, "हें काय ग नमू ? सगळ्यांना येतो तो डाव खेळायचें सोडून ब्रिज का फ्रिजकुठला काढलास तूं आज ?"

राधाकाकू--(यमुची आई हें सर्व ऐकत होत्या.) मुलींनो, ब्रिजविषयी कसला वाद करीत आहां ? असेल तो चांगला खेळ, पण मी विचारतें, असले नुसते बैठे खेळच कसे तुम्हा मुलींना आताशा आवडतात ? अग कांही शारीरिक व्यायाम होईल असे फुगडी, झिम्मा, पिंगा, कोंबडा या सारखे खेळ खेळाल की नाही ?

नमू व इंदू--इश्श ! हे कसले जुनाट नि धांगडधिंग्याचे खेळ ? त्यांनी दंगा मात्र पुष्कळ होतो घरांत. आणि घरचीं माणसें रागावतात आमच्यावर !

राधा--अग भलत्याच वेळीं तुम्ही हे खेळ खेळून घर डोक्यावर घेतां. तेव्हा रागें भरतात वडील माणसें ; एरव्ही तुमच्या या अलिकडच्या बैठ्या खेळांपेक्षा आमचे जुने खेळ कितीतरी मौजेचे आरोग्यदायक आहेत. पण तुम्हांला अलीकडे हें खेळ खेळा म्हटलें की लाजच वाटते. खेळांचा मुख्य उद्देश कोणता बरें ? दिवसभर अभ्यास करून किंवा काम करून थकलेल्या शरीराला व मनाला फिरून तरतरी यावी व मन आनंदी ; उत्साही बनावें हाच ना ? मग तो नुसत्या बैठ्या खेळांनी कसा बरें सफल होईल ? शरीराला मोकळ्या जागेंत स्वच्छ हवा व व्यायाम मिळाला तरच तें निरोगी राहाते. आपल्या फुगड्यांसारख्या खेळांनी असा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यायाम सहज मौजेने हसत खेळत मिळतो. शिवाय आपल्या या जुन्या खेळांत आणखीहि एक महत्त्वाचा गुण आहे, यांना मुळीच खर्च लागत नाही. अशा खेळांची तुम्हांला अलीकडे माहितीच दिसत नाही फारशी. मी देतें तुम्हांला त्याविषयी थोडी माहिती.

प्रश्न

१. खुलासा करा—
(१) अलिकडच्या बैठ्या खेळांपेक्षा जुने खेळ किती तरी मौजेचे व आरोग्यदायक आहेत.

२. स्मृति चांचणी—(१) जुन्या व नव्या खेळाची तुलना करा ? जुने खेळ चांगलें कां ? तुम्हांला कोणते खेळ आवडतात ? कां ? मुला मुलींच्या खेळांची नांवें लिहा.

धडा छप्पन्नावा.

मुलींचे शारीरिक खेळ.

भाग २ रा.

राधाकाकूंनी फुगड्या, झिम्मा, पिंगा, कोंबडा या खेळांविषयी मुलींना थोडी थोडी माहिती सांगितली.

(१) फुगड्या—दोन दोन मुलींच्या जोड्यांना हा खळ खेळतां देतो. दोघी एकमेकींचे हात एकावर एक धरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गरागरा फिरून नाचतात. तसें करतांना मौजेनें निरनिराळे उखाणे म्हणतात. यांत पायांस खूप व्यायाम होतो.



(२) पिंगा या खेळांत कंमरेवर हात ठेवून सर्व शरीर वाटोळें फिरवावयाचें असतें. याने शरीर लवचिक व हलकें बनतें; व शरीराच्या वरच्या भागास व्यायामहि चांगला होतो.

(३) झिम्मा—(१) साधा झिम्मा—दोन दोन मुलींच्या पांच सहा जोड्या एक वर्तुळ करतात व मग प्रथम आपल्यालाच व आपल्या गड्याला दोन्ही हातांनी एकदा टाळी देऊन मग शेजारच्या दोन मुलींपैकी एकदा एकीला मग दुसरीला, आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गड्यासारख्याच टाळ्या देतात हें करतांना तोंडाने गाणें म्हणतच वर्तुळांत फिरत असावयाचें. कधी कधी गड्याला एकेका हातानेच टाळी देतात. (२) लाडू झिम्मा—वरच्या सारखाच, पण मध्ये एक टाळी आपल्या हातावर जी द्यावयाची ती लाडूचा आकार करून तीन वेळां द्यावयाची व मग गड्याला साधी टाळी द्यावयाची. (३) खांदे झिम्मा—यांत प्रथम एकमेकींना एकेक टाळी द्यावयाचीं (अर्थात् दोन्ही हातांनी) व मग दूर जावयाचें; तेथे हात उघडून खांद्यावर आंगठे टेकावयाचे, दोघींनी जवळ येऊन टाळी द्यावयाची व पुन्हा दूर होऊन खांद्यावर आंगठे टेकावयाचे. याप्रमाणे दमेपर्यंत खेळावयाचें.

(४) कोंबडा—यांत एकावर एक गुडघे ठेवून नाचत नाचत जावयाचें असतें. यांत पुष्कळ मुलींना एकदम खेळतां येतें. सर्वांचे कोंबडे मग भांडतात. मग नाचत नाचत परत आपल्या जागीं जातात.

राधाकाकूंनी हे सर्व खेळ प्रत्यक्ष खेळून दाखविलें. पन्नास वर्षांच्या पोक्त बाईने खेळतांना दाखविलेली चपलता पाहून मुली अगदी चकित झाल्या. त्याही या खेळांत आनंदानें सामील झाल्या; व पुढें हे खेळ नेहमीं खेळूं लागल्या.

प्रश्न

स्मृति चांचणी—(१) मुलींच्या फुगड्यांची नांवें सांगा. (२) तुमची बहीण कोणत्या फुगड्या खेळते. (३) फुगड्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खेळांमुळे मुलींना कोणता शारीरिक व्यायाम होतो ? (४) झिम्मा हा खेळ तुम्ही आपल्या बहिणीला कसा शिकवाल ?

धडा सत्तावन्नावा.

गाई घरा आल्या.

(कविता)

[श्रीकृष्ण संध्याकाळीं लवकर घरीं आला नाहीं. तर त्याची प्रेमळ आई यशोदा कशी घाबरी होई याचें सुंदर वर्णन पुढील कवितेंत आलें आहे.]

गाई घरा आल्या । घण घण घंटानाद
कुणीकडे घालूं साद । गोविंदा रे ? ॥ १ ॥
गाई घरा आल्या । वासरें हंबरती
घनश्याम कोणीकडे । माझा गेला ? ॥ २ ॥
गाई घरा आल्या । धूळ झालीं चोहोंकडे
कुणीकडे बालमूर्ती । कृष्ण माझा ? ॥ ३ ॥
गाई घरा आल्या । ब्रह्मानंद वासरांना
काय करूं माझा कान्हा । चुकला कां ? ॥ ४ ॥
गाई घरा आल्या । घोंटाळती पाडसासी
हाय नाही हृषीकेशी । माझ्यापाशीं ॥ ५ ॥
गाई घरा आल्या । पाडसांस हुंगतात
माझा मात्र यदूनाथ । दूरावला ॥ ६ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गाई घरा आल्या । आवरेना मुळी पान्हा
राहणार भुका तान्हा । वासुदेव ॥ ७ ॥
गाई घरा आल्या । दूध वाहे झुरू झुरू
माझ्या जिवा हुरू हुरू । मुकुंदाची ॥ ८ ॥
गाई घरा आल्या । दूधवाटी राहीयेली
कुणी माझा वनमाळी । गुंतवीला ? ॥ ९ ॥

—वा. गो. मायदेव

प्रश्न

स्मृति चांचणी—(१) यशोदा कुशी घावरी झाली, त्याचें वर्णन करा. (२) "गाई घरीं आल्या मुळें वासरांना आनंद झाला." या अर्थाची कविता पाठ म्हणा. (३) श्रीकृष्णाला घनश्याम, वनमाळी, मुकुंद, गोविंद, यदुनाथ, वासुदेव हीं नांवें कां मिळालीं हें सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धडा अट्ठावन्नावा.

शाहूमहाराजांचा थोरपणा.



शाहूमहाराज हे शिवाजीमहाराजांचे नातू व संभाजीचे पुत्र होत. संभाजीच्या मृत्यूनंतर हे पुष्कळ दिवस मोगलांच्या कैदेंतच होते. पुढे सुटून आल्यावर राजारामाची पत्नी ताराबाई त्यांस त्यांचें हक्काचें राज्य देईना. तेव्हा तिच्याशीं लढून त्यांना साताऱ्याचें राज्य मिळवावें लागलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढे शाहूमहाराजांच्या कारकिर्दीत मराठी राज्याची फार भरभराट झाली हे प्रसिद्ध आहे.

शाहूमहाराज हे स्वभावाने मोठे उदार व दिलदार होते या संबंधीची एक आख्यायिका पुढे दिली आहेः—

एकदा शाहूमहाराज शिकारीस गेले होते. शिकार आटोपल्यावर भोजन करून तंबूत एकटेच विश्रांति घेत पडले होते. इतक्यांत चार मारेकरी हातांत नागव्या तरवारी घेऊन तंबूत चालून आले. परंतु महाराजांस पाहातांच त्यांच्या हातांतील शस्त्रें गळून पडलीं व ते जागच्या जागींच खांबासारखे उभे राहिले. तेव्हा महाराज त्यांस बोललेः—"असे उभेच कां राहातां? ज्या कार्यास आलां तें कार्य झटकन आटपा ; नाहीतर बोभाटा होईल. परंतु मारकेऱ्यांच्या तोंडून शब्द निघेना. महाराजांनी विचारलें, तुम्हांस हें काम कोणीं सांगितलें?" ते म्हणाले, "ताराबाई साहेबांचे पुत्र संभाजीमहाराज कोल्हापूरकर यांनी आम्हांस द्रव्य देऊन आपणांस मारावयास पाठविलें ; परंतु आपल्या पुण्याईने आमची हिंमत गळाली. आम्हांस जीवदान देणारे मायबाप आपणच आहात?"

महाराजांनी त्यांना कांही शिक्षा तर केली नाहीच. उलट त्या चौघांस चार सोन्याचीं कडीं व पोषाख बक्षीस देऊन संभाजीमहाराजांकडे परत पाठविलें. पत्रांत लिहिलें की, "हे चार इसम भले मर्दानी शूर आहेत. यांस नेहमी जवळ ठेवून सेवा चाकरी घ्यावी."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या उदारपणाने संभाजीमहाराज खजील झाले. त्यांच्या मनांतला वैरभाव नाहीसा झाला. ते मुद्दाम साताऱ्यास आले व शाहूमहाराजांच्या पायांवर डोकें ठेवून त्यांनी क्षमा मागितली. तेव्हापासून या दोघा चुलतबंधूंची गोडी अखेरपर्यंत कायम होती.

प्रेमाने प्रेम वाढतें म्हणतात तें हें असें !

प्रश्न

१. स्मृति चांचणी—(१) शाहूमहाराजाच्या उदारपणाची गोष्ट सांगा. (२) शाहू मोगलांच्या कैदेंत होते याचा इतिहास सांगा. (३) ताराबाई ह्याकोण ? व त्यांचें शाहूमहाराजाशीं कोणतें नातें होतें ? शाहूने पत्रांत काय लिहिलें ?

२. स्पष्टिकरण करा:—(१) प्रेमाने प्रेम वाढतें.

३. कारणें सांगा:—

(१) शाहूमहाराजांनी मारेकऱ्यांना शिक्षा न करतां बक्षीस देऊन पाठविलें कां ? (२) संभाजीमहाराज खजील कां झालें, कां ?

धडा एकोणसाठवा.

आमची हिंदभूमि.

(कविता)

(चाल—'आनंदाचा कंद हरि हा')

हिंदभूमि ही जननी आमुची
प्रिय आम्हांला बहु गमते ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आम्हांवरि उपकार तियेचे
कधी न आम्ही विसरूं ते ॥ ध्रु० ॥
सुजला, सुफला, सदया, रुचिरा
मुलांस भारी जी सुखदा ।
गंगा, यमुना, सिंधू, तापी
सेविति जीतें सुखें सदा ॥ हिंदभूमि० ॥ १ ॥
सह्य, विंध्य, हिमगिरी जियेला
अमित धनांला पुरवीती ।
ठेवा तीतें सदा सुखी ही
ईशपदाला करुं विनंती ॥ हिंदभूमि० ॥ २ ॥

—म. का. कारखानीस.

प्रश्न

(१) मुलांनो, आपली हिंदभूमि कशी आहे ? तिचें वर्णन करा.
(२) सह्य, विंध्य, हिमगिरी हे कोणते धन देतात.
(३) गंगा, यमुना, सिंधू, तापी या नद्या हिंदभुमीची कोणति सेवा करतात.
(४) आपल्यावर हिंदभुमीचे कोणते उपकार आहेत ? तुम्ही कसे फेडाल ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुलभ वाचनपाठमाला

मराठी तिसरें पुस्तक

सी. पी. अँड बरार एज्युकेशनल बुकडेपो.
जबलपूर, नागपूर, अमरावती.

Weight & quality of paper .... 28 lbs. White Printing
Size of paper .... 20"×30"
Weight of cover paper .... 60 lbs.
Price .... -/5/-

Printed by B. B. Kapur at the N. K. Press, Lucknow.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar